**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७१९
निर्णय दिनांक १६/०२/२०१०

१ श्री. रामेश्वर श्रीकिसन अग्रवाल, : अपिलार्थी
रा.धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक कार्यालय, सहकारी संस्था, धुळे

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

श्री. रामेश्वर श्रीकिसन अग्रवाल यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १३.११.२००९ रोजी केलेले दि. १८.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १३.०३.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०४.०५.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही

बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. रामेश्वर श्रीकिसन अग्रवाल, कल्पतरु सोसायटी, मालेगांव रोड, धुळे.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५३
निर्णय दिनांक १६/०२/२०१०

१ श्री. श्याम रामचंद्र बोरावके, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
चेअरमन,
कृषी उत्पन्न बाजार समिती, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सह सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती, औरंगाबाद

**निर्णय**

श्री. श्याम रामचंद्र बोरावले यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २४.०३.२००८ रोजी केलेले दि. २५.०३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २३.१२.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. १८.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही

बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६/०२/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्याम रामचंद्र बोरावके, ५-६-१, न्यू उस्मानपुरा, धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, औरंगाबाद ४३१००५.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५८१
निर्णय दिनांक: १६-०२-२०१०

१. श्री. लक्ष्मीकांत गणपत पाठक, : अपिलार्थी
रा. वसमत, जि.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
श्री सरस्वती निकेतन माध्यमिक शाळा,
वसमत,जि.हिंगोली

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, हिंगोली.

त्रयस्थ पक्ष : श्रीमती एस.डी.सौंदणकर, सहशिक्षिका

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना मुख्याध्यापक, श्री सरस्वती निकेतन माध्यमिक शाळा, वसमत, जि.हिंगोली यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३ व ४ च्या संदर्भातील माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३ व ४ च्या संदर्भातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्रीमती एस.पी.सौंदणकर यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्ती संदर्भात व

वेतनासंदर्भात काही माहिती एकूण चार मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांची भेट घेण्याचे सूचित केले. यानंतर परत दि. २१.१०.२००८ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात येऊन विद्यालयाच्या कार्यालयात आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीसाठी आवश्यक असलेली रक्कम प्रत्यक्ष येऊन जमा करण्याचे सूचित केले व दि. ११.११.२००८ रोजी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित राहिल्यानंतर अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३५०/- इतके त्यांच्याकडून स्वीकारले व तदनंतर दि. १२.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाने पाठविली. परंतु यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०१.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी हे अनुपस्थित राहिले. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्यास दिलेल्या तोंडी सूचनेनुसार, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३ व ४ च्या संदर्भात माहिती अपिलार्थीस, दि. २१.०१.२००९ रोजी पाठविली. तथापि अपिलार्थीने सदर माहिती पोस्टाद्वारे स्वीकारण्याचे नाकारुन दि. ०७.०२.२००९ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३ व ४ च्या संदर्भातील माहिती एकूण दोन वेळा पोस्टाद्वारे पाठविली आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या दि. २१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेल्या या मुद्यांवरील माहितीचा स्वीकार न केल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना सदर माहितीचे विनातामीली परत प्राप्त झालेले बंद पाकीट आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केले. हे बंद पाकीट आज रोजी आयोगासमक्ष जन अपिलीय अधिकारी यांनी उघडले असता, या पाकीटामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २,३ व ४ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती उपलब्ध असल्याचे आयोगास आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली आवश्यक ती संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि. १२.११.२००८ व तदनंतर दि. २१.०१.२००९ रोजी पाठविली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या या माहितीचे पाकीट अपिलार्थीने स्वीकारले नाही. या पाकीटात उपलब्ध असलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये संदर्भित केलेल्या मुद्यांची माहिती उपलब्ध असल्याची आयोगाने खात्री करुन घेतली आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे आता जर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अजूनही हवी असेल तर त्यांनी हे आदेश निर्गमित होताच दहा दिवस, इतक्या कालावधीपर्यंत कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधितांकडून हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या दि. ०९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.१०.२००८ व २१.१०.२००८ रोजी दिलेला प्रतिसाद हा सर्वथा चुकीचा आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) व ७(३)(क)च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या अंदाजित शुल्काचा तपशील, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत अपिलार्थीस कळविणे आवश्यक होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०६.१०.२००८ व २१.१०.२००८ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या एकूण शुल्काचा तपशील कळविला नाही. फक्त या शुल्काकरिता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचा आग्रह त्यांनी सातत्याने केला. जन माहिती अधिकारी यांची, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार न केलेली त्यांची ही कृती, चुकीची असल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३५०/- इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३५०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत परत करावे व तसेच याच कालावधीमध्ये अपिलार्थी या प्रकरणाशी संबंधित उर्वरित माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी पूर्वनियोजित वेळी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्यास अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य हस्तांतरित करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३ व ४ च्या संदर्भातील माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३५०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १६-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लक्ष्मीकांत गणपत पाठक,रा.बँक कॉलनी, डॉ.मसारे यांच्या हॉस्पीटलसमोर, वसमतनगर, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री सरस्वती निकेतन माध्यमिक शाळा, वसमतनगर, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५८२
निर्णय दिनांक: १६-०२-२०१०

१. श्री. म.जकियोद्दीन म. रशिदोद्दीन काजी, : अपिलार्थी
रा. औंढा (नागनाथ), जि.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, औंढा (नागनाथ),
जि. हिंगोली.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, हिंगोली.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेसंदर्भात सन २००६-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती 'व्यक्तिशः' मागितली होती. या माहितीमध्ये - औंढा तालुक्यामध्ये एम.आर.ई.जी.एस.ची कामे झालेल्या सर्व ठिकाणांची खर्चासह माहिती, तसेच या कामावर गावातील बेकार मजूरांना काम मिळण्यासाठी शासनाने योजना काढली, त्याच्या

मजूरीचे पैसे बँकेमार्फत दिले का, झालेली कामे पूर्ण झालेली आहेत का, पूर्ण झालेली कामे नसतील तर किती ग्रामसेवकांना पूर्ण पैसे देण्यात आले, ज्या-ज्या गावात एम.आर.ई.जी.एस.ची कामे चालू होती, त्या कामांवर जे मजूर काम करीत होते, त्यांचे नाव, त्यांना दिलेला पगार, आणि बँकेमार्फत उचललेले पैशाचे व्हाऊचर व पासबुक क्रमांक , शासनाचा जी.आर.असताना किती ग्रामसेवकांनी खाते न उघडता मजूरांना पगार दिला त्याचा तपशील, एमआरईजीएस च्या कामामध्ये मजूरांना काम न देता गुत्तेदारी पध्दतीने काम देण्यात आले का, किंवा हे काम मशीनद्वारे करण्यात आले का, पंचायत समिती, औंढा (ना.) येथे सन २००६-२००८ मध्ये कोणकोणत्या योजनेखाली पंचायत समितीला टीन पत्रे प्राप्त झाले व हे टीन पत्रे पंचायत समितीने कोणत्या लाभार्थीना वाटप केले व त्या संदर्भात इतर अनुषंगीक माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती 'व्यक्तिशः'अपेक्षिली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा (नागनाथ), जि.हिंगोली यांच्याकडे केला होता. तथापि या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी ते नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार त्यांच्याकडील दि. २६.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याच प्राधिकरणाचा भाग असलेल्या, संबंधित महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना विभाग, व समाजकल्याण विभाग यांच्याकडे वर्ग केला. परंतु अपिलार्थीस त्यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०२.२००९ रोजी निर्णय दिला व अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. १०.०२.२००९ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १९.०२.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील

परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस दि. १९.०२.२००९ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले व त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची या प्रकरणाशी संबंधित माहिती प्राप्त झाल्याच्या लेखी जबाबाची प्रत आयोगास सादर केली. तसेच आयोगास असेही अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दोन वेळा पोस्टाद्वारे माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती दोनही वेळा स्वीकारण्यास नकार दिला. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने यासंदर्भातील पोस्टाचा पुरावा आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केला.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे दि. १६.०२.२००९ रोजी द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दि. १९.०२.२००९ रोजी प्राप्त झाल्याची लेखी कबूली अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिली आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देऊ केलेली माहिती, स्वीकारण्याचे वेळोवेळी नाकारले आहे. अपिलार्थीस माहिती मिळाल्याची आणि अपिलार्थीने प्रथमतः माहिती नाकारण्याची बाब, तसेच अपिलार्थीची आज रोजीची अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन

अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ५८२/०९, दि. १६.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १६-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. म.जकियोद्दीन म. रशिदोद्दीन काजी, काजीपूरा, औंढा (नागनाथ), जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा (नागनाथ), जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५८३
निर्णय दिनांक: १६-०२-२०१०

१. श्री. धनंजय उत्तमराव ढाकरे, : अपिलार्थी
रा.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद, हिंगोली,जि.हिंगोली
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, हिंगोली, जि.हिंगोली.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक,
नगर परिषद, हिंगोली, जि.हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलातील आदेशाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यात न आल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ च्या संदर्भातील माहिती त्यांना अद्यापही आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे खालीलप्रमाणे मागितली होती.

"१) जिजामाता नगरमध्ये ॲटो स्टॉपपासून → तुळजाभवानी मंदीर → पाण्याच्या टाकीपर्यंत जो सिमेंट रोड करण्यात आला त्याची A to Z माहिती देण्यात यावी,

२) आपल्या नगरपालिकेच्या हद्दीत किती किलो मिटर अंतराचे पक्के डांबरी रस्ते आहेत?

३) मुंबई उच्च न्यायालयाचा गतिरोधका संबंधित २७ एप्रिल २००५ च्या निर्णयाची एक कॉपी द्यावी ?

४) आपल्या नगरपालिकेअंतर्गत या निर्णयाच्या मानकाप्रमाणे असणारे आणि मानकाप्रमाणे नसणारे किती गतीरोधक आहेत ?

५) जिजामाता नगरमध्ये रस्त्यामध्ये राडारोडा टाकून रस्ता निरुंद करण्याचे काम कोणाच्या परवानगीने सुरु आहे. केव्हापासून सुरु आहे, त्याला नगरपालिकेने परवानगी दिली असल्यास त्याबाबतच्या कार्यालयीन टिपणीच्या प्रमाणीत प्रती देण्यात याव्या."

( टीप : अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात नमूद केलेले मुद्दे जसेच्या तसे टंकलिखित केलेले आहेत.)

अपिलार्थीने अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या 'माध्यमा'द्वारे (जसे : व्यक्तिशः/टपालाद्वारे/नोंदणीकृत टपालाद्वारे) अपेक्षित आहे, याचा त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केलेला नसल्याचे आढळून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहिपोटीचे शुल्क रु. १२/-इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.११.२००८ रोजी केल्यानंतर त्यांनी

अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन, त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, दि. २२.१२.२००८ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती पुरविली. तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे युक्तिवाद करुन त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ च्या संदर्भातील माहितीची मागणी कायम ठेवून आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ ची माहिती प्राप्त झाली नाही व मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असून, या माहितीमध्ये, काम पूर्ण करण्यासाठी नमूद केलेल्या कालावधीपेक्षा हे काम पूर्ण करण्यासाठी जास्त कालावधी लागला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना प्रथमतः दि. १४.११.२००८ रोजी व नंतर दि. २२.१२.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली असून, यासंदर्भात अपिलार्थीस माहिती पाठविल्यासंदर्भात अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगची प्रत त्यांनी आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.१२.२००८ रोजी माहिती पुरविली असल्याचे सिध्द होत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती प्राप्त झाली नाही, असे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. १ द्वारे मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे रस्त्याची 'A to Z' अशी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस 'A to Z' या शब्दाद्वारे नेमके काय सूचित करावयाचे आहे किंवा त्यांना निश्चितपणे कोणत्या मुद्यावर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, याचा निश्चित बोध होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती ही, मोघम स्वरुपाची ठरते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विशिष्ट स्वरुपाची व विशिष्ट मुद्यावर माहिती मागणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती विशिष्ट स्वरुपाची नसून मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या, 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही व परिणामी ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात, मुंबई उच्च न्यायालयाच्या दि. २७.०४.२००५ च्या निर्णयाच्या प्रतीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मा. उच्च न्यायालयाचा हा निर्णय त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे दि. १४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे अवलोकन केले असता, या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिलेली माहिती बरोबर आहे, असे दिसून येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याचा त्यांच्या युक्तिवादामध्ये उल्लेख केला आहे. यासंदर्भात जन

अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी हिंगोली शहरात त्यांच्या कार्यक्षेत्रातील गतीरोधकासंदर्भात नव्याने सर्व्हे करुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार केली व ती अपिलार्थीस दि. २२.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली. तथापि ही माहिती देखील अपिलार्थीस प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती तयार केली गेली असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत, असे आयोगास अवगत केले.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.१०.२००८ रोजी माहितीसाठीचा मूळ अर्ज केला होता, त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती त्यावेळी तयार नव्हती, कारण अशाप्रकारच्या नोंदी घेण्याची, अभिलेखे जतन करुन ठेवण्याची पध्दत किंवा या नोंदी एखाद्या विशिष्ट स्वरुपात करुन ठेवण्याची पध्दत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये रुढ नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली माहिती बरोबर आहे. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर त्यांनी ही माहिती नव्याने तयार करुन ठेवली आहे. त्यामुळे आता जर ही माहिती अपिलार्थीस हवी असेल तर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून,ते म्हणतात त्याप्रमाणे, ती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. तसेच आज रोजी सुनावणीमधील युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना संदर्भित कामाची मुदत चुकीची कळविली गेली आहे, असे आयोगास अवगत केले. या मुद्यावर अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी काम पूर्ण करण्याचा कळविलेला कालावधी, प्रत्यक्षात काम पूर्ण होण्यासाठी लागलेल्या कालावधीपेक्षा कमी आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती त्यांना पुरविणे अभिप्रेत आहे. तसेच प्रत्येक

कामाच्या स्वरुपानुसार व परिस्थितीनुसार काम पूर्ण होण्यास, प्रत्यक्ष करारनाम्यामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये कमी-अधिक बदल होत असतात. त्यामुळे प्रत्यक्षात जरी अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, केलेल्या कामाकरिता त्यांना कळविलेल्या वेळेपेक्षा वेळ जास्त लागला असला तरीही जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यामध्ये या कामासाठी पूर्ण करण्याची मुदत जितकी दर्शविली आहे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कळविली आहे. त्यामुळे या मुद्यावरील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेली माहिती बरोबर आहे.

या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ ची जन माहिती अधिकारी यांनी आता नव्याने तयार करुन ठेवलेली माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात समक्ष उपस्थित राहून, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क उपलब्ध करुन घ्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना कोणत्या माध्यमाद्वारे (जसे : व्यक्तिशः/ टपालाद्वारे/नोंदणीकृत टपालाद्वारे) माहिती अपेक्षित आहे, याचा खुलासा केलेला नाही, त्यामुळे ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक शुल्कासह समक्ष उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांपर्यंत पूर्वनियोजित वेळी सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः १६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धनंजय उत्तमराव ढाकरे,'प्रेरणा', प्लॉट क्र. ३०४, जिजामाता नगर, मु.पो. ता. जि. हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक,नगर परिषद, हिंगोली,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७९०
निर्णय दिनांक: १६-०२-२०१०

१. श्री. बाळासाहेब नानासाहेब सोनवणे, : अपिलार्थी
रा.एरंडोली, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
कुकडी सहकारी साखर कारखाना लि.,
पिंपळगांवपिसा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२२.०७.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, कुकडी सहकारी साखर कारखाना लि., पिंपळगांवपिसा, ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि.१२.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.८१३/- इतके त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि जन

माहिती अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २४.१०.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधितांकडून दि.२३.१०.२००८ रोजी उपलब्ध झाली असल्याचे नमूद करुन अपिलार्थीचे अपील खारीज केले. यानंतर चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. १६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर  हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘सार्वजनिक प्राधिकरण’ या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.७९०/०९ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १६-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब नानासाहेब सोनवणे, मु.पो.एरंडोली, ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

२. कार्यकारी संचालक, कुकडी सहकारी साखर कारखाना लि., पिंपळगांवपिसा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), लालटाकी, त्रिलोक बिल्डींग, ३ रा मजला, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२४
निर्णय दिनांक: १६-०२-२०१०

१. श्री. दिपक बाळासाहेब कुऱ्हाडे, : अपिलार्थी
रा.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. सचिव, : प्रतिवादी
अहमदनगर जिल्हा मजुर सहकारी संस्थाचा संघ
मर्या., अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. सुरेश जाधव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.११.०८.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, अहमदनगर जिल्हा मजुर सहकारी संस्थाचा संघ मर्या., अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास सदर संस्थेच्या व्यवस्थापकांनी त्यांच्या दि.१०.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९

(१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. १६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित संस्थेचे सचिव व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

संबंधित संस्थेच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, मा.उच्च न्यायालयाने त्यांनी दाखल केलेल्या याचिका क्रमांक २४२६/२००९ मध्ये कनिष्ठ कोर्टाने त्यांच्या संस्थेस माहिती अधिकार कायदा लागू होत असल्याच्या दिलेल्या निर्णयास स्थगिती दिली आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने डॉ.पंजाबराव अर्बन को-ऑप. बँक विरुध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणात सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही, असा निर्णय दिला आहे. यावरुन सहकारी संस्थांना माहिती अधिकार लागू होत नसल्याने अपिलार्थीचे अपील रद्द करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित मजूर सहकारी संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore,**

**Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२२४/०८ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः १६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिपक बाळासाहेब कुऱ्हाडे, वार्ड नं.७, सुर्यानगर, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

२. सचिव, अहमदनगर जिल्हा मजुर सहकारी संस्थाचा संघ मर्या., श्रमसहकार, सहकार सभागृह रोड, मार्कंड यार्ड मागे, अहमदनगर-४१४००१.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७८
निर्णय दिनांक: १६-०२-२०१०

१. श्री. एकनाथ चंद्रभान घोगरे, : अपिलार्थी
रा. लोणी खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगर, ता.राहाता, जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१९.०७.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगर, ता.राहाता, जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि. २२.०८.२००७ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (च) नुसार संबंधित साखर कारखाना हा सार्वजनिक प्राधिकरणामध्ये समाविष्ट

होत नसल्याने, माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १४.११.२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आवश्यक ते शुल्क आकारुन १५ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगर यांना आदेशित केले. तथापि यानंतर माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. १६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर  हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि. १४.११.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२८७८/०७ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि. १४.११.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: १६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एकनाथ चंद्रभान घोगरे, मु.पो. लोणी खुर्द, ता.राहाता, जि. अहमदनगर.

२. कार्यकारी संचालक, पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगर, ता.राहाता, जि.अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), त्रिलोक चेंबर्स, ३ रा मजला, लालटाकी रोड, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७३
निर्णय दिनांक १६-०२-२०१०

१ श्री. अशोक बाबुराव लहाने, : अपिलार्थी
मु. जवखेडा (ठेंग), पो. वरुड (खुर्द), ता. जाफ्राबाद,
जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत, जवखेडा (ठेंग), ता.
जाफ्राबाद, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
जाफ्राबाद, जि. जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ३१-०१-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने

असे नमूद केले आहे की, त्यांना ग्रामपंचायतीकडून आवश्यक असलेली सर्व माहिती प्राप्त झाली असून, सदरील प्रकरण रद्द करण्यात यावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेली त्यांचे द्वितीय अपील रद्द करण्याची विनंती, आयोग मान्य करीत असून, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ५७३/२००९, दिनांक २४-०२-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक बाबुराव लहाने, मु. जवखेडा (ठेंग), पो. वरुड (खुर्द), ता. जाफ्राबाद, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जवखेडा (ठेंग), ता. जाफ्राबाद, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७८

निर्णय दिनांक १६-०२-२०१०

१ श्री. बजरंग सटवाजी साखरे, : अपिलार्थी
मु.पो. धनगर टाकळी, ता. पूर्णा, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास (ग्रामसेवक) अधिकारी, ग्रामपंचायत
धनगर टाकळी, ता. पूर्णा, जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
पूर्णा, जि. परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत धनगर टाकळी, ता पुर्णा, जि. परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे धनगर टाकळी ग्रामपंचायत येथील नोव्हेंबर २००७ ते दि. २१-

१०-२००८ या पर्यंतच्या कालावधीतील झालेल्या ग्रामसभा व महिलासभेच्या संदर्भात नोटीसाच्या बुकाची सत्यप्रत, कार्यवृत्तांतची सत्यप्रत आणि ग्रामपंचायतीने केलेली कामे, त्याकरीता आलेला निधी व झालेला खर्च, ग्रामपंचायतीच्या बँक खात्याचा उतारा, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ३०-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्व माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले. तथापि या माहितीमध्ये धनगर टाकळी येथील दिनांक २६-०१-२००८ रोजी झालेल्या ग्रामपंचायतीच्या सभेच्या इतिवृत्ताचा समावेश नसल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. त्यांनी पुढे आयोगास असे अवगत केले की, संबंधित ग्रामसेवक श्री. गायकवाड यांच्याकडून दिनांक २८-०८-२००८ रोजी इतिवृत्त असलेले अभिलेखे गहाळ झाले. परंतु त्यांनी पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन पूर्णा येथे दिनांक ०४-०९-२००८ रोजी म्हणजे उशिराने फिर्याद दाखल केली असून, त्या फिर्यादीची प्रत त्यांना प्राप्त झाली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, याच ग्रामपंचायतीच्या सभेमध्ये चाळीस हजार रुपये इतक्या रकमेचा भ्रष्टाचार झालेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्यांना माहिती देऊ केली असता त्यांनी प्रथमतः माहिती घेण्याचे नाकारले,

त्यामुळे दिनांक १३-०२-२००९ रोजी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादावर, अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ग्रापंचायतीच्या दिनांक २६-०१-२००८ रोजीच्या सभेचे इविवृत्त वगळता उर्वरित सर्व माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले. जन माहिती अधिकारी यांनी यावर असे स्पष्ट केले की, तत्कालीन ग्रामसेवक श्री. गायकवाड यांनी त्यांच्या ग्रामपंचायतीचे दिनांक २६-०१-२००८ रोजीचे ग्रामसभेचे इतिवृत्त असल्याचे अभिलेखे गहाळ झाली असल्याची पोलिस फिर्याद दिली असून, पोलिसातर्फे त्यावर कार्यवाही चालू आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने मा. उच्च न्यायालयात धाव घेतली असून, सदर प्रकरण उच्च न्यायालयाकडे प्रलंबित आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकाऱ्यांकडे उपलब्ध असलेली माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. जी माहिती अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे, ती माहिती तत्कालीन ग्रामसेवक श्री. गायकवाड यांच्या हातून गहाळ झाली असून, या प्रकरणी श्री. गायकवाड यांनी पोलीस स्टेशन पूर्णा येथे दिनांक ०४-०९-२००८ रोजी फिर्याद दाखल केली असून, त्या दाखल केलेल्या फिर्यादीची प्रत देखील त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. आता ही माहिती अपिलार्थीस, ज्यावेळी पोलिसांकडून जन माहिती अधिकारी यांना संबंधित अभिलेखे प्राप्त होतील, त्याचवेळी प्राप्त होऊ शकेल. अपिलार्थीस आवश्यक ती उर्वरित सर्व माहिती आता मिळाली असून, गहाळ झालेल्या अभिलेख्यांच्या संदर्भात अपिलार्थीने मा. उच्च न्यायालयाकडे धाव घेतली आहे, तेथे देखिल अपिलार्थीचे प्रकरण प्रलंबित आहे. हे पाहता, अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बजरंग सटवाजी साखरे, मु.पो. धनगर टाकळी, ता. पूर्णा, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत धनगर टाकळी, ता पुर्णा, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५८०

निर्णय दिनांक १६-०२-२०१०

१ श्री. संजय रामकृष्णराव कुलकर्णी, : अपिलार्थी
रा."द्वारकाई" नानलपेठ, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शिरस्तेदार, कार्यालय अधीक्षक भूमि अभिलेख, परभणी

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक भूमि अभिलेख, परभणी

त्रयस्थ पक्ष : श्रीमती हेमलता प्र. पारवेकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे, आणि त्यांच्या अपील अर्जावर दिशाभूल करणारा आदेश निर्गमित केला गेला असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी  यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्रीमती हेमलता प्र. पारवेकर यांच्या निमताना मोजणी प्रकरणासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराशी संबंधित वेगवेगळ्या सहा मुद्यांद्वारे डिसेंबर ०७ ते जुन ०८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली.  तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे  दिनांक २२-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीने सदर अपील उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे केले होते.  तथापि या प्रकरणी ते अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज अधीक्षक, भूमि अभिलेख, परभणी यांच्याकडे पाठविला.  या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाचा या प्रकरणी त्यांनी यापुर्वीच निर्णय घेतला असल्यामुळे, अपिलार्थीचे अपील निकाली ठेवण्यात आल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १५-११-२००८ रोजीच्या पत्राने कळविले.  जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे  सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, मुद्दा क्रमांक ३ व मुद्दा क्रमांक ४ मधील चौकशी अहवालाच्या प्रती आणि मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०८-२००८ रोजी सर्व मुद्देनिहाय माहिती टपालाने पाठविली आहे. अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती पाठविली अशी आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीची प्रत त्यांच्याकडे सध्या उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरीच त्यांना अपेक्षित माहिती दिली आहे किंवा कसे अथवा दिलेली माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद हे आयोगासमोर उपस्थित आहेत. सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे ठरविण्यात आले आहे की, उपसंचालक, भूमि अभिलेख हे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची तपासणी करतील आणि दिनांक २०-०२-२०१० रोजी पुर्वनियोजीत वेळी दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस ही माहिती पुर्णतः हस्तांतरीत करतील, याला अपिलार्थीने होकार दर्शविला आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक २०-०२-२०१० रोजी व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची माहिती त्यांना दिनांक २०-०२-२०१० रोजी विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय रामकृष्णराव कुलकर्णी, रा.छद्वारकाईछ नानलपेठ, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, कार्यालय अधीक्षक भूमि अभिलेख, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, परभणी यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६३९

निर्णय दिनांक १६-०२-२०१०

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, : अपिलार्थी
रा. रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी
मस्जीद समोर, देगलूर रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देगलूर, जि. नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. एम. जे. तोडकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, सदरचे अपील त्यांना विलंबाने माहिती मिळाली असल्यामुळे व त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे केले

असल्याचे नमूद केले आहे व या अपील अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः श्री. एम.जे. तोडकर मार्ग लिपीक, रुपांतरीत आस्थापना यांच्या नेमणूकीपासून ते दिनांक ३१-०७-२००८ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १४-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २२-०९-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले आणि अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाप्रमाणे माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिनांक २७-०१-२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारकरित्या प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाने त्यांच्याकडे सादर न केल्यामुळे त्यांना अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती देता आली नाही.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, ते रुपांतरीत आस्थापनेवरील रोड कारकून या पदावर कार्यरत असून ते नांदेड, सार्वजनिक बांधकाम मंडळ या कार्यालयात मुख्य लिपीकाचे सहायक म्हणून काम करत असतात. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीप्रमाणे त्यांनी त्यांच्या कार्यविवरणाची नोंद ठेवलेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. एम.जे. तोडकर यांच्या कार्य विवरणाची नोंदवही व मासिक हजेरी प्रमाणपत्राच्या सांक्षांकित व वाचनीय प्रती मागितल्या होत्या. श्री. तोडकर यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी मूळात त्यांच्या कार्य विवरणाची नोंदवही ठेवली नसल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकणार नाही. परंतु त्रयस्थ पक्षाच्या हजेरी प्रमाणपत्राची प्रत किंवा त्रयस्थ पक्षाची हजेरी ज्या पत्रकामध्ये नोंदविली आहे अशा पत्रकाच्या, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधीमधील प्रती, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील. जर त्रयस्थ पक्षाच्या हजेरीच्या नोंदी जन माहिती अधिकारी यांनी घेतल्या नसतील तर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तशी वस्तुस्थिती कळवावी लागेल. या विवेचनाच्या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

प्रसांगावशात, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील आस्थापना विषयक बाबीच्या संदर्भात आयोगाकडे वारंवार अपील दाखल करीत असतात. त्यांचा मूळ आक्षेप क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना कार्यालयातील काम करण्याच्या सूचना देण्याच्या कार्यपध्दतीवर आहे, असे आयोगास आढळून आले आहे. त्यांनी आयोगाच्या एका सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आणले होते की, मुख्य अभियंत्यांनी क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना कार्यालयामध्ये कार्यालयीन कामाकरिता नेमणूका देऊ नये, असे आदेशित करुनही नांदेड सार्वजनिक बांधकाम मंडळामध्ये मुख्य अभियंत्यांचे आदेश धुडकावून लावून सध्या अशाप्रकारे काम केले जात आहे. या प्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या मुद्यावर मुख्य अभियंता कार्यालयातर्फे, नांदेड सार्वजनिक बांधकाम मंडळ विभागाच्या या कार्यपध्दतीसंदर्भात, त्यांना आवश्यकता वाटल्यास, चौकशी करुन योग्य त्या उपाययोजना कराव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमधील मुद्दा क्रमांक ४ मधील देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी मस्जीद समोर, देगलूर रोड, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देगलूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२७
निर्णय दिनांक: १७-०२-२०१०

१. श्री. चामे अंकुश रामचंद्र, : अपिलार्थी
रा. चिखली, ता.अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, चिखली
ता.अहमदपूर,जि.लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, अहमदपूर,जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०२.२०१० रोजी प्राप्त झालेले पत्र आयोगास सादर करण्यात आले. सदर पत्र अपिलार्थीने दि. १५.०२.२०१० रोजी आयोगास उद्देशून लिहिले असून या पत्रामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी

यांच्याकडून त्यांच्या मागणीनुसार माहिती प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे व विचाराधीन अपिलासंदर्भात त्यांची काहीही तक्रार नसल्याने अपिलाची तारीख रद्द करण्यात यावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त झाली असून प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्यामुळे त्यांची विनंती मान्य करुन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ६२७/०९, दि. १९.०३.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चामे अंकुश रामचंद्र, मु.पो.चिखली, ता.अहमदपूर, जि.लातूर-१४३ ५२३.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,चिखली, ता.अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२८
निर्णय दिनांक: १७-०२-२०१०

१. श्री. जे. पी. औसेकर, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा रुग्णालय, लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अधीक्षक,
जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,
लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीच्या आत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेश व्हावेत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे. यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन अंतर्गत सन २००८ मध्ये केल्या गेलेल्या नोकरभरतीमधील जागेंची संख्या, याकरिता ज्या वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली होती, त्या जाहीरातीची झेरॉक्स प्रत, लेखी परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची यादी,

एकूण अर्ज केलेल्या उमेदवारांची यादी व यामध्ये आरक्षण पध्दत होती किंवा नाही, त्या जी.आर.ची प्रत, या मुद्यांचा समावेश आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये वरील मुद्यांशिवाय इतर अनुषंगीक मुद्यांद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून 'व्यक्तिशः' माहिती मागितली होती. तथापि विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०३.२००९ रोजी निर्णय देऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि, यापूर्वीच अपिलार्थीने दि. १७.०३.२००९ रोजी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व  जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले, तथापि त्यांनी अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती दिली, यासंदर्भात कोणतीही माहिती त्यांना आयोगासमोर सादर करता आली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती दिल्याचा त्यांचा युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या वरील पाच मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक,आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या पाच मुद्यांमधील संपूर्ण माहिती त्यांना,हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः १७-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जे. पी. औसेकर,दैनिक देवदर्शन कार्यालय, जिल्हा परिषदेच्या पाठीमागे, पशुसंवर्धन कार्यालयाजवळ, शामनगर,लातूर,ता.जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, ग्रामीण रुग्णालय सेल,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य भवन, सेंट जॉर्ज हॉस्पीटल कम्पाउंड, छत्रपती शिवाजी टर्मिनसजवळ, मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२९
निर्णय दिनांक: १७-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. वाकडे माणिक त्रिंबकराव, रा.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जावर अपिलार्थीने दि. २१.०२.२००९ असा दिनांक दर्शविला आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. १६.०२.२०१० रोजीचे पत्र आयोगास फॅक्सद्वारे प्राप्त झाले असून, यामध्ये अपिलार्थीने, विचाराधीन अपिलाशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २३.०२.२००९ रोजी प्राप्त झाली आहे व प्राप्त माहितीबाबत त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे, अशी त्यांनी विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर प्राप्त झाली असल्याचे मान्य केले असल्यामुळे, त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ६२९/०९, दि. २५.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वाकडे माणिक त्रिंबकराव, बोधेनगर, सुत मिल रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, लातूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६३०
निर्णय दिनांकः १७-०२-२०१०

१. श्री. भगवंत नारायण कुलकर्णी, : अपिलार्थी
रा.इट्टी, पो. पोहरेगाव,ता.रेणापूर,जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा क्रीडा अधिकारी,
लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
क्रीडा व युवा सेवा, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००७ ते दि. ३१.१०.२००८ या कालावधीतील अनुदान वाटपासंदर्भात काही माहिती 'व्यक्तिशः' मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना काही वेळ लागणार

असल्याचे कळवून अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात पंधरा दिवसांची मुदतवाढ अपिलार्थीस मागितली. तथापि ती माहिती याही मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०२.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि, यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस माहिती दिल्याचा युक्तिवाद केला. तथापि त्यांना अपिलार्थीस दिलेल्या माहितीसंदर्भात कोणतीही कागदपत्रे आयोगासमोर सादर करता आली नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्याची जबाबदारी संबंधित जन माहिती अधिकारी यांची आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असताना देखील अपिलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन न देऊन, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक,( क्रीडा व युवक सेवा),पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
३. संचालक (क्रीडा व युवक सेवा), म.रा.पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: १७-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भगवंत नारायण कुलकर्णी,रा.इट्टी, पो. पोहरेगाव,ता.रेणापूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक (क्रीडा व युवक सेवा), मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७९१
निर्णय दिनांक: १७-०२-२०१०

१. श्री. सुरेश मुरलीधर लोखंडे, : अपिलार्थी
रा.राहुरी, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी संचालक,
डॉ.बा. बा.तनपुरे सहकारी साखर कारखाना लि.,
श्रीशिवाजीनगर, ता.राहुरी, जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या जन माहिती अधिकाऱ्यावर कठोर कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, डॉ.बा.बा.तनपुरे सहकारी साखर कारखाना लि., श्रीशिवाजीनगर, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि. ०६.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पूर्ण स्वरुपात नसल्याने काय माहिती द्यावी याचा बोध होत नसल्याने, माहिती देणे शक्य

नसल्याचे अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. यानंतर दि. १३.०१.२००९ रोजीच्या निर्णयाविरुध्द व माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी कारणे दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. १७.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व संबंधित साखर कारखान्याचे सचिव व प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.७९१/०९ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः १७-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश मुरलीधर लोखंडे, मु.पो. राहुरी फॅक्टरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

२. कार्यकारी संचालक, डॉ.बा.बा.तनपुरे सहकारी साखर कारखाना लि., श्रीशिवाजीनगर, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), त्रिलोक चेंबर्स, लालटाकी रोड, हुतात्मा स्मारकाजवळ, अहमदनगर.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७९२
निर्णय दिनांक: १७-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. विजय सुधाकर जाधव,<br>रा.टाकळी (सातचारी), ता.कोपरगांव,<br>जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. कार्यकारी संचालक,<br>दि कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि.,<br>गौतमनगर, पो. कोळपेवाडी, ता.कोपरगांव,<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक सहसंचालक (साखर),<br>अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयाकडे दि.१७.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकाऱ्यावर कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.२५.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि.१८.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थी कारखान्याचे सभासद नसल्याने व त्यांनी आवश्यक माहितीची होणारी नक्कल फी अर्जासोबत पाठविली

नसल्याने, अपिलार्थीचा अर्ज कायदेशीर होत नसल्यामुळे तो रद्द करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने साखर संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २०.०२.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्र.१ ते ६ च्या संदर्भातील माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर यांना आदेशित केले. यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. १७.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘सार्वजनिक प्राधिकरण’ या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि.२०.०२.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.७९२/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि.२०.०२.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय सुधाकर जाधव, मु.पो. टाकळी (सातचारी), ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

२. कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, पो.कोळपेवाडी, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), त्रिलोक चेंबर, हुतात्मा स्मारकाजवळ, लालटाकी रोड, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२५
निर्णय दिनांक १७/०२/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भाऊसाहेब धोंडीराम सानप,<br>रा.साकत, ता.जामखेड, जि. अहमदनगर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी,<br>किसानवीर सातारा सहकारी साखर कारखाना लि.,<br>भुईंज, ता.वाई, जि.सातारा. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>चेअरमन व मॅनेजर,<br>किसानवीर सातारा सहकारी साखर कारखाना लि.,<br>फोईज, ता.वाई, जि.सातारा | | |

**निर्णय**

श्री. भाऊसाहेब धोंडीराम सानप यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २६.०३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०७.०४.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.०७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १४० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :     १७/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.  भाऊसाहेब धोंडीराम सानप, मु.पो.साकत, ता.जामखेड, जि.अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६१९

निर्णय दिनांक १७-०२-२०१०

१ श्री. महंमद अवैस अहेमद महंमद हमीद, : अपिलार्थी
रा. प्लॉट नं. १६/बी, टाइम्स कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
मतदान विभाग (इलेक्शन विभाग), महानगरपालिका,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
मतदान विभाग (इलेक्शन विभाग), महानगरपालिका,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून आले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, " प्रभाग क्रमांक ४०, नवाबपुरा येथील नगरसेवकाने इलेक्शन

विभागात सादर केलेली व्यक्तिगत माहिती, सर्व खर्चाच ब्यौरा आणि इतर सर्व माहितीची प्रमाणित नक्कल," अशाप्रकारची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २७-०१-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. परंतु यानंतर दिनांक २०-०३-२००९ रोजी अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे योग्य राहिल, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अथवा या प्रकरणाशी संबंधित नियुक्त केल्या गेलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

अपिलार्थीचे या आदेशाने समाधान न झाल्यास, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत ते राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महंमद अवैस अहेमद महंमद हमीद, प्लॉट नं. १६/बी, टाइम्स कॉलनी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी, मतदान विभाग (इलेक्शन विभाग), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, मतदान विभाग (इलेक्शन विभाग), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२०

निर्णय दिनांक १७-०२-२०१०

१ श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, : अपिलार्थी

रा. एन - ६, सिडको, ई - २३/१०, संभाजी कॉलनी,

नवीन औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

अमरज्योती अध्यापक विद्यालय, हर्सूल, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्राचार्य, अमरज्योती अध्यापक विद्यालय, हर्सूल, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी  यांच्याकडे, त्यांच्या अध्यापक विद्यालयाच्या संबंधित काही माहिती एकूण १७ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. तथापि ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १०-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि हा कालावधी व्यपगत होऊनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे  सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकरी यांच्याकडून दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती प्राप्त झाली आहे. तथापि प्राप्त माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ८, ९, ११ व १२ या मुद्याशी संबंधित माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व ९ शी संबंधित माहिती त्यांच्या विद्यालयाच्या सनदी लेखापालाकडे उपलब्ध आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ११ व १२ शी संबंधित माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे भाष्य केले की, त्यांनी त्यांच्या शाळेतील शिक्षकांच्या जातीच्या प्रमाणपत्राची  पडताळणी अद्यापपावेतो संबंधित प्राधिकरणाकडून करुन

घेतलेली नाही. शिक्षण उपसंचालकांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, सदर शिक्षण संस्था ही कायमस्वरुपी विनाअनुदानित शिक्षण संस्था आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व ९ शी संबंधित माहिती संबंधित शाळेच्या लेखापालाकडे उपलब्ध आहे. परंतु ती प्राचार्यांच्या ताब्यात नसल्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, ही माहिती जरी शाळेच्या संबंधित सनदी लेखापालाकडे उपलब्ध असली तरी संबंधित सनदी लेखापाल हे शाळेचे नियमीत सेवक नाहीत. ही माहिती संबंधित लेखापालाकडून प्राप्त करुन घेवून नंतर ती अपिलार्थीस देणे, विद्यालयाच्या प्राचार्यांना सहज शक्य आहे. त्यामुळे आता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व ९ शी संबंधित माहिती शाळेच्या सनदी लेखापालाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ द्वारे अपिलार्थीने 'जन माहिती अधिकारी यांच्या विद्यालयाच्या इमारतीचा बांधकाम परवानगी मंजूर नकाशा व भोगवटा प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत' अशी माहिती मागविली होती. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला आहे की, सदरची शाळा ही भाड्याच्या इमारतीत असल्यामुळे, ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही व ही वस्तुस्थिती त्यांनी अपिलार्थीस कळवली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, 'शाळेची इमारत भाड्याची आहे', एवढीच माहिती दिली आहे. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या संदर्भातील वरील वस्तुस्थिती अपिलार्थीस कळविणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात ही वस्तुस्थिती स्पष्ट करणारी माहिती अपिलार्थीस द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. मुद्दा क्रमांक ११ व १२ च्या बाबतीत -

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणीच्या मुद्यावरील दिनांक ०६-१०-२००८ रोजीची स्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविणे गरजेचे आहे. या सर्व मुद्यांवरील माहिती ८ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ८, ९, ११ व १२ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. शिक्षण उपसंचालक यांनी, जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस या कालावधीमध्ये माहिती पुरवतील असे पहावे. जर या कालावधीमध्ये या संस्थेने अपिलार्थीस माहिती दिली नाही तर या संस्थेवर नियंत्रण असलेल्या स्टेट कॉन्सील ऑफ एज्युकेशन यांच्याकडे त्यांनी या शिक्षण संस्थेच्या प्रशासकीय कार्यवाही संदर्भात योग्य ती शिफारस करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ८, ९, ११ व १२ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, एन - ६, सिडको, ई - २३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरज्योती अध्यापक विद्यालय, बेरीबाग, हर्सूल, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२१

निर्णय दिनांक १७-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विष्णु जनार्दन काटोटे,<br>रा. एन - ६, एफ - १७/१, विठ्ठल रुखमाई मंदीरासमोर,<br>सिडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या<br>जमाती विकास महामंडळ, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>महाव्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या<br>जमाती विकास महामंडळ, मुंबई | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : व्यवस्थापक, वित्त लेखा, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध असताना देखिल मुद्दाम माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या महामंडळाच्या संबंधित एकूण ७ मुद्यांद्वारे रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - काही लाभार्थीची प्रकरणे स्टेट बँक ऑफ हैद्राबादकडे पाठवली व काही पाठवली नाहीत, असा दुजाभाव का केला याचा पुराव्यासहीत खुलासा करावा, वर्ष २००८ - २००९ या आर्थिक वर्षात महामंडळाला दिलेल्या उद्दिष्टांची बँक निहाय यादी, प्रकरण उशिरा पाठविल्याचे स्पष्टीकरण, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केव्हापासून बजेट नाही याचा खुलासा, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांची नावे आणि त्या कशा प्रकारे राबविण्यात येतात याची माहिती, २००८ - ०९ या वर्षामध्ये २७ डिसेंबर पर्यंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात बीज भांडवल योजनेची किती प्रकरणे प्राप्त झाली, कोण कोणत्या शाखेला किती प्रकरणे पाठविली व किती प्रकरणे प्रलंबित आहेत व २००७ , २००८ या आर्थिक वर्षातील बीज भांडवल किती, महामंडळाने किती लाभार्थ्यांना कर्ज वाटप केले व किती रकमेत केले त्या लाभार्थ्यांची नावे व दिलेली रक्कम - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती खाजगी कुरीअरमार्फत अपिलार्थीस पाठविली होती. तथापि लाभार्थी हे त्यावेळी त्यांना दिलेल्या पत्त्यावर उपस्थित नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी

पाठविलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यास संबंधित कुरीअर संस्थेने परत केली. मध्यंतरीच्या काळात अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात दिनांक २९-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न घेतल्यामुळे व अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद आयोगास लेखी स्वरुपात सादर केला असून, या युक्तिवादामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी व तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना निर्धारीत वेळेत माहिती न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची आणि शिस्तभंगाची कार्यवाही व्हावी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा व शर्तीनुसार चौकशीच्या कारवाईस्तव आदेश द्यावेत तसेच त्यांच्या झालेल्या खर्चाची रक्कम प्राधिकरणाकडून त्यांना मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्या कार्यालयाकडे माहिती मागितली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी या पदावर श्रीमती सु.वा. वानवे या महिला कर्मचारी कार्यरत होत्या. आता त्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या असून त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी दिनांक ३०-०१-२००९ रोजी काही माहिती पाठविली होती.

तथापि अपिलार्थी हे जागेवर हजर नसल्याने त्यांच्या कार्यालयाचे पत्र संबंधित कुरीअरने त्यांना परत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सदरचे कुरीअर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी दिलेल्या पत्त्यावर दिनांक ३०-०१-२००९ रोजी "फ्लायकिंग कुरीअर असोसिएट संतोष एरवेज" या कुरीअर कंपनीमार्फत पाठविल्याचे आयोगास आढळून आले आहे. या कुरीअरच्या प्रतिनिधीने, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या पाकिटावर "डोअर लॉक" असे दिनांक ३१-०१-२००९ रोजी अभिप्राय देऊन सदरचे कुरीअर जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत केल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाबद्दलचे स्पष्टीकरण मागणे आणि त्यांच्या कृतीचे खुलासे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियेचा या अधिनियमामध्ये समावेश होत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. मात्र उर्वरित ५ मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ वगळता उर्वरित

सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने दिनांक २९-०१-२००९ रोजी या महामंडळाच्या जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी केलेल्या अपील अर्जावर सुनावणी न झाल्यामुळे अपिलार्थीस आयोगाकडे द्वितीय अपील करावे लागले आणि त्यांना आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करण्याचा व सुनावणीस हजर राहण्याचा खटाटोप करावा लागला. या प्रकरणी त्यांना मनस्ताप झाला असणार हे उघड आहे. तथापि या मनस्तापाला या महामंडळाच्या मुंबई विभागाचे महाव्यवस्थापक व्यक्तिशः जबाबदार असल्याचे आयोगास आढळून आले आहे. आयोगाकडे यापूर्वी वेळोवेळी या महामंडळासंदर्भात दाखल झालेल्या अनेक द्वितीय अपील अर्जावरुन या महामंडळाच्या प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडून प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्यासाठी टाळाटाळ केली गेली असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. माहिती अधिकार कायद्याचे गांभीर्य व त्यामध्ये विहित केलेल्या कालावधीचे विशिष्ट महत्त्व लक्षात घेता, सचिव, (सामाजिक न्याय) यांनी या प्रकरणी लक्ष घालणे अत्यावश्यक असल्याचे आयोगास वाटते. सबब सचिव, सामाजिक न्याय यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व महामंडळाच्या माहिती अधिकाऱ्यांच्याकरिता आणि अपिलीय अधिकाऱ्यांच्याकरिता, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा आयोजित कराव्यात. सदर सूचना सचिव, सामाजिक न्याय यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (पाच) च्या तरतुदीनुसार देण्यात येत आहेत. तसेच या प्रकरणी या महामंडळाच्या महाव्यवस्थापकाने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेऊन दर्शविलेल्या त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी या आता नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्यावर अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे कार्यवाहीचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विष्णु जनार्दन काटोटे, एन - ६, एफ - १७/१, विठ्ठल रुखमाई मंदीरासमोर, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक, वित्त लेखा, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२२

निर्णय दिनांक १७-०२-२०१०

१ श्री. संतोष रामदास करपे, : अपिलार्थी

रा. साळीवाडा, मु. पो. ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक प्रकल्प अधिकारी, (सनियंत्रण) जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही होण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील अयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील, स्वर्ण जयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेअंतर्गत "केंद्रीय एकवेळ अर्थसहाय्य" या योजनेतून सन २००४ ते २००८ या कालावधीमध्ये बांधण्यात आलेल्या व्यापारी गाळयांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - औरंगाबाद जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये हे गाळे केव्हा पूर्ण झाले, त्यांचे वाटप झाले किंवा नाही, तालुकानिहाय या गाळयांसाठी किती मागणी अर्ज प्राप्त झाले व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने गाळे वाटप करण्यासाठी आदेश पारित केले असल्यास त्या आदेशाची प्रत - आणि इतर मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०१-२००९ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. सुनावणीच्या वेळी औरंगाबाद जिल्ह्यातील औरंगाबाद, पैठण, कन्नड या पंचायतीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस दिनांक ०८-०२-२००९ पर्यंत देण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आणि जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. जी.आर. वायाळ नावाचे सहायक प्रकल्प अधिकारी असून त्यांना आज रोजी सुनावणीच्या वेळी हजर राहण्याच्या त्यांनी तोंडी सूचना देऊनही श्री. वायाळ आज रोजी सुनावणीच्या वेळी गैरहजर आहेत. सुनावणीच्या वेळी आयोगाच्या कार्यालयात येण्यासाठी त्यांनी श्री. वायाळ यांना गाडीत बसण्याच्या सूचना करुनही वायाळ हे त्यांच्या कार्यालयातून निघून गेले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस ते ८ दिवसाच्या आत संबंधित गट विकास अधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घेऊन ते देऊ शकतील. या प्रकरणी त्यांनी वेळोवेळी औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकाऱ्यांना लेखी सूचना देऊन व तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्याकडे पाठवूनही संबंधित गट विकास अधिकाऱ्यांकडून त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, विचाराधीन प्रकरणाशी संबंधित परिपूर्ण माहिती अद्यापपावेतो ते अपिलार्थीस देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागविली आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक १ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची माहिती नसून या प्रकरणाशी संबंधित माहितीचा तो एक विषय आहे, असे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून गाळे वाटपाचे निकष आजवर का करण्यात आले नाही, याला जबाबदार कोण, त्यांच्यावर काय कार्यवाही करणार याचा लेखी खुलासा, कामावर झालेला एकूण खर्च, मोजमाप पुस्तिकेच्या प्रती, अशा स्वरुपाची माहिती मागविली आहे. यातील या योजनेअंतर्गत तालुकानिहाय झालेला खर्च व संबंधित बांधकामाच्या

मोजमाप पुस्तिकेच्या प्रती ही माहिती वगळता उर्वरित कोणतीही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीने उर्वरित मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरणे, खुलासे व भविष्यकाळातील माहिती अपेक्षित करणारी माहिती असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशाप्रकरची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. त्यामुळे या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित मुद्यांवरील माहिती - औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये गाळे पूर्ण झाल्याची तारीख, वाटप झाले किंवा कसे याबाबतची सद्यःस्थिती, गाळ्यासाठी किती मागणी अर्ज प्राप्त झाले व पंचायत समिती स्तरावर प्रकल्प उपसंचालकांच्या कार्यालयाने गाळे वाटपासंदर्भात आदेश पारित केले असल्यास त्या आदेशाची प्रत, प्रत्येक गाळ्यावर झालेला खर्च, बांधकामाच्या मोजमाप पुस्तिकेच्या प्रती ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या या मुद्यांवर, हे आदेश निर्गमित होताच त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने प्रकल्प संचालकाकडे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे प्रत्यक्षात उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वेळोवेळी संबंधित गट विकास अधिकाऱ्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांचा पाठपुरावा केला. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी होईपर्यंत देखिल ती माहिती त्यांना संबंधितांकडून संपूर्णपणे प्राप्त होऊ शकली नव्हती. आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याकरता त्यांच्याकडे तयार असलेली माहिती आयोगास सादर केली असता, या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील गाळे पूर्ण

झाल्याचे दिनांक व गाळ्याच्या वाटपासंदर्भातील सद्यःस्थिती या मुद्यांवरील माहितीचा त्यामध्ये समावेश नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज देखिल अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पूर्ण स्वरुपात उपलब्ध नाही. यावरुन, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणाशी संबंधित औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात हेतूतः टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती उपलब्ध न होण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक म्हणजे औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील सर्व गट विकास अधिकारी हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व गट विकास अधिकाऱ्यांना राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीसाठी उपस्थित राहण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ०३-०२-२०१० रोजी अर्धशासकीय पत्र लिहून सूचना देऊनही कोणीही गट विकास अधिकारी आयोगाकडे सुनावणीच्या वेळी उपस्थित नाहीत. सहायक प्रकल्प अधिकारी (सनियंत्रण) जे या प्रकरणाशी जन माहिती अधिकारी म्हणून सरळ संबंधित आहेत ते देखिल आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांच्या सुनावणीच्या वेळेच्या अनुपस्थितीसंदर्भात आयोग तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना सहायक प्रकल्प अधिकारी श्री. वायाळ यांच्यावर त्यांनी आवश्यकता वाटल्यास प्रशासकीय कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. उर्वरित औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकाऱ्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध न करुन दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रत्येकी २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा

खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. या कालावधीमध्ये त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास हेतूतः टाळले असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जि. औरंगाबाद यांना उपरोक्त प्रकरणी प्रत्येकी २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊन नये याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतोष रामदास करपे, साळीवाडा, मु. पो. ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, (सनियंत्रण), जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जि. औरंगाबाद यांना (मार्फतः- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद. प्रत्येक गट विकास अधिकाऱ्यासाठी एक याप्रमाणे एकूण ९ प्रती) या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२३

निर्णय दिनांक १७-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शंकर दामोधर वैद्य,<br>रा. सिरनेर, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जलस्वराज्य प्रकल्प गट प्रमुख अधिकारी, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिका-याने, अपिलीय अधिका-याने दिनांक ०४-१०-२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळी निर्णय देऊनही, माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे जलस्वराज्य प्रकल्पाअंतर्गत झालेल्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम, पाईपलाईन व विहिरीच्या कामाच्या संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडे उपलब्ध आहे त्या समितीच्या अध्यक्षास पत्र देऊन, त्यांना अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतर अपिलार्थीस दिनांक ०४-०८-२००८ रोजी संबंधित समितीने माहिती पुरविली व ही माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीकडून पोच देखील त्यांनी प्राप्त करुन घेतली. परंतु यानंतर माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-१०-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत केले. या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने, अपिलार्थीस त्यांच्याकडील माहिती देण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय, सिरनेर येथे दिनांक २६-१२-२००८ रोजी सकाळी १०-०० वाजता उपस्थित राहण्याचे सूचित केले व त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३२४ इतके त्यांना भरावे लागेल याची त्यांना कल्पना दिली. परंतु अपिलार्थी हे संबधितांच्या सूचनेप्रमाणे ग्रामपंचायतीमध्ये उपस्थित राहिले नाहीत आणि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सर्व संबंधितांचे युक्तिवाद ऐकून घेण्यात आले. या युक्तिवादावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे संबंधित गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांच्या कार्यालयात कधी उपस्थित राहिले याचा कोणताही पुरावा त्यांना आज रोजी आयोगासमोर सादर करता आला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने ' व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यानंतर ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याची जबाबदारी ही अर्जदाराची असते. ती त्यांनी या प्रकरणी पार पाडली नाही, असे दिसून येत आहे. याचबरोबर अपिलार्थीने गट प्रमुख जलस्वराज्य प्रकल्प जालना यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०४-०८-२००८ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या अर्जासंदर्भातील सर्व कामांची माहिती त्यांना मिळाली असल्याचे आणि यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी कबूली पत्र दिले आहे. या पत्राचे अवलोकन केले असता अपिलार्थीस संबंधित गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडून दिनांक ०४-०८-२००८ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. तथापि यानंतरही अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २१-०८-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी दिनांक ०४-१०-२००८ रोजी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे आदेशित केले. त्याप्रमाणे संबंधितांनी अपिलार्थीस दिनांक २०-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सिरनेर ग्रामपंचायत येथे दिनांक २६-१२-२००८ रोजी उपस्थित राहून सशुल्क

माहिती हस्तगत करण्याचे सूचित केले. अपिलार्थी हे सिरनेर ग्रामपंचायत येथे दिनांक २६-१२-२००८ रोजी उपस्थित राहिले नाहीत आणि त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित अधिका-यांना अपिलार्थीस देण्यात येणारी माहिती निश्चितपणे किती पृष्ठांची आहे याची विचारणा केली असता, ते आयोगास यासंदर्भात काहीही सांगू शकले नाहीत. त्यांनी अपिलार्थीस कळविलेले शुल्क रुपये ३२४ हे अपिलार्थीने दोन स्वतंत्र अर्जांव्दारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित आहे असे आयोगास आढळून आले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कधीही नाकारलेले नाही. याउलट अपिलार्थीकडे ते संबंधित गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी गेले यासंदर्भातील कोणताही पुरावा उपलब्ध नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीसाठी ते अनुपस्थित राहिले आणि ही माहिती सशुल्क घेण्याच्या वेळी देखील अपिलार्थी हे सिरनेर ग्रामपंचायतीकडे दिनांक २६-१२-२००८ रोजी हजर झालेले नाहीत, हे पाहता, अपिलार्थीने या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (५) अन्वये विहित केलेले त्यांचे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. आजही अपिलार्थीस ही माहिती हवी असल्यास ती माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना हे तयार आहेत. अपिलार्थीस जर या माहितीची आजही आवश्यकता असेल तर त्यांनी गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांच्या कार्यालयात स्वतः पूर्वनियोजित वेळी जाऊन माहिती सशुल्क हस्तगत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांच्या सूचनांचे पालन न केल्यामुळे आणि आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्यामुळे त्यांना अपेक्षित माहिती संबंधितांकडून प्राप्त झाली नाही. अशा प्रकारे अपेक्षित माहिती प्राप्त होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १७-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शंकर दामोधर वैद्य, रा. सिरनेर, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२४

निर्णय दिनांक १७-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भगीरथ आण्णासाहेब नागरे,<br>मु. संगमजळगांव पो. रेवकी, तालुका गेवराई,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक उप निबंधक (रजिस्ट्रार) रजिस्ट्री ऑफीस<br>गेवराई जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा निबंधक रजिस्ट्री ऑफीस, बीड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | दुय्यम निबंधक, श्रेणी-१, गेवराई, जिल्हा बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, बीड |
| | त्रयस्थ पक्ष | : | श्री. धोंडीराम माधवराव बटुळे |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष " श्री. धोंडीराम माधवराव बटुळे यांनी सर्वे नंबर ८ मधील क्षेत्र २ एकरची रजिस्ट्री श्री. पालवे यांना करुन दिली आहे.  सन २००२ मध्ये त्याची प्रमाणित कॉपी देण्याची कृपा व्हावी " अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मागणी केलेल्या माहितीमध्ये संबंधीत गावाचा नावाचा उल्लेख नसल्याने व रजिस्ट्री क्रमांकाचा उल्लेख नसल्याने अपिलार्थीस माहिती देता येणे शक्य नसल्याचे त्यांना कळविले.  यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांना सदर तपशील कळविला.  यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २२० (प्रतिपृष्ठ रुपये वीस प्रमाणे अधिक मुद्रांक तिकिट रुपये वीस) इतके अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.  तथापि अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याने त्यांनी सदरचे शुल्क भरण्यास नकार दिला व अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००९ रोजी  प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०१-२००९ रोजी अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रुपये वीस नक्कल फीस दुय्यम निबंधक कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले.  जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील माहितीच्या प्रमाणित नकला त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य अपेक्षित असल्याचे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्रयस्थ पक्ष श्री. धोंडीराम माधवराव बटुळे यांनी श्री. पालवे यांना संगमजळगांव येथील दोन एकर क्षेत्राच्या दिलेल्या रजिस्ट्रीची प्रमाणित नक्कल त्यांना हवी असल्याचे आयोगास स्पष्ट केले. त्यांनी आयोगास पुढे असेही स्पष्ट केले की, शासनाच्या दिनांक ३०-१२-२००२ रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे प्रमाणित नक्कल देण्याकरिता त्यांच्या विभागाने या अधिसूचनेतील क्रमांक १५ मधील तरतुदी-प्रमाणे प्रतिपृष्ठ वीस रुपये इतके शुल्क निश्चित केले आहे. या नकलेच्या झेरॉक्स प्रती ते अपिलार्थीस विनामूल्य व साक्षांकीत करुन देण्यास तयार आहेत. परंतु अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील प्रमाणित नकलाच हव्या आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षाने त्यांच्या जमिनीच्या केलेल्या व्यवहाराच्या संबंधातील प्रमाणित नकला विनामूल्य अपेक्षित आहेत. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (५) च्या परंतुकातील तरतुदीनुसार दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. तथापि या तरतुदीअंतर्गत अर्जदारास जी माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य द्यावयाची आहे ती माहिती म्हणजे अर्जदाराने मागणी केलेल्या व जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या

माहितीच्या प्रमाणित प्रती ही होय. या माहितीच्या प्रतिपृष्ठाची किंमत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिनांक ३०-१२-२००२ च्या शासकीय अधिसूचनेव्दारे रुपये २० प्रतिपृष्ठ अशी निश्चित केली आहे. या अधिनियमामध्ये अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना मूळ प्रतीत देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या विभागामार्फत आधीच किंमत निश्चित केलेली माहिती विनामूल्य अपेक्षित आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील कलम २७ च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासंदर्भात शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११-१०-२००५ रोजी अधिसूचना क्रमांक आर. टी. आय. २००५/सिआर.३१५/०५/५ जारी केली असून त्यातील कलम ४ (१) मधील उपकलम (A) (a) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| (A) | (a) | When the concerned Department has already fixed the price of some documents, maps, etc. | The price so fixed plus postal charges. |

ही तरतूद पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्रयस्थ पक्षाच्या दस्ताच्या प्रमाणित नकला माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विनामूल्य प्राप्त होऊ शकणार नाहीत, मात्र या प्रमाणित नकलांची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (५) च्या परंतुकाप्रमाणे विनामूल्य प्राप्त होऊ शकेल. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून हव्या असलेल्या दस्ताच्या नकलांची किंमत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने शासनाच्या दिनांक ३०-१२-२००२ च्या अधिसूचनेव्दारे आधीच निश्चित केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रमाणित करुन देण्यासाठी त्यांच्या विभागाने एक किंमत (प्रतिपृष्ठ रुपये २०) वरील अधिसूचनेव्दारे निश्चित करुन ठेवली आहे. कारण या नकलेला मूळ माहितीचा दर्जा आहे. अपिलार्थीस या दस्तांची झेरॉक्स प्रत विनामूल्य देण्यासाठी जन माहिती अधिकारी तयार आहेत.

परंतु अपिलार्थीस अशा प्रकारच्या झेरॉक्स प्रतीची आवश्यकता नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षाच्या दस्ताची प्रमाणित नक्कलच हवी आहे. मात्र यासंदर्भात त्या विभागाने निश्चित केलेल्या किंमतीइतके शुल्क भरण्याची त्यांची तयारी नाही. अपिलार्थीची ही भूमिका योग्य नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित स्वरुपात माहिती हवी असेल तर त्यांना, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने निश्चित केलेल्या शुल्काच्या किंमती एवढ्या रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी सूचना देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची आयोगाकडे केलेली विनंती आयोगास मान्य करता येण्यायोगी नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भगीरथ आण्णासाहेब नागरे, मु. संगमजळगांव पो. रेवकी, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१, गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, बीड यांना या निकालपत्रा-

तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२५

निर्णय दिनांक १७-०२-२०१०

१ श्री. मारुती दशरथ दुनगू, : अपिलार्थी

मु. चोपनवाडी पो. दिंद्रुड, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

पंचायत समिती कार्यालय, माजलगांव, तालुका

माजलगांव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, पंचायत समिती कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील

कलम २० (१) प्रमाणे शास्तीची व कलम २० (२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन १९९० ते २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन यासंदर्भात श्री. दशरथ रामभाऊ दुनगू यांच्या नावाचे त्यांचे दिनांक २०-०६-२००८ रोजीचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र सोबत जोडले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांच्या माहितीच्या मूळ अर्जासोबत जोडलेले दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र हे दुस-या व्यक्तीच्या नावाने असल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आणले व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १५,७९२ इतके त्यांना स्टेट बँक ऑफ हैद्राबादमध्ये चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि हा निर्णय मान्य न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना जास्त असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी या निर्णयाव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना देण्याचे अथवा तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती तपासणीसाठी गेले असता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती दाखविता आली नसल्याच्या कारणावरुन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही १८ वर्षाच्या कालावधीतील असल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस देण्यास जास्त खर्च येणार असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस या माहितीची तपासणी करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी दिनांक ०५-०३-२००९ रोजीच्या पत्राने कळविले. तथापि या पत्रामध्ये दिलेल्या तारखेस (१३-०३-२००९ व १६-०३-२००९) अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत त्यामुळे त्यांना ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर टाळलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तपासणीकरिता माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शवूनही अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १३-०३-२००९ रोजी अथवा दिनांक १६-०३-२००९ रोजी उपस्थित राहिले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थी त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी उपस्थित राहिले नाहीत हा युक्तिवाद, मान्य करण्यात येत आहे. याहीपेक्षा दुसरी महत्त्वाची बाब अशी की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. तथापि त्यांनी यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ

व्यक्ती " श्री. दशरथ रामभाऊ दुनगू " यांचे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र या अर्जासोबत जोडले आहे. सदर प्रमाणपत्र हे श्री. दशरथ रामभाऊ दुनगू यांना दिलेले असून या प्रमाणपत्राचा व अपिलार्थीचा (मारुती दशरथ दुनगू) अर्थाअर्थी कोणताही संबंध असल्याचे दिसून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागविताना खुद्द अर्जदाराचे स्वतःचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र माहितीच्या मूळ अर्जासोबत सादर करणे अर्जदारास अनिवार्य आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या या प्रमाणपत्रावरुन अपिलार्थी श्री. मारुती दशरथ दुनगू हे स्वतः दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द होत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच योग्य त्या प्रमाणपत्राअभावी अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मारुती दशरथ दुनगू, मु. चोपनवाडी पो. दिंद्रुड, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत समिती कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव,

तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६२६

निर्णय दिनांक १७-०२-२०१०

१ श्री. जैन उमेश वालचंद, : अपिलार्थी
जैन झेरॉक्स, जिल्हा परिषदेसमोर, शिवाजी चौक,
बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास
यंत्रणा यांचे कार्यालय, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास
यंत्रणा, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक भूवैज्ञानिक, कार्यालय वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, " जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत झालेल्या सर्व कामांचा तपशील व त्यावर झालेला खर्च याची संपूर्ण सविस्तर माहिती देणे, नोंदीची प्रत देणे, " अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनांक ०१-०४-२००७ ते ०१-१०-२००८ असा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस कशा प्रकारची माहिती अपेक्षित आहे याचा अर्थबोध त्यांच्या अर्जावरुन होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-१०-२००८ रोजीच्या पत्राने त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना तपशीलवार अर्ज सादर केला. या अर्जावर दहा रुपये किंमतीचा कोर्ट फी स्टॅम्प डकविलेला नाही. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार न करता अपिलार्थीचे अपील प्रलंबीत ठेवल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील विनंतीशी सुसंगत युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ५०० ते ७०० पृष्ठासंख्येची माहिती अपिलार्थीस वेळोवेळी दिली असल्याचे अवगत केले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-१०-२००८, २४-१०-२००८ व २६-०२-२००९ रोजी त्यांच्याकडील सर्व कामांची माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपैकी फक्त जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या सर्व कामांवर त्यांच्या कार्यालयामार्फत दिनांक ०१-०४-२००७ ते ०१-१०-२००८ या कालावधीत झालेला खर्च एवढीच माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीने जरी पुढे पत्रव्यवहार करुन त्यांना निश्चित कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे हे जन माहिती अधिका-यास वेगळ्या पत्राव्दारे कळविले असले तरी या पत्रास अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील प्रथम प्रक्रियेअंतर्गत आवश्यक असलेले दहा रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट स्टॅम्प डकविले नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे साध्या पत्राव्दारे मागितलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितलेली माहिती असे म्हणता येणार नाही. त्यामुळे साहजिकच ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. अशा प्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत केलेल्या कामांसाठी दिनांक ०१-०४-२००७ ते ०१-१०-२००८ या कालावधीमध्ये झालेला खर्च एवढीच माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, यामध्ये अपिलार्थीस हा खर्च वगळता माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नसल्याच्या निष्कर्षाप्रत

आयोग आला आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०४-२००७ ते दिनांक ०१-१०-२००८ या कालावधीतील केलेल्या कामावर झालेला खर्च ही माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून या कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. डी. एम. थोरात, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बीड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची नोंद सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक ०१-०४-२००७ ते दिनांक ०१-१०-२००८ या कालावधीतील कामांवर केलेला खर्च ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जैन उमेश वालचंद, जैन झेरॉक्स, जिल्हा परिषदेसमोर, शिवाजी चौक, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक भूवैज्ञानिक, कार्यालय वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३५६
निर्णय दिनांकः १८-०२-२०१०

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
बी.एस.जी.एम.विद्यालय,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार प्रथमतः त्यांच्या दि. १८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी,बी.एस.जी.एम.विद्यालय,एन-४,सिडको,औरंगाबाद यांच्याकडे एकूण १९ मुद्यांद्वारे, सन २००० ते २००८ या कालावधीशी संबंधित, काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित विद्यालयाचे विधी सल्लागार श्री. डी.के.कुलकर्णी यांनी त्यांच्याकडील दि. १६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांच्या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

तरतुदी  लागू होत नसल्याचे कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दि. २२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत माहिती देण्याचे, संबंधित संस्थेस सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित शाळेचे वकील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद हे सर्वजण उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या शाळेविषयी माहिती मागितली आहे, त्या शाळेस जरी शासनाकडून अनुदान प्राप्त होत नसले तरी या शाळेवर शिक्षणाधिकाऱ्याचे पूर्णपणे नियंत्रण आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी या शाळेस लागू होत आहेत आणि या शाळेने त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना द्यावयास हवी.

संबंधित शाळेचे वकील श्री.डी.के.कुलकर्णी (लिमगावकर) यांनी असा युक्तिवाद केला की,  त्यांच्या शाळेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे व तसेच त्यांच्या शाळेची नोंद मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० नुसार झाली असल्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी लागू होत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी प्रथमतः अशा खाजगी संस्थांच्या बाबतीत मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने दि. २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे योग्य राहील. नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन

क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि. २०.०८.२००९ रोजी अशाप्रकारच्या खाजगी संस्थांची महाविद्यालये माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) प्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरणा'च्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत, असा निर्णय दिला आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने संबंधित शाळेवर शिक्षणाधिकाऱ्याचे नियंत्रण असल्याचे आयोगास स्पष्ट केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मधील, 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीवर व 'नियंत्रण' या शब्दासंदर्भात, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या वेगवेगळया खंडपीठाने वेळोवेळी सविस्तर भाष्य केले असल्यामुळे त्यामध्ये असे स्पष्ट केले आहे की, 'नियंत्रण' याचा अर्थ सूक्ष्मातीसुक्ष्म पातळीवरील नियंत्रण असा होतो. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेले कथित नियंत्रण हे नियामकीय (Regulatory) स्वरुपाचे असल्यामुळे या नियंत्रणाला या संस्थेच्या दैनंदिन व्यवहारावरील नियंत्रण असे मानता येणार नाही. मा. उच्च न्यायालयाच्या त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मधील या निर्णयाशी संबंधित सर्व बाबी विचाराधीन अपिलातील बाबींना तंतोतंत लागू होत असल्यामुळे अपिलार्थीस संबंधित संस्थेकडून कोणतीही माहिती देय होणार नाही. त्यांना संस्थेशी संबंधित ही माहिती आवश्यक असेल तर त्यांनी सार्वजनिक न्यास नोंदणी कायद्यातील तरतुदीन्वये धर्मादाय आयुक्त यांच्याकडे या संस्थेच्या संदर्भात माहिती मागवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत,एन-६, सिडको, घर नं.ई २३/१०,संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद

२. मुख्याध्यापक,बी.एस.जी.एम.विद्यालय, एन.४, सिडको,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४०
निर्णय दिनांकः १८-०२-२०१०

१. श्री. अशोक विठ्ठलराव सूर्यवंशी, : अपिलार्थी
मु. होंडाळा, पो. दापका (राजा),ता.मुखेड,
जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
जिल्हा परिषद (बांधकाम विभाग), नांदेड.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी योग्य तो निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००० ते २००५ या कालावधीतील विकास कामांची माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"१) उपरोक्त काळात सावरगाव ते होंडाळा हया रोडचे काम आपल्या जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग मुखेड, जि.नांदेड आंतरगत झालेले आसुन सदर कामावरील मजुरांचे धान्य आजपर्यन्त वाटप झालेले नसल्यामुळे आपण स्वच्छ अधिकाऱ्यामाफत सदर प्रकरणांची चौकशी करुन मजुरांचे धान्य वाटप करुन दोषी आधिकाऱ्यावर आपण कायदेशिर कार्यवाही करुन मला माहीती दयावे. (२) आपल्या जिल्हयात जिल्हा परिषद बांधकाम विभागाआंतरगत झालेल्या संपूर्ण कामाची माहीती उपरोक्त काळातील देणेही आपणास नम्र विनंती."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाच्या तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे कारण दर्शवून त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दि. ०२.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतीही विशिष्ट माहिती न मागता जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सावरगाव ते होंडाळा या रस्त्याच्या कामाची चौकशी करुन संबंधितांच्यावर कायदेशीर कारवाई करुन नंतर अपिलार्थीस माहिती देण्याची "विनंती" केली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून 'त्यांच्या विभागाअंतर्गत झालेल्या संपूर्ण कामाची सन २००० ते २००५ या कालावधीतील माहिती द्यावी' अशी मोघम स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविताना एका विशिष्ट मुद्याची माहिती मागणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील 'संपूर्ण कामाची माहिती' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्यांवरील व कोणती माहिती हवी आहे, याचा अर्थबोध होत नसल्यामुळे व तसेच यासंदर्भात खुलासा करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर उपस्थित नसल्याने अपिलार्थीची त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे मागणी केलेली ही माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकाऱ्याला, अर्जदारास अशाप्रकारची मोघम स्वरुपातील माहिती देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे या मुद्यावरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही

माहिती देय होत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील

फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सूर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु.होंडाळा,पो.दापका (राजा),ता.मुखेड,जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४१
निर्णय दिनांकः १८-०२-२०१०

१. श्री. साहेबराव आनंदराव दुमारे, : अपिलार्थी
रा.दहेगाव (साकुर), ता. माहूर, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय,माहूर, जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,माहूर
जि. नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्रामपंचायत साकूर, ता.माहूर,जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, माहूर, जि.नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून, आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले

असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर दोन महिन्यांचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही कुठलाही निर्णय दिला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००७ ते २००८ या कालावधीमध्ये ग्रामीण रो.ह.यो.अंतर्गत मौजे दहेगाव (साकुर) येथे केलेल्या पाणलोट (बंधारे) व शेतमळे तसेच शाळा, समाजमंदिर बांधकाम या कामाच्या संदर्भात, कामाची एकूण रक्कम, कामाचे ठिकाण, अंदाजपत्रक व मोजमापपुस्तिकेच्या प्रती, ज्यांच्या शेतात काम केले त्यांची नावे,मजुरीचा दर, काम केलेल्या मजूरांची नावे, - या मुद्यांवर व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज गट विकास अधिकाऱ्यास उद्देशून केला होता. त्यांनी त्या अर्जाची प्रत दि. १०.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये ग्रामसेवक, ग्रामपंचायत, साकूर यांच्याकडे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. तदनंतर यासंदर्भात संबंधित ग्रामसेवकास दि. ०७.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे स्मरणपत्र दिले. परंतु यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ०४.१२.२००८ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. परंतु त्यांनी या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेली माहिती न स्वीकारण्याचे कारण त्यांना विचारले

असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षित आहे. ते ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वारंवार गेले असता, त्यांना संबंधित ग्रामसेवकाने माहिती दिली नाही, त्यामुळे ग्रामसेवकाने रजिस्टर्ड पोस्टाद्वारे कोरी कागदपत्रे पाठविली असल्याची त्यांना शंका आल्याने त्यांनी या रजिस्टर्ड पाकीटाचा स्वीकार केला नाही. त्यांना या प्रकरणी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दोन वेळा माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारली नसल्यामुळे यासंदर्भात त्यांनी आवश्यक तो पंचनामाही करुन ठेवला आहे. अपिलार्थीने समक्ष माहिती न स्वीकारल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती पाठविली आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील परिपत्रके, या मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. कारण अपिलार्थीस नेमकी कोणती परिपत्रके अपेक्षित आहेत, याचा खुलासा अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही. मात्र या अर्जातील उर्वरित मुद्यांवरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती (परिपत्रके वगळता) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या समक्ष व्यक्तिशः पुरवावी.

या प्रकरणी तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर (श्री. सुरेश कांबळे, सध्या जिल्हा परिषद,ठाणे अंतर्गत आय.सी.डी.एस.विभागामध्ये वसई येथे कार्यरत) यांचे वर्तन आयोगास आक्षेपार्ह आढळले आहे. अपिलार्थीचा दि. ०७.१०.२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ

अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती,माहूर यांच्या कार्यालयात दि. ०७.१०.२००८ रोजी प्राप्त झाला असतानादेखील त्यांनी सदरच्या अर्जाची प्रत संबंधित ग्रामसेवकास दोन महिन्याहून जास्त कालावधीनंतर पाठविली. अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार सदर कालावधी पाच दिवसांचा आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. ०४.१२.२००८ रोजी या प्रकरणी प्रथम अपील केले असता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन अथवा अन्य प्रकारे निर्णय घेण्याचे त्यांनी टाळले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे/नांदेड यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, त्यांना देय होत असलेली (परिपत्रके वगळता) संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. साहेबराव आनंदराव दुमारे,रा.दहेगाव (साकुर),पो.वानोळा, ता. माहूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,साकूर, ता.माहूर, जि.नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती,माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड/ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६४२
निर्णय दिनांकः १८-०२-२०१०

१. श्री. वाघमारे प्रकाश ग्यानोबा, : अपिलार्थी
रा. गोकुंदा, ता. किनवट, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय,देगलूर, जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील विस्तार अधिकारी व संबंधित ग्रामसेवकांची सन २००५-२००८ या कालावधीतील काही माहिती एकूण ८ मुद्याद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - विस्तार अधिकाऱ्याने तपासणी केलेल्या ग्रामपंचायतीचा तपासणी

अहवाल, ग्रामपंचायतीला भेटी दिल्याचे सरपंच व उपसरपंच यांच्या स्वाक्षरीचे पत्र, अभिप्राय पुस्तिका,टी.ए.बील प्रत, कार्यालयीन कामकाजाचे व दौऱ्याचे दिवस, एम.बी. व मूल्यांकनाची एल.पी.सी.प्रत, मुख्यालयी राहत असलेल्या ग्रामसेवकांची यादी, निवासाचा पत्ता, त्यांच्या घरमालकाचे नाव व घरभाडे, त्यांना शासनाकडून पगारामध्ये मिळत असलेला घरभाडे भत्ता व यासंबंधीचे शासनपरिपत्रक - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जाची प्रत त्यांच्याकडील विस्तार अधिकारी यांच्याकडे दि. ३१.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीनुसार दि. १९.११.२००८ रोजी यासंदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर त्यांनी दि. ३१.०१.२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दि. २०.०२.२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि या मुदतीमध्ये देखील अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने दि. २४.०३.२००९ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर  दि. ३०.०३.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविलेली आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ६ वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३०.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती मुद्देनिहाय दिली नसून विस्कळीत स्वरुपात व अपिलार्थीची दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता ती द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व मुद्देनिहाय स्वरुपात पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १५.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांना विलंबाने व दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, अशा सर्वांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक

अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ६ वगळता उर्वरित संपूर्ण मुद्देनिहाय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वाघमारे प्रकाश ग्यानोबा,रा.दत्तनगर, गोकुंदा, ता. किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय,देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१८०
निर्णय दिनांकः १८-०२-२०१०

१. श्री. चंगेडे शशिकांत पेमराज, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
(सार्वजनिक बांधकाम), जागतिक बँक प्रकल्प,
अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य अभियंता,
(सार्वजनिक बांधकाम विभाग), जागतिक बँक प्रकल्प,
अहमदनगर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, जागतिक बँक प्रकल्प,घटक क्र.२, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा.बां.), अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पूर्ण माहिती न दिल्यामुळे आणि माहितीसाठी जादा रक्कम घेतल्यामुळे, त्यांनी आयोगाकडे

विचाराधीन अपील सादर केले आहे व त्याचबरोबर त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयावर अपील कोणाकडे करावयाचे त्यांचे नाव व पत्ता कळविला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दि. २६.०५.२००८ रोजी प्राप्त झाला त्यान्वये, नगर-औरंगाबाद रस्त्याच्या कामासंदर्भात सन २००५-२००८ या कालावधीतील माहिती एकूण १० मुद्यांद्वारे टपालाने मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १३१७/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयामध्ये चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने दि. १८.०६.२००८ रोजी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केल्यानंतर त्यांना दि. २४.०६.२००८ रोजी ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तिशः हस्तांतरित केली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. १४.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०८.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या निर्णयामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दिल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर, "अपील सुनावणीबाबत फार तातडी दाखवली," असे आक्षेप नोंदवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २४.०६.२००८ रोजी व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. अपिलार्थीस त्यांनी, एकूण ४९९ पृष्ठे व एक नकाशा अशी माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पूर्ण माहिती दिली नाही, असे त्यांचे अभिप्राय दिले आहेत. तथापि त्यांना निश्चितपणे कोणत्या मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती अप्राप्त आहे, याचा त्यांनी स्पष्ट उल्लेख या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही. तसेच यामध्ये अपिलार्थीने त्यांना देण्यात आलेल्या माहितीपोटीचे शुल्क जास्त लावल्यासंदर्भात त्यांचा आक्षेप नोंदविला आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस दि. ०४.०६.२००८ रोजी पाठविलेल्या शुल्कासंदर्भातील पत्र पाहता, असे आढळून येत आहे की, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना या शुल्काचा तपशील (उदा. अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीच्या पृष्ठांची अंदाजित संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर) कळविला नाही. अशाप्रकारचा तपशील अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी कळविणे त्यांना अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे अनिवार्य आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील न कळवून जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदींचा भंग केला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दि. ०४.०६.२००८

रोजीचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले पत्र अवैध ठरत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१३१७/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अप्राप्त आहे, याचा खुलासा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केला नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १३१७/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंगेडे शशिकांत पेमराज,३६४३, खिस्तगल्ली,अहमदनगर-४१४ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जागतिक बँक प्रकल्प,घटक क्र.२,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प, (सार्वजनिक बांधकाम) विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७९७
निर्णय दिनांक १८/०२/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. आंभोरे अवधुत बाबाराव,<br>रा.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी,<br>उपजिल्हाधिकारी कार्यालय, सेलू, जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी,<br>परभणी | | |

**निर्णय**

श्री. अवधुत बाबाराव आंभोरे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०३.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०३.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०४.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ८९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आंभोरे अवधुत बाबाराव, संजय गांधी नगर, बियाणे महामंडळा जवळ, परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७९८
निर्णय दिनांक १८/०२/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. परमेश्वर रंगनाथराव गित्ते,<br>रा.परळी वैजनाथ, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड | | |

**निर्णय**

श्री. परमेश्वर रंगनाथराव गित्ते यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २३.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २४.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २७.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. परमेश्वर रंगनाथराव गित्ते, दिवाणी न्यायालय, परळी वैजनाथ, जि.बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७९

निर्णय दिनांक १८-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख शकील अहेमद शे. रहीम,<br>रा. मीलन सायकल स्टोअर्स, अष्टभुजा देवी मंदिरासमोर,<br>परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कुलसचिव,<br>महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कुलसचिव,<br>महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप संचालक संशोधन, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती अद्यापपर्यंत त्यांना प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १८-०२-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याने ते त्यांचे विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीनेच आयोगाकडे केलेले त्यांचे विचाराधीन व्दितीय अपील त्यांच्या दिनांक १८-०२-२०१० रोजीच्या पत्राव्दारे मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ५७९/०९, दिनांक ०७-०२-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख शकील अहेमद शे. रहीम, रा. मीलन सायकल स्टोअर्स, अष्टभुजा देवी मंदिरासमोर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक संशोधन, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६३१

निर्णय दिनांक १८-०२-२०१०

१ श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे, : अपिलार्थी
सा. आत्ताच एक्सप्रेस, कार्यालय, जे - १३, विजयश्री कॉलनी,
एन - ५, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, महाराष्ट्र
औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लेखाधिकारी, स्थापत्य विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करावे व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानंतरही माहिती अधिकाऱ्याने त्यांना माहिती उपलब्ध करुन न दिल्याने त्यांच्या विरोधात नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाची मार्च २००४ ते डिसेंबर २००८ या कालावधीशी संबंधित व्यापक व्याप्ती असलेली काही माहिती टपालाने मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते व त्यांनी तसे प्रमाणपत्र या अर्जासोबत जोडले होते. तथापि या प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रतीमध्ये जन माहिती अधिकारी यांना नावामध्ये खाडाखोड झाली असल्याचे आढळल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची मूळ प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने याप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २५-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेण्याआधीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज सादर करताना सोबत जोडलेल्या दारिद्र्यरेषेखालच्या प्रमाणपत्रामधील

व्यक्तीच्या नावामध्ये खाडाखोड आढळल्याने, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची मूळ प्रत त्यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने तसे न करता कार्यकारी अभियंता यांच्याकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर दिनांक २०-०३-२००९ रोजी सुनावणी घेऊन, कार्यकारी अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांनी आपला निर्णय दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या आदेशाद्वारे पारित केला. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे आदेशित केले होते की, जर अपिलार्थीने सुनावणीमध्ये कबूल केल्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची मूळ प्रत पडताळणीसाठी १० दिवसात सादर केली तर त्यांना ही माहिती विनामूल्य द्यावी व जर त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची मूळ प्रत अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाली नाही तर ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क द्यावी. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीची, ते दारिद्र्यरेषेखालील मूळ प्रमाणपत्राची प्रत पडताळणीसाठी सादर करतील, या अपेक्षेने वाट पाहिली. तथापि विहित मुदतीत अपिलार्थी त्यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रासह उपस्थित न झाल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७८१०/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि त्यानंतर आजतागायत अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये केलेला नाही अथवा त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची मूळ प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अद्यापपावेतो सादर केलेली नाही. केवळ या कारणास्तव जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस उपलब्ध माहिती पुरवू शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात केलेल्या युक्तिवादामध्ये आयोगास तथ्य आढळून आले आहे. या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागितली आहे. माहिती मागताना नावामध्ये संशयास्पद खाडाखोड असलेले दारिद्र्यरेषेखालचे प्रमाणपत्र मूळ अर्जासोबत जोडले. या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मूळ प्रमाणपत्राची प्रत मागितली असता, अपिलार्थीने अशाप्रकारची मूळ प्रमाणपत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांना या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर सादर केली नाही अथवा जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क देखिल त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरलेले नाही, जे त्यांना अधिनियमातील कलम ७ (५) मधील तरतुदीप्रमाणे भरणे आवश्यक होते. अशा प्रकारे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे, सा. आत्ताच एक्स्प्रेस, कार्यालय, जे - १३, विजयश्री कॉलनी, एन - ५, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, स्थापत्य विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६३२
निर्णय दिनांक १८-०२-२०१०

१ श्री. नितनवरे पुष्पानंद शंकर, : अपिलार्थी
रा. क्रांतीनगर, जुन्या हायकोर्टामागे, कोकणवाडी,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपायुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १८-०२-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना अपेक्षित असलेली संपूर्ण माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे व प्राप्त माहितीबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक ६३२/२००९ हे ते स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे, त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ६३२/२००९, दिनांक १९-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नितनवरे पुष्पानंद शंकर, रा. क्रांतीनगर, जुन्या हायकोर्टामागे, कोकणवाडी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६३३

निर्णय दिनांक १८-०२-२०१०

१ श्री. किशोर कडूराव निरपळ, : अपिलार्थी

रा. 'ईश्वर कृपा', प्रगती कॉलनी, गंगापूर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,

गणेशवाडी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

गट विकास अधिकारी, पंचायत समिती गंगापूर,

जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजनेच्या संदर्भात त्यांच्या

कार्यक्षेत्रातील माहे एप्रिल २००८ ते दि. २२-१२-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व ती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस झालेल्या कामाची माहिती द्यावी, असे सूचित करुन या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे जवळजवळ संपूर्ण माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील कामाची नावे व मुद्दा क्रमांक २ मधील व्हावचरच्या साक्षांकित प्रती ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे त्यांना भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना

असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील 'कामाची नावे' व मुद्दा क्रमांक २ मधील 'व्हावचरच्या साक्षांकित प्रती' ही माहिती, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील 'कामाची नावे' व मुद्दा क्रमांक २ मधील 'व्हावचरच्या साक्षांकित प्रती' ही माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किशोर कडूराव निरपळ, 'ईश्वर कृपा', प्रगती कॉलनी, गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गणेशवाडी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६३५
निर्णय दिनांक १८-०२-२०१०

१ श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, : अपिलार्थी
द्वारा, अब्दुल माजीद, प्लॉट नं. ४०, न्यु एस. टी.
कॉलनी, कट कट गेट, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : अध्यक्ष, अंजुमन इशाते तालीम संस्था

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १६-०२-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले आहे, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अपेक्षित असलेली संपूर्ण माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०४-०४-२००९, १६-०४-२००९ आणि २२-०४-२००९ रोजी प्राप्त झालेली असून, त्यांना माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांची आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यात यावे, अशी त्यांनी या पत्रामध्ये आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची सदरची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ६३५/२००९, दिनांक १६-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, द्वारा, अब्दुल माजीद, प्लॉट नं. ४०, न्यु एस. टी. कॉलनी, कट कट गेट, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६३६

निर्णय दिनांक १८-०२-२०१०

१ श्री. प्रदीप केरबा डावरे, : अपिलार्थी

रा. साठेनगर, अहमदपूर, तालुका अहमदपूर,

जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्य लिपीक, नगर परिषद कार्यालय, अहमदपूर,

जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर, जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. शेख व श्री. सोनबा

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी त्यांचे तोंडी

म्हणणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे नोंदवून, त्यांना प्राप्त झालेली माहिती कशा प्रकारे चुकीची व दिशाभूल करणारी आहे हे त्यांनी सिध्द करुन दिले होते, तरीही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील अमान्य केले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई आदेशित करावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - साठेनगरमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे कर्मचारी श्री. शेख व श्री. सोनबा यांचा दिनांक १२-०८-२००८ रोजीचा रिपोर्ट, नळपट्टी ज्या नियमानुसार आकारली जाते त्या नियमाचा जी. आर. अथवा आदेशाची छायाप्रत व जानेवारी २००५ ते दिनांक १६-०९-२००८ पर्यंत नगरपरिषदेने किती पाईप खरेदी केले, कोणत्या एजन्सीकडून खरेदी केले, मंजूर रक्कम व पावतीच्या प्रती, सदर पाईप कोणकोणत्या ठिकाणी वापरण्यात आले, शिल्लक पाईप किती आहेत - इत्यादी मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-११-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविल्याने, अपिलार्थीचे अपील अमान्य केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या अपिलाची सुनावणी आज दिनांक १८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर आणि अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-१०-२००८ रोजी संपूर्ण माहिती पुरविलेली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस डिसेंबर २००५ पासून पुढील कालावधीशी संबंधित माहिती दिली आहे. या माहितीमध्ये जानेवारी ते डिसेंबर २००५ या कालावधीतील पाईप खरेदीच्या व वापराच्या माहितीचा समावेश नाही. या मुद्दयाबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, ०१ जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या कालावधीमध्ये त्यांनी कोणत्याही पाईपची खरेदी केली नसल्याने ही माहिती निरंक आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी विहित मुदतीत काही माहिती पुरविली आहे. तथापि या माहितीमध्ये वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे नगरपरिषदेने जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या कालावधीमध्ये खरेदी केलेल्या व वापरलेल्या पाईपच्या माहितीचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे. जर जन माहिती अधिकारी यांनी जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या कालावधीमध्ये कोणतेही पाईप खरेदी केले नव्हते तर त्यांनी अपिलार्थीस तसे कळविण्यास हरकत

नव्हती. तथापि त्यांनी अपिलार्थीस तसे कळविलेले नाही. अपिलार्थीने या मुद्दयावर मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित, ०१ जानेवारी २००५ ते ०८ डिसेंबर २००५ या कालावधीतील संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उर्वरित प्राप्त माहितीने अपिलार्थीची कशा प्रकारे दिशाभूल झाली अथवा ती माहिती कशा प्रकारे चुकीची आहे याचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत किंवा यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये सविस्तर भाष्यही केलेले नाही त्यामुळे अपिलार्थीच्या या अभिप्रायावर आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील दिनांक ०१-०१-२००५ ते दिनांक ०८-१२-२००५ या कालावधीतील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रदीप केरबा डावरे, रा. साठेनगर, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६३७

निर्णय दिनांक १८-०२-२०१०

१ श्री. उत्तम कारभारी घोळवे, : अपिलार्थी

मु. पिंपळगांव, पो. विडा, तालुका केज, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

त्रयस्थ पक्ष : रेणुका माता कृषि प्रतिष्ठान, देवगांव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना रेणुका माता कृषि प्रतिष्ठान, देवगांव यांनी योग्य माहिती दिली नाही, या संस्थेस प्राप्त झालेल्या निधीच्या कामनिहाय खर्चाची माहिती दिली नाही, तसेच मोजमाप पुस्तिकांच्या झेरॉक्स प्रती व समितीच्या सदस्यांच्या बँकेचे नांव त्यांना कळविले नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, ' रेणुका माता कृषि प्रतिष्ठान, देवगांव या संस्थेला दिलेल्या निधीचा तपशील, ' असा माहितीचा विषय त्यांच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये - पाणलोट कामासाठी प्रत्येक पाणलोट कामास मंजूरी मिळालेल्या तारखेपासून दिलेला निधी, झालेला खर्च व ज्या कामावर खर्च झाला त्या कामाचे अंदाजपत्रक (तांत्रिक मान्यता), प्रशासकीय मान्यता, टप्प्याटप्याने दिलेला निधी व गावातील समिती व सदस्यांची नावे व बँक खाते नंबर - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जास दिनांक ०२-१२-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहिती-पोटीचे शुल्क रुपये २४ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व तसेच दिनांक ०५-११-२००८ रोजी अध्यक्ष, रेणुका माता कृषि प्रतिष्ठान, देवगांव यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना सशुल्क देण्याचे संबंधित संस्थेस सुचविले. तथापि यानंतर प्राप्त झालेल्या प्रतिसादाने व माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसाच्या आत सशुल्क माहिती देण्याचे रेणुका माता कृषि प्रतिष्ठान, देवगांव यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

त्रयस्थ पक्ष यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जिल्हा परिषद कार्यालयात ते सादर करत असतात. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्यामुळे ते अपिलार्थीस अपेक्षित माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, त्रयस्थ पक्ष यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड यांच्याकडे रेणुका माता कृषि प्रतिष्ठान, देवगांवच्या संदर्भात मागितलेली माहिती या संस्थेचे नोंदणी अधिकारी या नात्याने प्रकल्प संचालकाच्या कार्यालयात उपलब्ध असणे अनिवार्य आहे. कारण या संस्थेला दिलेला निधी हा प्रकल्प संचालकाच्या कार्यालयातून पुरविला जातो. सदर संस्था ज्या प्रकारची कामे करते त्या कामाची अंदाजपत्रके, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता या देखील प्रकल्प संचालकाच्या कार्यालयातून दिल्या जातात आणि या संस्थेस निधी देण्यापूर्वी या संस्थेच्या सदस्यांची नावे, त्यांचे बँक खाते क्रमांक हे प्रकल्प संचालकाकडे सहजपणे उपलब्ध असतात, त्यामुळे वास्तविक ही माहिती प्रकल्प संचालकाने स्वतः होऊन अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती न करता अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे अध्यक्ष, रेणुका माता कृषि प्रतिष्ठान, देवगांव यांना कळविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असतानाही ही माहिती शोधण्याचे टाळलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक,

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उत्तम कारभारी घोळवे, मु. पिंपळगांव, पो. विडा, तालुका केज, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६३८

निर्णय दिनांक १८-०२-२०१०

१ श्री. यशवंत दिगंबरराव देशमुख, : अपिलार्थी
रा. " कृष्ण निवास, " न्यू शाहुनगर, सत्यसाईबाबा
प्राथमिक शाळेसमोर, आनंदनगरजवळ, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कुलसचिव,
महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

जन अपिलीय अधिकारी : उप संचालक (संशोधन), महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. एन. बाजड, श्री. एम. आर. पाटील

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अर्जाची सुनावणी न घेता त्यांना दमदाटी करुन हाकलून लावल्याने आणि त्यांनी मागणी केलेली माहिती अद्याप न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही विशेष असा निर्णय पारीत केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक (संशोधन), महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे नोंदवून यासंदर्भात त्यांचा निर्णय तीस दिवसाच्या आत पारीत करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक (संशोधन), महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. यशवंत दिगंबरराव देशमुख, रा. " कृष्ण निवास, " न्यू शाहुनगर, सत्यसाईबाबा प्राथमिक शाळेसमोर, आनंदनगरजवळ, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक (संशोधन), महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञ ाान विद्यापीठ, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६९४
निर्णय दिनांक २०.०२.२०१०

१. श्री. धावणे नवनाथ जगन्नाथ, : अपिलार्थी
खंडोबानगर, शेवगांव (भारदे ग्राऊंड शेजारी),
तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, शेवगांव,
तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, शेवगांव,
तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, शेवगांव,
तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"गट शिक्षण अधिकारी यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांची सेवा वर्ग कॅन्सल करावी म्हणून दिलेल्या पत्राची छायांकीत प्रत मिळावी. कधीपासून सेवावर्ग आहेत ती तारीक मिळावी व कर्मचाऱ्यांची नावे मिळावीत. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सेवावर्ग कॅन्सल करावेत असा आलेल्या आदेशाची छायांकीत प्रतिची झेरॉक्स मिळावी."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाच्या तसा घेतला आहे.)

अपिलार्थीच्या या अर्जास तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती,शेवगाव यांनी दि. ०१.०७.२००९  रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दि. ०९.०६.२००९ रोजीच्या पत्राची प्रत पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २२.०६.२००९ रोजी परत गट विकास अधिकारी,पंचायत समिती, शेवगाव यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने गट विकास अधिकारी यांच्याकडे केलेल्या या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहिती बदलून दुसऱ्या विषयावर माहिती मागविली आहे व यानंतर त्यांनी आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या दि. २६.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाचे अवलोकन केले असता, या अपील अर्जावर त्यांच्या दि. १८.०६.२००९ रोजीच्या वर उल्लेखिलेल्या अर्जातील माहितीच्या विषयाचा उल्लेख नाही, म्हणजेच त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाचा संदर्भ सोडून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व नंतर आयोगाकडे द्वितीय अपील केल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करताना अपिलार्थीने माहिती अधिकाऱ्याकडे ज्या विषयावर माहिती मागितली आहे. त्याच विषयावर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करणे अभिप्रेत आहे. परंतु या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करताना सदर अपील त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील विषयासंदर्भात केल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये, आढळून येत नाही. अशाप्रकारे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या पध्दतीचे अपिलार्थीने उल्लंघन केल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत आहे.

सबब अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करताना माहिती अधिकार अधिनियमाच्या कलमातील तरतुदीचे उल्लंघन केले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक २०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धावणे नवनाथ जगन्नाथ, खंडोबानगर, शेवगांव (भारदे ग्राऊंड शेजारी), तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२.	जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६९५

निर्णय दिनांक २०.०२.२०१०

१. श्री. साबळे अरुण दौलत, : अपिलार्थी
ग्राम सुरक्षा दल, ढोरजळगांव शे.,
तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, नगर भाग,
अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, नगर भाग,
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व तसेच या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, नगर भाग,नगर यांच्याकडे काही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०९.२००९ रोजी उपविभागीय अधिकारी, अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु त्यांनी या प्रकरणी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नगर भाग, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि. १६.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नगर भाग, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि. १६.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नगर भाग, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि.१६.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर**
**दिनांक २०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. साबळे अरुण दौलत, ग्राम सुरक्षा दल, ढोरजळगांव शे, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, नगर भाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नगर भाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६९६

निर्णय दिनांक २०.०२.२०१०

१. श्री. अभिजीत सी. पुप्पाल, : अपिलार्थी
३०१, आदर्श क्लासिक, खिस्त गल्ली, अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वसुली अधीक्षक,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त (सामान्य प्रशासन),
अहमदनगर, महानगरपालिका,
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०८.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही. त्यामुळे विलंबाने माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्यात यावी आणि त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०९.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी तथा वसूली अधीक्षक, महानगरपालिका,अहमदनगर यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री.सिमरतमल कुंदनमल बोरा व इतर यांच्या मिळकतीवर लावण्यात आलेल्या कराच्या वसूलीसंदर्भात महानगरपालिकेच्या सर्व झोन प्रमुखांना महानगरपालिकेचे पत्र क्र. ३०६ दि. ०९.०९.२००८ द्वारे दिलेल्या सूचनेवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली वसूली व कार्यवाही व त्रयस्थ पक्षांना नोटीस बजावल्या असल्यास त्याच्या प्रती आणि या मिळकतीवर जप्ती व दंडात्मक कार्यवाही केली असल्यास त्याबाबतची सविस्तर माहिती, अशाप्रकारची दि. ०१.०१.२००० ते ०८.०४.२००९ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या या मूळ अर्जामध्ये त्यांना अपेक्षित माहिती, त्यांनी अधिनियमातील तरतुदीमध्ये अपेक्षित माध्यम, जसे, 'पोस्टाने/टपालाने','नोंदणीकृत टपालाद्वारे' अथवा 'व्यक्तिशः' असा उल्लेख न करता, 'VERY URGENT' असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संकलित करण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसा कर्मचारीवर्ग नसल्यामुळे आणि कार्यरत असलेला कर्मचारी वर्ग सार्वजनिक निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी काही वेळ लागेल, असे अपिलार्थीस अवगत केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०५.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), महानगरपालिका, अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०६.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.०६.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली.

तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सहज उपलब्ध नव्हती. त्यांना ही माहिती त्यांच्या सहकाऱ्यांकडून मागवून घेऊन नंतर ती अपिलार्थीस द्यावी लागणार होती आणि अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी लोकसभा,विधानसभा तसेच महानगरपालिकेच्या निवडणूका असल्यामुळे त्यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागणारा कर्मचारीवर्ग उपलब्ध नव्हता. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना विलंब लागला.तथापि ही माहिती सर्व संबंधितांच्याकडून प्राप्त करुन घेऊन त्यांनी ती अपिलार्थीस दि. २४.०६.२००९ रोजी व्यक्तिशः विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणाशी संबंधित दिलेली माहिती आयोगास दाखविली. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रावर अपिलार्थीस माहिती मिळाल्याबाबतची त्यांची पोचसही त्यांनी आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, श्री. सिमरतमल कुंदनमल बोरा व इतर यांच्यासंदर्भात माहिती मागितली आहे. ही माहिती देण्यासाठी त्रयस्थ पक्षाचा विरोध असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाविषयी मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे त्रयस्थ पक्षाचा ही माहिती देण्यासाठीचा विरोध विचारात

घेण्याचे जन माहिती अधिकारी यांना काहीही कारण नाही आणि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अशाप्रकारचे सार्वजनिक स्वरुप पाहता व जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दि. २४.०६.२००९ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरित केलेली माहिती सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील करण्यापूर्वीच प्राप्त झाली होती, असेही सिध्द होत आहे.तथापि एवढे असूनही अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही, असे असत्य विधान केल्याचे आढळून येत आहे.याच अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०९.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाच्यासंदर्भात होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाशी संपर्क साधून त्रयस्थ पक्षाकडून त्यांचे म्हणणे मागवून घेण्यासाठी काही कालावधी लागला व तसेच या कालावधीमध्ये सार्वत्रिक निवडणूका असल्यामुळे जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत, असे आढळून आले आहे. यापैकी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर मांडलेला, सार्वत्रिक निवडणूकीचा मुद्दा,आयोग फेटाळून लावत आहे. केवळ कर्मचारी नाहीत, म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती द्यावयाची नाही, ही जन माहिती अधिकारी यांची भूमिका चुकीची व माहिती अधिकार अधिनियमाच्या निकोप वाढीशी विसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती पुरविल्याचे सिध्द केले असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक २०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अभिजीत सी. पुप्पाल, ३०१, आदर्श क्लासिक, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा वसुली अधीक्षक, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६९७
निर्णय दिनांक २०.०२.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दादा गुलाब देशमुख,<br>लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>अलिबाग, जिल्हा रायगड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग, जि.रायगड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळेमध्ये माहिती न पुरविल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रु. २५०/- इतक्या रकमेची शास्ती लावावी, जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही आदेशित करावी, अशी आयोगास विनंती केली आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित विस्तृत व्याप्ती असलेली, काही माहिती एकूण दहा मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११५०/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने याप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.०८.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०२.२०१० रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दोन आठवडयाच्या आत माहिती देण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. या निर्णयानंतर दि. ०८.०२.२०१० रोजी त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती समक्ष दाखविली. ही माहिती पाहून अपिलार्थीने त्यांची या संदर्भात कोणतीही तक्रार नाही, असे लिहून दिले आहे.याचवेळी त्यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, ते त्यांच्या परिवारासह अलिबागच्या पिकनिक टूरवर होते, त्यावेळी त्यांना हवी असलेली माहिती त्यांनी समक्ष पाहिली आहे. आता त्यांना या माहितीची कोणतीही आवश्यकता नाही व त्यांची कोणतीही तक्रार नाही व त्यांनी आयोगाकडे पाठविलेला अपील अर्ज निकाली काढून दप्तरी दाखल करावा, अशी त्यांनी आयोगास या पत्रामध्ये अंतिमत: विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा पूर्णपणे गैरवापर करुन केवळ अधिकाऱ्यांना त्रास द्यावयाच्या या उद्देशाने आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याचे सिध्द होत आहे. आयोगास असे आढळून येत आहे की, काही विशिष्ट अर्जदार हे सार्वजनिक प्राधिकरणाकडे व्यापक व्याप्ती असलेली माहिती नियमितपणे मागवित असतात व अशावेळी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांना माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याचे सूचित केल्यास ते अशाप्रकारचे कोणतेही शुल्क न भरता, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करतात. सर्वसाधारणपणे ते या अपील अर्जाच्या सुनावणीस उपस्थित राहत नाहीत व नंतर मात्र माहिती प्राप्त झाल्याचे अथवा माहिती प्रत्यक्ष पाहिल्याचे नमूद करुन त्यांचे आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील दप्तरी दाखल करण्याची आयोगास विनंती करीत असतात. माहिती अधिकार अधिनियमाच्या अशाप्रकारच्या दुरुपयोगास वेळीच आळा घालण्याच्या दृष्टीने या अधिनियमामध्ये काही बाबतीत बदल करण्याची आवश्यकता आयोगास प्रकर्षाने जाणवत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक २०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दादा गुलाब देशमुख, रा.लोणी खु. ता. राहाता, जि.अहमदनगर

२.	जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,अलिबाग,जि.रायगड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग, जि.रायगड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६९८

निर्णय दिनांक २०.०२.२०१०

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, : अपिलार्थी
घर नं. १०/८, गजानन हौसिंग सोसायटी, (जुना मुकूंदनगर), औरंगाबाद रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
क्षेत्र व्यवस्थापक,
नागापूर (एम. आय. डी. सी.)
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जोग सेंटर, वाकोडी वाडी, पुणे

त्रयस्थ पक्ष : श्री. पटवा (भूमापक)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश पारित झालेले नाहीत व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०१.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. पटवा,भूमापक, महाराष्ट्र औद्योगिक विकास

महामंडळ,अहमदनगर यांच्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.०८.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी विचारात घेऊन, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि.०१.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी

विचारात घेऊन, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०.०२.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, घर नं. १०/८, गजानन हौसिंग सोसायटी, (जुना मुकूंदनगर), औरंगाबाद रोड, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र व्यवस्थापक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नागापूर, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सी.एफ.सी.बिल्डींग,नागापूर,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६९९

निर्णय दिनांक : २०.०२.२०१०

१. श्री. घाणे गोपीनाथ निवृत्ती, : अपिलार्थी
अमृतनगर कॉलेज परिसर, नवलेवाडी, तालुका अकोले,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, विभागीय कार्यालय, संगमनेर,जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, विभागीय कार्यालय, संगमनेर,जि.अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, विभागीय कार्यालय, संगमनेर,
जि.अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वत:विषयी, अकोले पोलीस स्टेशन येथे दाखल केलेल्या पोलीस

केसच्यासंदर्भात एकूण १५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, संगमनेर यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्या.उपविभाग,अकोले,जि.अहमदनगर यांच्या स्तरावरील असल्यामुळे त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत,माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्या.उपविभाग,अकोले,जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या दि. ०५.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली. तथापि अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०३.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीने दि. २५.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर या अपिलाची सुनावणी होईपर्यंतच्या कालावधीमध्ये दि. ०६.०६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती उपलब्ध करुन दिली होती. दरम्यान अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०६.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. ३०.०६.२००९ पर्यंत उर्वरित माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १३.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती दिली. तथापि उर्वरित मुद्यांवरील माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलीर्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५,९,१०,११,१४ व १५ या मुद्यांशी संबंधित माहिती त्यांना अद्यापपावेतो जन

माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती त्वरित प्राप्त व्हावी, अशी विनंती त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अंतिमतः आयोगासमोर केली.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्या अधिनस्त सहायक अभियंता व इतर प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेऊन ती वीस दिवसांच्या आत देण्याचे आज रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी आश्वासित केले.तसेच त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने अंदाजे अकरा लक्ष इतक्या रकमेचा अपहार केल्याप्रकरणी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित मार्फत त्यांच्यावर पोलीस केस दाखल केली असून त्यांना या प्रकरणात निलंबित करण्यात आले होते. तथापि यानंतरच्या कालावधीमध्ये त्यांची त्याच पदावर अन्यत्र पुनर्स्थापना झाली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यास आता कोणतीही हरकत नाही. मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांना संबंधित सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्या.उपविभाग,अकोले,जि.अहमदनगर यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ द्वारे अपिलार्थीने अपहारित रकमेच्या पावती पुस्तकाच्या संदर्भात काही माहिती मागितली आहे. तथापि अपिलार्थीने जी माहिती मागविली आहे, ती सहायक अभियंता यांच्या कार्यालयातून चोरी झाल्यामुळे, आता ती अपिलार्थीस उपलब्ध होऊ शकणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे अपिलार्थीने आयोगास अवगत केले. यासंदर्भात त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले आहे की, अकोले उपविभागीय कलेक्शन सेंटरमध्ये एकूण ८१ प्रकरणात कोटेशनच्या रकमेचा

भरणा झालेला असून जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त आठ प्रकरणाच्या संदर्भातील पावत्यांच्या प्रती त्यांना प्राप्त झाल्या आहेत. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले आहे की, त्यावेळी पावत्या फाडणारे कर्मचारी म्हणून अपिलार्थी यांची नेमणूक झाली होती. तथापि या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या पावतीच्या काऊंटर फॉईलवरुन उर्वरित ७३ पावत्यांच्या झेरॉक्स प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरवाव्यात. तसेच या कालावधीमध्ये जानेवारी २००६ ते जून २००७ पर्यंत कॅश टॅलीशी संबंधित अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली आहे. यासंदर्भात या कालावधीतील कॅशबुकच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरवाव्यात. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १४ द्वारे मागणी केलेली -कृषि विकास योजना सन २००४-०६ मध्ये विभागीय कार्यालयाकडून अकोले उपविभागातील शेती पंपाच्या विज कनेक्शनबाबत दिलेल्या तांत्रिक मंजूरी आदेशाची प्रत व फेरमंजूरीच्या प्रती - ही माहिती अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे. याचबरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १५ मध्ये, अकोले अपहार प्रकरणी श्री. डी.एन.कुऱ्हाडे, एल.डी.सी. यांनी या प्रकरणी दोन पावत्या व नंतर तीन पावत्या तयार केल्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील टिपणीची प्रत आणि बी-६० मधील तपासणी केलेल्या पृष्ठांच्या प्रती, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या आहेत. तथापि अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. या मुद्यावरील माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) वा ९ चा भंग होईल, असे जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन आयोगास आढळून आले नाही. त्यामुळे या मुद्यावरील माहिती देखील जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस द्यावी लागेल.

वरील परिच्छेदामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील अद्यापपावेतो अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त व्हावयाची माहिती आणि अपिलार्थीस त्यापैकी देय असलेली माहिती याचे वरीलप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाच्या राहिलेल्या माहितीतील देय माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षतः ताब्यात नव्हती. त्यांना ही माहिती सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्या.उपविभाग,अकोले,जि.अहमदनगर आणि आस्थापना विभागाचे कनिष्ठ व्यवस्थापक (क) यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावयाची होती. तथापि त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे विहित वेळेत सादर न केल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस ते अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पुरवू शकले नाहीत, असे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. या दोनही तत्कालीन अधिकाऱ्यांची नावे - श्री. कोळपे (सध्या उपकार्यकारी अभियंता, लोणावळा येथे कार्यरत) व श्री. चितळे, कनिष्ठ व्यवस्थापक (क) (सध्या म.रा.वि.मं.कं.विभागीय कार्यालय, संगमनेर येथे कार्यरत) अशी असून त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदींमध्ये अपेक्षित असलेले सहाय्य न करुन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराने मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांना देखील 'माहिती अधिकारी ' समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी तत्कालीन सहायक अभियंता श्री. कोळपे (सध्या उपकार्यकारी अभियंता, लोणावळा या पदावर कार्यरत) व श्री. चितळे, कनिष्ठ

व्यवस्थापक (क) हे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना विहित कालावधीमध्ये उपलब्ध न करुन देण्यासाठी जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन यासंदर्भात त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस व्यवस्थापकीय संचालक,म.रा.वि.वि.कं.म.मुंबई यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील अद्यापपावेतो द्यावयाच्या माहितीपैकी, त्यांना वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय होत असलेली, संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.म.मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सहायक तत्कालीन सहायक अभियंता श्री. कोळपे (सध्या उपकार्यकारी अभियंता, लोणावळा येथे कार्यरत) व श्री. चितळे, कनिष्ठ व्यवस्थापक (क) (सध्या म.रा.वि.मं.कं.विभागीय कार्यालय, संगमनेर येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक २०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. घाणे गोपीनाथ निवृत्ती, अमृतनगर कॉलेज परिसर, नवलेवाडी, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, संगमनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, संगमनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड,बांद्रा (पूर्व),मुंबई-५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७००

निर्णय दिनांक २०.०२.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. किरण नाथा वैरागर,<br>मु. पो. घोडेगांव, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, नेवासा, तालुका नेवासा जिल्हा अहमदनगर | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता,
जि.प.सा. बां. उपविभाग, नेवासा,
जिल्हा अहमदनगर

त्रयस्थ पक्षः : श्री. खोले एस.एल.व श्री. देशमुख

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील जुना घोडेगाव ते शिंगणापूर रस्ता किलोमिटर ०/० ते ०/१२०० या रोहयो अंतर्गत केलेल्या रस्त्याच्या कामासंदर्भात एकूण चार मुद्यांद्वारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरवली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०८.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालिन व सध्याचे जन माहिती अधिकारी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील संदर्भित रस्त्याच्या खडीकरणापर्यंतच्या कामाच्या मस्टर्सच्या सत्यप्रती, श्री. खेले व श्री. देशमुख यांनी या रस्त्याच्या कामासंदर्भात वरिष्ठ कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती याचा समावेश नाही त्यांना त्या अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी या कामारील मजूरांच्या हजेरीपुस्तिका त्यांच्या कार्यालयाचे मार्गलिपीक (रोड कारकुन)यांच्या ताब्यात होत्या. त्यामुळे त्यांना या प्रती अपिलार्थीस त्यावेळी देता आल्या नाहीत. त्यांनी आयोगास पुढे

असेही अवगत केले की, श्री. देशमुख यांनी या रस्त्याच्या कामासंदर्भात वरिष्ठ कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त असलेल्या माहितीचे विवेचन केले आहे. या माहितीपैकी संदर्भित रस्त्यावरील मजूरांच्या हजेरीपुस्तिकांच्या सत्यप्रती व श्री. एस.एल.खेले, शाखा अभियंता यांनी या रस्त्याच्या कामासंदर्भात वरिष्ठ कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत. श्री. देशमुख यांनी या रस्त्याच्या कामासंदर्भात वरिष्ठ कार्यालयाशी कोणताच पत्रव्यवहार केलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः, कार्यालयीन कामकाजाच्या कालावधीमध्ये, पूर्वनियोजित वेळी विनामूल्य पुरवावी.

श्री. देशमुख यांनी वरिष्ठ कार्यालयाशी संदर्भिय रस्त्याच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराविषयी जन माहिती अधिकारी यांनी, श्री. देशमुख यांनी अशाप्रकारचा पत्रव्यवहार वरिष्ठ कार्यालयाकडे केला नाही, असे कळवावे म्हणजे अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली संपूर्ण माहिती आता प्राप्त होऊ शकेल.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस आता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी लागेल.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रथमतः अपूर्णावस्थेत दिल्यामुळे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार 'माहिती अधिकारी 'समजावे अशी तरतुद आहे, अशा सर्वांवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किरण नाथा वैरागर, मु. पो. घोडेगांव, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता,जिल्हा परिषद सा. बां. उपविभाग, नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता,जिल्हा परिषद सा. बां. उपविभाग, नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७०१

निर्णय दिनांक २०.०२.२०१०

१ श्री. गोविंद नीळकंठ जोशी, : अपिलार्थी
पोलीस स्टेशनसमोर, कोपरगांव, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगरपालिका शिक्षण मंडळ, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी
नगरपालिका शिक्षण मंडळ, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात :जन माहिती अधिकारी : मुख्य लिपीक व लेखापाल,
नगर परिषद, कोपरगाव, जि.अहमदनगर.

जन अपिलीय अधिकारी : प्रशासन अधिकारी,
नगर परिषद, कोपरगाव, जि.अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून आयोगास, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील गीता प्रशाला या शाळेला, त्यांच्या शाळेतील पदवीधर शिक्षकांची जागा भरण्यासंदर्भात शिक्षणमंडळाने सन १९९४-९५ ते अपिलार्थीने मूळ अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत किती वेळा लेखी सूचना दिल्या, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०७.२००९ रोजीच्या अध्यक्ष/सचिव, गीता एज्युकेशन सोसायटी,कोपरगाव यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रासोबत अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत पाठविली व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस परस्पर पुरविण्याचे गीता एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष/सचिव यांना सूचविले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी, नगर परिषद शिक्षण मंडळ, कोपरगाव यांच्याकडे दि. ०६.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांचे प्रथम अपील अधिनियमातील कलम ८(क) नुसार नामंजूर केल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी  जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की,अपिलार्थीने ज्या शाळेच्या संदर्भात माहिती मागविली आहे, त्या शाळेतील शिक्षक भरती शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांच्यातर्फे होत असते. त्यांनी गीता प्रशालेस त्यांच्या शाळेतील पदवीधर शिक्षकांची पदे भरण्यासंदर्भात कधीही सूचना दिलेल्या नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने शिक्षण मंडळ, कोपरगाव नगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यालयाने गीता प्रशालेस पदवीधर शिक्षकांची पदे भरण्यासाठी किती वेळा लेखी सूचना दिल्या, अशी माहिती मागविली आहे. याचा अर्थ अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, शिक्षण मंडळाकडे उपलब्ध असावी असा होतो. त्यामुळे अपिलार्थीस शिक्षण मंडळाच्या जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणे मूलतः या प्रकरणी अभिप्रेत होते. तथापि शिक्षण मंडळाच्या जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित शाळेला पाठविली. शिक्षण मंडळाच्या जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस जसे माहिती देण्याचे अधिकार आहेत, तसेच माहिती नाकारण्याचे देखील अधिकार आहेत. त्यामुळे त्यांनी एकतर या प्रकरणी अपिलार्थीस माहिती नाकारावयाची होती किंवा जर त्यांनी अपिलार्थी त्यांच्या मूळ अर्जात म्हणतात, त्याप्रमाणे पत्रव्यवहार केला नसेल तर कोपरगाव नगरपरिषदेच्या शिक्षणमंडळाने गीता प्रशालेस पदवीधर शिक्षकांची पदे भरण्यासाठी कधीही पत्र लिहिलेले नाही, अशी माहिती अपिलार्थीस द्यावयास हवी होती. परंतु त्यांनी अपिलार्थीस सरळ माहिती देण्याचे टाळून संबंधित शिक्षण संस्थेस परस्पर माहिती देण्याचे सूचित केले. त्यांची ही कृती त्यांच्या कार्यशैलीतील जबाबदारी टाळणारी व कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करणारी अशी आहे, त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले, अशा निष्कर्षाप्रत येऊन मुख्याधिकारी, नगरपरिषद कोपरगाव यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक २०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोविंद नीळकंठ जोशी, पोलीस स्टेशनसमोर, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक व लेखापाल,नगर परिषद, कोपरगाव, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,नगर परिषद, कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७०२

निर्णय दिनांक २०.०२.२०१०

१. श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे, : अपिलार्थी
मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कोळपेवाडी,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात :जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (कृषि),
पंचायत समिती,कोपरगाव,
जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०९.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणी नंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पंचायत क्षेत्र हद्दीतील वृक्षतोड परवानगीबाबत काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पंचायत क्षेत्र हद्दीतील ग.नं. २७९ मध्ये (महेश्वरनगर) मुळापासून चार लिंब जातीची व एक चिंच जातीचे झाड व ग.नं. ७५ मधील (वडारवाडा विभाग) लिंब जातीची झाडे तोडण्यासाठी वनविभागाची परवानगी घ्यावी लागते, त्या परवानगीच्या प्रती, सदर झाडे तोडून श्री.अमजद अकबर शेख, वखार मालक कोळगावथडी यांना विकण्यात आलेल्या झाडांच्या किंमतीबाबतचा तपशील, पंचायत परवानगीची प्रत व झाडे तोडण्याबाबत संबंधित विभागास केलेल्या पत्रव्यवहाराच्या छायाप्रती, तसेच यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांची परवानगी घेतली नसल्यास त्यावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०८.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस काही शंका असल्यास, त्यांनी ग्राम विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे नमूद करुन त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. तथापि या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २४.०६.२००९ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती पाठविली आहे. याबाबत

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ते स्वत: अपिलार्थी यांच्या घरी गेले असता, अपिलार्थीने माहिती घेण्याचे नाकारले, त्यामुळे शेवटी त्यांनी ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने ज्या वृक्षतोडीच्या संदर्भात त्यांच्याकडे माहिती मागविली आहे, ती झाडे ग्रामपंचायतीच्या मालकीची नाहीत व तसेच ते क्षेत्र ग्रामपंचायत हद्दीत येत नाही. त्यामुळे ही झाडे कोणी तोडली याचा कोणताही तपशील त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असणे संभवत नाही, कारण ही बाब पूर्णत: खाजगी आहे. जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या प्रकरणाशी संबंधित काही माहिती मागविली आहे, ते प्रकरण पूर्णत: खाजगी आहे. कारण अपिलार्थीने ज्या वृक्षतोडीच्या संदर्भात माहिती मागविली आहे, त्या वृक्षांची मालकी व तसेच सदरचे वृक्ष ज्या जमिनीत आहेत, त्या जमिनीची व झाडांची मालकी ग्रामपंचायतीची नाही व सदरचे क्षेत्र ग्रामपंचायत हद्दीत येत नाही, त्यामुळे साहजिकच अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यामध्ये उपलब्ध असणे संभवत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थीस काहीशी वेगळी माहिती दिली आहे. त्यांनी अपिलार्थीस अशी माहिती दिली आहे की, वृक्षतोडीस त्यांच्या कार्यालयाने कोणतीही परवानगी दिली नाही व याबाबत वरिष्ठांना कळविण्यात आलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली ही माहिती, अपिलार्थीची दिशाभूल करणारी आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस त्यांच्या युक्तिवादामध्ये वर स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य माहिती पुरवावी.

अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, कोळपेवाडी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती पैकी, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली वस्तुस्थितीदर्शक माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे, मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि),पंचायत समिती,कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७०३

निर्णय दिनांक  २०.०२.२०१०

१. श्री. जगताप राजू दगडू, : अपिलार्थी
मु. पो. तळेगांव दिघे, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
माध्यमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी,
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शैक्षणिक वर्ष १९९८ -९९ ते दि. २०.०८.२००९ पर्यंतच्या कालावधीतील काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्रामीण विकास केंद्र, कणकुरी, ता.राहाता,जि.अहमदनगर या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिलेल्या मान्यतेच्या सत्यप्रती, सहायक आयुक्त, मागास कक्ष, नाशिक यांनी तपासून दिलेल्या अनुशेष तक्त्याच्या सत्यप्रती, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यतेची कार्यालयीन टिपणीची सत्यप्रत, संस्थेने भरती-बढती करताना दिलेल्या वर्तमानपत्रातील जाहिरातीच्या सत्यप्रती आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांची अद्ययावत ज्येष्ठतासूची - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.०९.२००९ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णय दि. ०८.१०.२००९ रोजी, म्हणजेच त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर दिला असून जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे संस्थेने अपिलार्थीस दि. ०८.०२.२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने त्यांना अपेक्षित माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी संबंधित संस्थेने अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहितीचा समावेश नाही. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांच्या कार्यालयाकडे ज्या मुद्यावर माहिती मागविली आहे, त्या मुद्याशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याचा कालावधी तीन वर्षे इतका आहे. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातर्फे नष्ट करण्यात आली आहे. हा मुद्दा वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती संस्थेने अपिलार्थीस दिली आहे. या मुद्याबाबत असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध असणे अभिप्रेत आहे, ती माहिती मागविली आहे, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देताना, ही माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी देणे मूलतः अभिप्रेत होते,तथापि त्यांनी या प्रकरणी तशी कृती केलेली नाही.

या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित संस्थेने त्यांना अपेक्षित माहिती पुरविली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना आयोग देत नाही. परंतु इतःपर त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या माहितीसाठीच्या अर्जावर, त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात माहिती देताना ती जन माहिती अधिकारी यांनीच स्वतःच्या स्वाक्षरीने दिली पाहिजे, याची त्यांनी कटाक्षाने काळजी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात शिक्षण विभागातील अधिकारी हे संबंधित संस्थेस अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती परस्पर देण्याचे सूचित करतात, त्यांची ही कृती सर्वथा गैर व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे विसंगत आहे. माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी अशा विसंगत पध्दतीने करण्यात येत असल्याबद्दल सचिव (शालेय शिक्षण),मंत्रालय,मुंबई यांचे लक्ष वेधण्यात येत असून, त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, सर्वसाधारणपणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शिक्षण खात्याकडे मागविण्यात येणाऱ्या माहितीचे स्वरुप पाहता, अशाप्रकारची माहिती ही, शिक्षणाधिकारी अथवा त्यांचे वरिष्ठ क्षेत्रिय अधिकारी यांच्याकडे संगणकीय स्वरुपात संकलीत करुन जतन करुन ठेवण्यात यावी, जेणेकरुन या खात्यामध्ये प्रचलित असलेल्या पध्दतीनुसार जनसामान्यांना माहिती त्वरित उपलब्ध होईल व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकेल. सदर सूचना सचिव (शालेय शिक्षण) यांना अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) मधील तरतुदीप्रमाणे देण्यात येत आहेत. या प्रकरणी आता अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक २०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जगताप राजू दगडू, मु. पो. तळेगांव दिघे, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७०४

निर्णय दिनांक २०.०२.२०१०

१. श्री. इप्तेखार अकबर लेले, : अपिलार्थी
रा. बोधेगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी,
तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी,
तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,राहुरी, जि.अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. अमिर विष्णू लेले

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सिलिंग केस नं. १०/६४ च्या सन १९६१ ते

१९९८ पर्यंतच्या काही कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने त्यांच्या या अर्जासोबत त्यांना आवश्यक असलेल्या दहा कागदपत्रांची यादी जोडली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये आढळ होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०८.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, राहूरी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेली माहिती पूर्वी राहुरी तहसीलदार यांच्या ताब्यात होती, तथापि तदनंतर महसूल विभागाच्या झालेल्या पुनर्रचनेमुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या संदर्भित मिळकत/जमीनीबाबतचे अभिलेखे शेवगाव तालुका, नगर प्रांत यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत. त्यामुळे ती कागदपत्रे अपिलार्थीने शेवगाव तहसीलदार यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेणे सोईचे होईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपविभागीय अधिकारी, अहमदनगर व तहसीलदार, शेवगाव यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे शक्य आहे. अशावेळी निवासी नायब तहसीलदार, राहुरी तथा जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची प्रत तहसीलदार, शेवगाव व उपविभागीय अधिकारी, नगर कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठवावयास हवी होती, परंतु त्यांनी अशी कृती न केल्यामुळे अपिलार्थी हे कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. सबब जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, राहुरी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी, उपविभागीय अधिकारी, अहमदनगर व तहसीलदार, शेवगाव यांच्या कार्यालयात जाऊन अपिलार्थीने संदर्भित केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडून हस्तगत करुन नंतर ती माहिती अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य पुरवावी. या सूचनेचे अनुपालन करण्यासाठी त्यांना एकूण तीस दिवसांची मुदत देण्यात येत असून कोणत्याही परिस्थितीत त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या कालावधीमध्ये त्यांना जर संबंधितांच्याकडून माहिती उपलब्ध झाली नाही तर, त्यांनी तसा अहवाल तहसीलदार, राहुरी यांच्यामार्फत उपविभागीय अधिकारी, अहमदनगर यांना त्वरित सादर करावा आणि तदनंतर उपविभागीय अधिकारी, अहमदनगर यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यामध्ये जतन करुन ठेवली आहे आणि असे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर आवश्यकतेप्रमाणे फौजदारी अथवा प्रशासकीय कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त होण्यासाठी वरील निर्णयातील सूचनेचे अनुपालन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत करुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी.

ि.ठ.रु.४...

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. इप्तेखार अकबर लेले, रा. बोधेगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,राहुरी, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपविभागीय अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. तहसीलदार, शेवगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७०५

निर्णय दिनांक २०.०२.२०१०

१. श्री. सय्यद निसार मगबुल, : अपिलार्थी
व्दारा- साप्तहिक " भडकत्या ज्वाला " कार्यालय,
मेन रोड, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जामखेड,
तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.१०.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. २८.०१.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे

नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सा.बां.उपविभाग जामखेड,जि.अहमदनगर यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती समक्ष दाखविली असून, ही माहिती पाहून त्यांचे समाधान झाले आहे. त्यामुळे या अर्जामध्ये त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले, आज रोजीचे अपील क्र. ७०५/०९ हे दप्तरी दाखल करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने, अशाप्रकारे त्यांनी आयोगाकडे केलेले द्वितीय अपील दप्तरी दाखल करण्याची विनंती आयोगास केली असल्याने, त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक २०-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद निसार मगबुल, व्दारा- साप्तहिक " भडकत्या ज्वाला " कार्यालय, मेन रोड, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५२
निर्णय दिनांक २०.०२.२०१०

१ श्री. चंगेडे शशिकान्त पेमराज, : अपिलार्थी
३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अशोका इन्फ्रास्ट्रक्चर लि. ठेकेदार पुणे-शिरुर रस्ता,
अशोका आर्य, प्लॉट नं. ई. २८/२९, मार्केट यार्ड
गुलटेकडी, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधितांनी माहिती दिली नसल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये अशोका इन्फ्रास्ट्रक्चर लि.ठेकेदार, पुणे-शिरुर रस्ता, पुणे या संस्थेकडे, पुणे-शिरुर या रस्त्यावर मोटार वाहन

कायद्याचा भंग करुन गेलेल्या वाहनचालकांवर त्यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे दाखल केलेल्या गुन्हयांच्या संदर्भात वाहनचालकाचे नाव, पत्ता, वाहनाचा प्रकार व क्रमांक आणि गुन्हयाच्या घटनेसंबंधीची तारीख व वेळेबाबतची माहिती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित कंपनीने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांच्याकडे दि. २०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जासंदर्भात अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांनी दि. ०६.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अशोका इन्फ्रास्ट्रक्चर,लि. या कंपनीचे अपिलीय अधिकारी हे अधीक्षक अभियंता नसल्यामुळे अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांच्या कार्यालयात दि. ०८.१२.२००८ रोजी आयोजित केलेली सुनावणी रद्द केल्याचे अपिलार्थीस तसेच कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प यांना कळविले. अशाप्रकारे संबंधितांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०२.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, अशोका इन्फ्रास्ट्रक्चर कं.लि.चे प्रतिनिधी व अधीक्षक अभियंता, सा.बां.मं.पुणे यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. युक्तिवादामध्ये अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११(१) च्या तरतुदीचा आधार घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित कंपनीस आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात या

प्रकरणी अशोका इन्फ्रास्ट्रक्चर लि. या खाजगी कंपनीकडे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीअंतर्गत माहिती मागितली आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही नागरिकास सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहिती मागण्याचा अधिकार आहे. सार्वजनिक प्राधिकरण या शब्दाची व्याख्या अधिनियमातील कलम २(ज) मध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

**"सार्वजनिक प्राधिकरण" याचा अर्थ,--**

**(क) संविधानाद्वारे किंवा तदन्वये;**

**(ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;**

**(ग) राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;**

**(घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,**

**(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;**

**(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना,**

**यांचा समावेश होतो;"**

अपिलार्थीने या प्रकरणी ज्या खाजगी संस्थेकडे माहिती मागितली आहे, ती संस्था सार्वजनिक प्राधिकरण या शब्दाच्या वर स्पष्ट केलेल्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये कोणत्याही प्रकारे समाविष्ट होऊ शकत नाही. कारण ती संस्था पूर्णतः खाजगी आहे. या संस्थेच्या दैनंदिन व्यवहारावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही. तसेच या संस्थेच्या नियमित व्यवस्थापनाकरिता शासनाकडून या संस्थेला कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीने ज्या संस्थेकडे

माहितीची मागणी केली आहे, ती 'सार्वजनिक प्राधिकरण' नसल्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज अवैध होत असल्याचे सिध्द होत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये अधिनियमातील कलम ११(१) चा आधार घेऊन संबंधित कंपनीस अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि अधिनियमातील कलम ११ हे सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागणी केलेल्या माहितीतील त्रयस्थ पक्षाच्यासंदर्भातील माहितीशी संबंधित आहे. त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागताना देखील मूळात माहिती ही अर्जदारास सार्वजनिक प्राधिकरणाकडेच मागणे या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेला अधिनियमातील कलम ११ चा मुद्दा या प्रकरणी लागू होणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने मागणी केलेली संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २०-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंगेडे शशिकान्त पेमराज, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ व्यवस्थापक,अशोका इन्फ्रास्ट्रक्चर लि. प्लॉट नं.इ. २८, ग्राऊंड फ्लोअर, निसर्ग मंगल कार्यालयाजवळ, मार्केट यार्ड, गुलटेकडी,पुणे-४११ ०३७ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे  यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७४३
निर्णय दिनांकः २२-०२-२०१०

१. श्री. विजय सुधाकर जाधव, : अपिलार्थी
रा.टाकळी (सातचारी), ता.कोपरगांव,
जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी संचालक,
दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि.,
गौतमनगर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकाऱ्याविरुध्द कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२५.११.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधित

कारखान्याच्या कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि.१८.१२.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थी त्यांच्या कारखान्याचे सभासद नसल्यामुळे व आवश्यक असलेल्या माहितीची होणारी नक्कल फी त्यांनी त्यांच्या अर्जासोबत न पाठविल्याने त्यांचा अर्ज कायदेशीर होत नसल्याने तो रद्द करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने साखर संचालक, पुणे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २०.०२.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्र. १ ते ६ च्या संदर्भातील माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर यांना आदेशित केले. यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २२.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा

माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि.२०.०२.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.७४३/०९ फेटाळण्यात येत आहे.
२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि.२०.०२.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २२-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय सुधाकर जाधव, मु.पो. टाकळी (सातचारी), ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

२. कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, पो. कोळपेवाडी, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), त्रिलोक चेंबर्स, लालटाकी

रोड, हुतात्मा स्मारकाजवळ, अहमदनगर.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७९३
निर्णय दिनांक: २२-०२-२०१०

१. श्री. अविनाश प्रभाकर पानगव्हाणे, : अपिलार्थी
रा.माहेगांव देशमुख, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी संचालक,
दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि.,
गौतमनगर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.२८.११.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांकडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार दि. २९.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २२.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील

फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.७९३/०९ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अविनाश प्रभाकर पानगव्हाणे, मु.माहेगांव देशमुख, पो.कोळपेवाडी, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

२. कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, पो. कोळपेवाडी, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), त्रिलोक चेंबर्स, लालटाकी रोड, हुतात्मा स्मारकाजवळ, अहमदनगर.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७९४
निर्णय दिनांकः २२-०२-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२५.०२.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०२.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक

(साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २०.०६.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी यांना आदेशित केले. यानंतर माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २२.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. २०.०६.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित

करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.७९४/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. २०.०६.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २२-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७९५
निर्णय दिनांक २२/०२/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मिलिंद वसंतराव विटेकर,<br>रा.सोनपेठ, जि. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,<br>परभणी | | |

**निर्णय**

श्री. मिलिंद वसंतराव विटेकर यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २५.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०३.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, 'दत्त कृपा', ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, ता.सोनपेठ, जि.परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७९७
निर्णय दिनांक  २२/०२/२०१०

१ श्री. बापुराव भानुदासराव सिरसट, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय, बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, बीड

**निर्णय**

श्री. बापुराव भानुदासराव सिरसट यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २७.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०३.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि.०५.११.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ५९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२/०२/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बापुराव भानुदासराव सिरसट, गजानन नगर, नाळवंडी रोड, बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९९
निर्णय दिनांक: २२-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. विजय सुधाकर जाधव,<br>रा.टाकळी (सातचारी), ता.कोपरगांव,<br>जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी संचालक,<br>दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि.,<br>गौतमनगर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक सहसंचालक (साखर),<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयाकडे दि.१८.०४.२००९ रोजी व औरंगाबाद खंडपीठाकडे दि. ०१.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकाऱ्याविरुध्द कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.२५.११.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर

यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधित कारखान्याच्या कार्यकारी संचालकांनी त्यांच्या दि.१८.१२.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थी त्यांच्या कारखान्याचे सभासद नसल्यामुळे व आवश्यक असलेल्या माहितीची होणारी नक्कल फी त्यांनी त्यांच्या अर्जासोबत न पाठविल्याने त्यांचा अर्ज कायदेशीर होत नसल्याने तो रद्द करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने साखर संचालक, पुणे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २०.०२.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्र. १ ते ६ च्या संदर्भातील माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर यांना आदेशित केले. यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २२.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनुपस्थित व प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे

आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि.२०.०२.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.८९९/०९ फेटाळण्यात येत आहे.
२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि.२०.०२.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: २२-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय सुधाकर जाधव, मु.पो. टाकळी (सातचारी), ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

२. कार्यकारी संचालक, दि.कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर, पो. कोळपेवाडी, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), त्रिलोक चेंबर्स, लालटाकी रोड, हुतात्मा स्मारकाजवळ, अहमदनगर.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२०६
निर्णय दिनांकः २२-०२-२०१०

१. श्री. अविनाश मनोहर कुटे पाटील, : अपिलार्थी
कोरेगांव (तऱ्हाळ वस्ती), ता.श्रीरामपूर,
जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी संचालक,
नगर तालुका सहकारी साखर कारखाना लि.,
वाळकी, ता.जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०३.१२.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, नगर तालुका सहकारी साखर कारखाना लि., वाळकी, ता.जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक

सहसंचालक (साखर), अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. ११.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०३.०३.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना १५ दिवसात विनामूल्य देण्याचे कार्यकारी संचालक, नगर तालुका सहकारी साखर कारखाना लि., वाळकी, ता.जि.अहमदनगर यांना आदेशित केले. यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २२.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक, प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर  हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि.०३.०३.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२०६/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांचे दि.०३.०३.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २२-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अविनाश मनोहर कुटे पाटील, व्दारा-विजय रावसाहेब तऱ्हाळ, मु.पो.कारेगांव (तऱ्हाळ वस्ती), ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

२. कार्यकारी संचालक, नगर तालुका सहकारी साखर कारखाना लि., वाळकी, ता.जि.अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), त्रिलोक चेंबर्स, लालटाकी रोड, हुतात्मा स्मारकाजवळ, अहमदनगर.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७०९

निर्णय दिनांक २२-०२-२०१०

१ सौ. कविता अ. गौर, : अपिलार्थी

रा. प्लॉट नं. २, बिल्डींग सी. - १, सारानगर,

एन-१, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी

समिती क्र.१, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

सदस्य व विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय

जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती न पुरविल्यामुळे आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत दिनांक ०६-११-२००८ ते १४-०१-२००९ या कालावधीत किती प्रकरणात 'राजपुत भामटा' या जातीच्या किती विद्यार्थ्यांना व शासकीय सेवेतील लोकांना या जातीचे वैधता प्रमाणपत्र देण्यात आले त्याची यादी, संबंधितांनी वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत त्यांच्या दाव्यापृष्ठ्यर्थ दाखल केलेल्या शाळेची टी.सी., प्रवेश निर्गम उतारा, महसूल पुरावा आणि जुने महत्त्वाची कागदपत्रे व पोलीस दक्षता पथकाच्या अहवालाची प्रत, पोलीस दक्षता पथकाचा अहवाल समितीस प्राप्त झाल्याचा दिनांक, सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर वैधता प्रमाणपत्र देण्यात आल्याचे दिनांक, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीचा सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी प्राप्त झाल्याचे या अर्जाच्या प्रतीवरील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या शिक्क्यावरुन दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची दखल न घेतल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी

यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. तसेच त्यांनी त्रयस्थ पक्षाविषयी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप देखिल सार्वजनिक असल्यामुळे त्रयस्थ पक्षाची ही माहिती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नसावा. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. कविता अ. गौर, प्लॉट नं. २, बिल्डींग सी. - १, सारानगर, एन-१, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य व विभागीय समाजकल्याण अधिकारी,

विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७१०

निर्णय दिनांक २२-०२-२०१०

१ सौ. कविता अ. गौर, : अपिलार्थी

रा. प्लॉट क्र.२, सारानगर, एन-१, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी

समिती क्र.१, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

सदस्य, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी

समिती क्र.१, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : १) श्री. किसनसिंग बहुरे व २) श्री. कच्छवे अमृतराव उत्तमराव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १५-०१-२००९ रोजी काही माहिती मागविली असता, ती मुदतीत न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी श्री. वाकोडे यांच्याकडे दिनांक १४-०२-२००९ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले असता, त्यांच्याकडून

कोणतीही कार्यवाही न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. किसनसिंग बहुरे व श्री. कच्छवे अमृतराव उत्तमराव यांच्या संदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. बहुरे यांच्याबाबतीत दक्षता पथकाने जिल्हा परिषद हायस्कूल, घनसावंगी यांना त्रयस्थ पक्षाचे शालेय रेकॉर्ड देण्यासाठी व या संदर्भात संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी रेकॉर्ड जळाल्याचे ज्या पत्राद्वारे कळविले त्या पत्राची प्रत (दक्षता पथक अहवाल पृष्ठ क्रमांक १५७ व १५९) आणि श्री. कच्छवे अमृतराव उत्तमराव यांच्याबाबतीत दक्षता पथकाने दिनांक १३-०८-२००८ रोजी सादर केलेल्या अहवालाची आणि कुटुंब वंशावळीच्या शपथपत्राची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जरी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जन

माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असली तरीही, ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे आणि ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) व (९) मधील कोणत्याही तरतुदीचा प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे भंग होईल असे आयोगास वाटत नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती उघड करावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. कविता अ. गौर, प्लॉट क्र.२, सारानगर, एन-१, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ७११/०९ व ७१२/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७११ व ७१२

निर्णय दिनांक २२-०२-२०१०

१ श्री. विठ्ठल तुळशीराम माने, : अपिलार्थी
रा. नागराळ, पो. गुंजोटी, तालुका उमरगा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

अपील क्रमांक ७११/२००९

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, उमरगा,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, उस्मानाबाद

अपील क्रमांक ७१२/२००९

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा,
तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

उस्मानाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०३-२००९ व दिनांक १९-०३-२००९ रोजी नोंदविलेली ७११/२००९ व ७१२/२००९ या क्रमांकाची दोन व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची प्रथम अपिले फेटाळल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जाव्दारे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, उमरगा व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी ते त्यांच्या कार्यालयातील सर्व कर्मचा-यांच्यासहीत त्यांची मूळ वडिलोपार्जीत मालमत्ता, अर्जाच्या दिनांकाच्या वेळी अस्तित्वात असलेली मालमत्ता, जमीनजुमला, इमारत, दागदागिने, बँक ठेवी, रोख रक्कम, गुंतवणूक व इतर स्थावर जंगम मालमत्तेविषयी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, उमरगा यांनी दिनांक १८-११-२००८ रोजी व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा यांनी दिनांक २०-११-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) नुसार नाकारली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अधीक्षक भूमि अभिलेख,

उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपील अर्ज सादर केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर अधीक्षक भूमि अभिलेख, उस्मानाबाद यांनी दिनांक ३१-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील विनाकार्यवाही निकाली काढले. त्यांच्या या निर्णयाचे कारण त्यांनी अपिलार्थी त्यांच्याकडील सुनावणीस अनुपस्थित राहिले असे दिले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी दिनांक १०-०२-२००९ रोजी अपिलार्थी सुनावणीस हजर राहिले नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राह्य धरुन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. या दोनही जन अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील दोनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक ७११/२००९ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपील क्रमांक ७१२/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित अपिलार्थी गैरहजर आहेत.

या प्रकरणांशी संबंधित घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व संबंधितांकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत केलेली कार्यवाही पाहता ही कार्यवाही बरोबर असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. ती माहिती उघड केल्याने अपिलार्थी नेमके कोणते जनहित साध्य करणार आहेत याचा तपशील त्यांनी आयोगास सादर केलेल्या त्यांच्या दोनही व्दितीय अपील अर्जांमध्ये सादर केलेला नाही. हा युक्तिवाद तोंडी स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. एवढे असूनही अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होईल, असे आयोगास वाटत नाही. परंतु त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीमध्ये मात्र आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता निर्माण मात्र होऊ शकते व त्याव्दारे अधिनियमातील कलम ८ (१) (ज) चा भंग होऊ शकतो, अशी आयोगाची खात्री झाली आहे. हे पाहता अपिलार्थीची विचाराधीन अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ७११/२००९ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ७१२/२००९ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विठ्ठल तुळशीराम माने, रा. नागराळ, पो. गुंजोटी, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, उमरगा, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा, तालुका

लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९६

निर्णय दिनांक २२-०२-२०१०

१ श्री. गणपत नवसोबा ढोके, : अपिलार्थी
रा. एन-१२, एच- ९६, हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय,
फुलंब्री, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उप जिल्हाधिकारी, उपविभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत्याक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये तहसीलदार, फुलंब्री यांच्याकडे "गट नंबर १०४२ मौजे फुलंब्री मधील (ओ. आर. २९) आसाराम नवसोबा, गणपत नवसोबा, मैनाबाई नारायण या संयुक्त नावावर असलेल्या जमिनीचा दाखला (०.२९ R) मिळणेबाबत" अशा प्रकारची माहिती पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २४-१२-२००८ रोजी उप जिल्हाधिकारी, उपविभागीय कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे या प्रकरणाच्या संदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीमध्ये अपिलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०२-०३-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि या संदर्भातील पुरावा त्यांच्याकडे मागितला असता, त्यांनी अपिलार्थीची पोच त्यांच्या कार्यालयाच्या रजिस्टरमध्ये घेतली असल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थीस त्यांनी नेमकी कोणती माहिती दिली हे आयोगास दर्शविण्यास त्यांनी असमर्थता व्यक्त केली. यावर जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने तहसीलदार, फुलंब्री यांच्याकडून त्यांच्या कार्यालयास दिनांक ०४-०३-२००९ रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. या पत्रामध्ये तहसीलदार, फुलंब्री यांनी श्री. गणपत नवसोबा ढोके यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांच्या ७/१२ वर २९ गुंठे इतक्या क्षेत्राची नोंद घेतल्याचा अहवाल सादर केला असल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या

म्हणण्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०३-२००९ रोजी माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानावर विश्वास ठेवावयाचा झाल्यास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. परंतु ती अपिलार्थीस पुरविली असल्याच्या संदर्भातील कोणताही पुरावा त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०३-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली असे गृहीत धरले तरीही, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना एकूण ६४ दिवसाचा विलंब लागल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण असावी असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीस ६४ दिवसाच्या विलंबाने माहिती पुरविल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. तथापि या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. शंकरराव लाड यांना आता शासकीय सेवेतून काढून टाकण्यात आले असल्यामुळे, त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सध्याचे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणपत नवसोबा ढोके, एन-१२, एच- ९६, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९७

निर्णय दिनांक २२-०२-२०१०

१ श्री. प्रल्हाद शंकरराव गुंजकर, : अपिलार्थी
रा. सुराणा नगर पाण्याच्या टाकीजवळ, हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, कळमनुरी, जि. हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपजिल्हाधिकारी, हिंगोली

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, कळमनुरी, जि. हिंगोली
जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी या प्रकारणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि हा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून

त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्व्हे क्रमांक १८९-१-८, १८४-९ मध्ये तलाठी सजा कळमनुरी यांनी सन २००५-२००६ मध्ये घेतलेला फेर क्रमांक ४२३९ ज्या कागदपत्रांच्या आधारे घेतला त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिश: मागितली होती. यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१२-२००८ व २३-१२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिश: हजर होऊनही त्यांना कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी दिनांक २३-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना माहिती मिळाली नसल्याचे तहसीलदार, कळमनुरी यांना कळविले. तथापि या पत्रव्यवहाराचा काही उपयोग न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा, कळमनुरी यांना सूचित केले. परंतु या कालावधीमध्ये अपिलार्थीस माहिती न मिळाल्यामुळे व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या ७/१२ उताऱ्यावर सिव्हील जज्ज, सिनीअर डिव्हीजन, हिंगोली यांच्या दिनांक २५-०२-२००५ रोजीच्या आदेशाप्रमाणे फेर घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयातर्फे तलाठी सजा, कळमनुरी यांना दिनांक ३१-०७-२००६ रोजी कळविले होते. त्यांच्या या पत्रासोबत सिव्हिल जज्ज, सिनीअर डिव्हीजन, हिंगोली यांच्या निर्णयाची प्रत त्यांनी जोडली होती. ही कागदपत्रे तलाठी सजा, कळमनुरी यांच्या हातून हरविल्यामुळे ती त्यांना अपिलार्थीस पुरविता आली नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, व जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, तलाठी सजा, कळमनुरी यांनी तहसीलदार, कळमनुरी यांना दिनांक २४-११-२००८ रोजी असा अहवाल सादर केला की, फेर क्रमांक ४२३९ ची कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. परंतु त्यांनी ही कागदपत्रे तपासल्याची नोंद केली आणि फेर क्रमांक ४२३९ दिनांक २०-०१-२००६ रोजी श्री. वाकोडे, नायब तहसीलदार (महसूल) यांच्याकडून मंजूर करुन घेतला. जन माहिती अधिकारी यांचा आजचा युक्तिवाद पाहता ही कागदपत्रे प्रत्यक्षात तलाठी सजा, कळमनुरी यांच्याकडे उपलब्ध असावयास हवीत. परंतु आजतागायत अपिलार्थीस ही कागदपत्रे तलाठी सजा, कळमनुरी यांच्याकडून प्राप्त होऊ शकलेली नाहीत. तेव्हा अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने तलाठी सजा, कळमनुरी यांना ही कागदपत्रे शोधण्यासाठी आयोगातर्फे पुनश्च् संधी देण्यात येऊन, असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात या प्रकरणी तलाठी सजा, कळमनुरी व तत्कालीन नायब तहसीलदार (महसूल), श्री. वाकोडे (सध्या नांदेड येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीच्या ७/१२ च्या उताऱ्यावर कोणत्याही कागदपत्राची शहानिशा न करता फेर मंजुर करुन आपल्या कार्यशैलीतील नितांत

सचोटीच्या अभाव स्पष्ट केल्याचे सिध्द होत आहे. सबब आयुक्त (महसूल), औरंगाबाद यांना संबंधित नायब तहसीलदार, श्री. वाकोडे (सध्या तहसील कार्यालय, नांदेड येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असताना देखिल अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये ती न पुरवून तलाठी सजा, कळमनुरी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब तत्कालीन तलाठी सजा, कळमनुरी श्री. ए.एम. सुळे यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर एकूण २५०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. या कालावधीमध्ये त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तत्कालीन तलाठी सजा, कळमनुरी श्री. ए. एम. सुळे यांना या प्रकरणी एकूण २५०००/-रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रल्हाद शंकरराव गुंजकर, सुराणा नगर पाण्याच्या टाकीजवळ, हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. ए. एम. सुळे, तत्कालीन तलाठी, सजा कळमनुरी, जि. हिंगोली (मार्फत-तहसीलदार, कळमनुरी, जि. हिंगोली) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५ विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९८

निर्णय दिनांक २२-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती शकुंतला चंद्रसेन बोंदर,<br>महसूल कॉलनी, कळंब, तालुका कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम, तालुका भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी प्रथमतः श्रीमती शकुंतला चंद्रसेन बोंदर यांनी तहसीलदार तथा माहिती अधिकारी यांच्याकडे, सी. आर. बोंदर (अव्वल कारकून, तहसील कार्यालय, कळंब) यांच्या मृत्युनंतर त्यांना मिळणारे जी. आय. एस., पॉलीसी रक्कम, भविष्यनिर्वाह निधी व मृत्यु नि सेवा उपदानाशी संबंधित माहिती, व्यक्तिशः मागितली होती व त्यांचे पती दिनांक १८-०२-२००७ रोजी नैसर्गिकरित्या मृत्यु पावल्यानंतरही त्यांचे प्रकरण निकाली काढण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम यांच्याकडे दिनांक ०७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम यांनी त्यांच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे मंजूर करुन अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी नायब तहसीलदार (नि.), तहसील कार्यालय, कळंब श्री. वासुदेव संपती शिंदे हे हजर आहेत. त्यांनी तहसीलदार, कळंब यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २२-०२-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये तहसीलदार, कळंब यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे आणि अपिलार्थीने गैरसमजुतीने आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे. तहसीलदार, कळंब यांनी

आयोगास उद्देशून लिहिलेल्या या पत्रासोबत अपिलार्थीने त्यांना लिहिलेल्या विनादिनांकाच्या पत्राची प्रत सादर केली असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी तहसीलदार, कळंब यांच्याकडे केलेले प्रथम अपील मागे घेतले असल्याचे नमूद केले आहे. या सर्व पत्रव्यवहारावरुन आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याने अपिलार्थीस आयोगाकडे त्यांनी दाखल केलेले व्दितीय अपील चालविण्यामध्ये स्वारस्य नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती शकुंतला चंद्रसेन बोंदर, महसूल कॉलनी, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७१

निर्णय दिनांक २२-०२-२०१०

१ श्री. पंडीत गंगाराम शेकापुरे, : अपिलार्थी
प्रयोगशाळा परिचर,
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्राचार्य, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय सह संचालक,
उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. संदिप कौलवार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२०१० रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती दिल्यामुळे व मूळ प्रमाणपत्राच्या सत्यप्रती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या महाविद्यालयामध्ये श्री. संदिप कौलवार यांना, पदोन्नतीसाठी पात्र कर्मचारी उपलब्ध असतांना व शासनाचे जी. आर. असतांना कसे घेतले, श्री. संदिप कौलवार यांची लिपीक पदी केव्हापासून नियुक्ती करण्यात आली, त्यांचा पगार केव्हा काढला, त्यांच्या नेमणुकीस मान्यता दिल्याचे पत्र, नेमणुकीच्या पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत व आजपर्यंत त्यांना दिलेला पगार याची माहिती आणि या कालावधीमध्ये प्राध्यापक म्हणून त्यांनी उचललेल्या पगाराची माहिती अशा प्रकारची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्रयस्थ पक्ष श्री. संदिप कौलवार यांचे नेमणूक आदेश व मान्यता पत्र अपिलार्थीस पुरविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांच्याकडे दिनांक १८-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता संबंधित महाविद्यालयास दिनांक २२-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०१-२००७ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. तथापि यापैकी श्री. संदिप कौलवार यांच्या पदोन्नतीबाबत त्यांनी मागितलेली माहिती ही अपिलार्थीस देय होत नाही, कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयासंदर्भात खुलासे, कारणे अथवा स्पष्टीकरणे अर्जदारास देणे अभिप्रेत नाही. परिणामी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना देय होत नाही. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, श्री. संदिप कौलवार यांचे नेमणूक आदेश व मान्यता पत्र ही माहिती दिनांक ०६-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. मात्र उर्वरित मुद्दयावरील अपिलार्थीस देय असलेली माहिती पुरविल्याचा पुरावा त्यांना आयोगास सादर करता आला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहितीचा समावेश नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत दोन साक्षीदारांच्या उपस्थित विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून उपरोक्त

कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत दोन साक्षीदारांच्या उपस्थित विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पंडीत गंगाराम शेकापुरे, प्रयोगशाळा परिचर, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८८२
निर्णय दिनांक: २४-०२-२०१०

१. चेअरमन, : अपिलार्थी
आकाश मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे

**विरुध्द**

१. जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील "शासकीय प्राधिकरण" अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे आकाश मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २४.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

"**It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable.”**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार “सार्वजनिक प्राधिकरण” असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, आकाश मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री. बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: २४-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, आकाश मजुर सहकारी सोसायटी मर्या., टेऊ नगर, प्लॉट नं.६, धुळे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८८३
निर्णय दिनांक: २४-०२-२०१०

१. चेअरमन, : अपिलार्थी
श्री लक्ष्मी मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे

**विरुध्द**

१. जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील "शासकीय प्राधिकरण" अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे श्री लक्ष्मी मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २४.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, श्री लक्ष्मी मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री. बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, श्री लक्ष्मी मजूर सहकारी सोसायटी मर्या., १० ऋणानुबंध, शिवप्रताप कॉलनी, देवपूर, धुळे

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८८४
निर्णय दिनांक: २४-०२-२०१०

१. चेअरमन, : अपिलार्थी
कन्हैय्यालाल मजूर सहकारी सोसायटी मर्या., शेवगे,
ता.साक्री, जि. धुळे

**विरुध्द**

१. जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील "शासकीय प्राधिकरण" अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे कन्हैय्यालाल मजूर सहकारी सोसायटी मर्या., शेवगे, ता.साक्री, जि. धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २४.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, कन्हैय्यालाल मजूर सहकारी सोसायटी मर्या., शेवगे, ता.साक्री, जि.धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार

अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री.बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, कन्हैय्यालाल मजूर सहकारी सोसायटी मर्या., मु.पो. शेवगे, ता.साक्री, जि.धुळे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८८५
निर्णय दिनांक: २४-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. चेअरमन,<br>प्रज्योल मजूर सहकारी सोसायटी मर्या., कापडणे,<br>ता.जि.धुळे | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, धुळे | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील "शासकीय प्राधिकरण" अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे प्रज्योल मजूर सहकारी सोसायटी मर्या., कापडणे, ता.जि.धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या  निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २४.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम  विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, प्रज्योल मजूर सहकारी सोसायटी मर्या., कापडणे, ता.जि.धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री. बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, प्रज्योल मजूर सहकारी सोसायटी मर्या., कापडणे, ता.जि.धुळे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६७

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. संतोष रामदास करपे, : अपिलार्थी

रा. साळीवाडा, मु.पो. ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

वनपरिक्षेत्र अधिकारी, वन कार्यालय, खुलताबाद,

जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

सहायक वनसंरक्षक, वनसंरक्षक कार्यालय,

वन विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक १ मध्ये अपिलार्थीने त्यांना ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित

आहे त्या प्रकरणाचे थोडक्यात वर्णन केले आहे. उर्वरित माहितीमध्ये - नायब तहसीलदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे स्थानिक तलाठी श्री. मोदी अप्पा यांच्यामार्फत हरीणांनी शेतकऱ्यांच्या पिकाच्या केलेल्या नुकसानीचा पंचनामा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाला काय खुलासा केला त्या लेखी खुलाश्याची प्रत, वन परिक्षेत्रात हरणांनी केलेल्या पीक नुकसानीबाबत ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांचे अर्ज व त्या अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे नावानिशी घेतली असता ते अर्ज पीक न बघता घेणे योग्य की अयोग्य याबाबत लेखी खुलासा व आपल्या वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाची प्रत, शासनाने ठरवून दिलेल्या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक आहे किंवा कसे याबाबतीत त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाची लेखी प्रत, हरणांनी केलेल्या पीक नुकसानीसाठी शेतकऱ्यांनी केलेल्या सर्व अर्जाच्या झेरॉक्स प्रती, आवक जावक रजिस्टरच्या प्रती व ज्या अधिकाऱ्यांनी नोंद केली त्या अधिकाऱ्यांचे नाव, पद आणि सन २००६ जानेवारी ते दि. २४ -१०-२००८ या तारखेपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या, या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी केलेले खुलासे, या कालावधीमध्ये नागरीकांच्या तक्रारीनुसार तहसील कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे किती वेळेस पंचनामे केले व त्यावेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते किंवा कसे आणि या संदर्भात वरिष्ठ कार्यालयास केलेले खुलासे - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती आणि त्यांनी या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक यांच्याकडे दिनांक २४-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०१-

२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत सांक्षांकित स्वरुपात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो माहिती दिली नसल्याचे त्यांनी आयोगास स्पष्ट केले व आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी ज्यावेळी त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेतली, त्यावेळी या सुनावणीस संबंधित जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित राहीले व त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-११-२००८ रोजी तयार करुन ठेवलेली होती. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, ते अपिलार्थी ही माहिती घेऊन जातील या अपेक्षने अपिलार्थीची वाट पाहत राहिले. परंतु अपिलार्थी माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते आता अपिलार्थीस १० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकरी यांच्याकडे मागणी केलेल्या

माहितीपैकी बरीचशी माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. कारण अर्जातील या मुद्यांद्वारे व मुद्यातील काही भागाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे खुलासे व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस देय असलेली माहिती यांचे पृथक्करण केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून - अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील, 'नायब तहसीलदाराने केलेल्या पंचनाम्यासंदर्भात त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केलेले खुलासे', मुद्दा क्रमांक ३ मधील, 'हरणांनी केलेल्या पीक नुकसानीबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या आदेशाची प्रत', मुद्दा क्रमांक ४ मधील, 'ठरविलेल्या दिवशी उपस्थित राहणेबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास वरिष्ठ कार्यालयाने आदेश दिले असल्यास त्याची लेखी प्रत', मुद्दा क्रमांक ५ मधील, 'हरणांनी केलेल्या पीक नुकसानीसाठी शेतकऱ्यांनी केलेल्या अर्जांच्या प्रती, अर्जाची नोंद असलेल्या आवक / जावक रजिस्टरच्या संबंधित पृष्ठांच्या प्रती, आवक / जावक रजिस्टरमध्ये नोंद घेणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव व पद', मुद्दा क्रमांक ६ मधील, 'जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास २ जानेवारी २००६ ते २४-१०-२००८ पर्यंत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या, व त्यासंदर्भात त्यांनी संबंधित अर्जदारास केलेले खुलासे अथवा दिलेली माहिती आणि तहसील कार्यालयाने किती वेळा पंचनामे केले व या पंचनाम्यासंदर्भात वरिष्ठ कार्यालयास केलेला खुलासा' - या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. ही माहिती १० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे

आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली ही संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यानंतर या अर्जाच्या संदर्भातील पुढील घडामोडी ज्ञात करुन घेणे ही अपिलार्थीची स्वतःची जबाबदारी होती. परंतु या प्रकरणी त्यांनी ही जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केला नाही किंवा द्वितीय अपील अर्जासोबत जोडला नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईचे आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतोष रामदास करपे, साळीवाडा, मु.पो. ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वन कार्यालय, खुलताबाद, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, वनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६८

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. ज्ञानेश्वर एकनाथ खंडागळे,<br>मु.पो. पुरी, ता गंगापूर, जि औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे<br>विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे<br>विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे आणि त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या सेवेत कसूर केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची व शास्तीची कार्यवाही आदेशित करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील एन. एस. एफ.डी.सी. योजना, बिजभांडवल योजना, अनुदान बँक कर्ज योजना, महिला समृध्दी योजना व मायक्रो योजना या योजनांच्या संदर्भात दिनांक ०१-०१-२००४ ते ०१-०९-२००८ या कालावधीमध्ये या योजनेअंतर्गत अनुदान देण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या याद्या, प्रत्येक योजनेचे अर्ज वाटप रजिस्टर, अर्ज स्वीकारलेले नोंद रजिस्टर, जेष्ठता यादीचे रजिस्टर आणि प्रत्येक योजनेचे वाटप रजिस्टर यांच्या प्रती, या योजनेची जेष्ठता यादी, प्रतीक्षा यादी, वाटप यादीच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील नागरीक असल्याचे नमूद करुन त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-१२-२००८ रोजी सुनावणी ठेवली असल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. तथापि सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर न राहिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय होऊ शकलेला नाही. परंतु या नंतर दिनांक ०४-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती मोठ्या स्वरुपाची असल्यामुळे ती माहिती पाहून जाण्याचे सूचित केले. अपिलार्थीस मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित

होऊन अपिलर्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस ही माहिती १० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले व त्याचबरोबर आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार होती, तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस ही माहिती पाहून जाण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी लावलेल्या विलंबाचे समर्थन त्यांनी असे केले आहे की, त्यांच्याकडे अनुदान वाटपाप्रीत्यर्थ येणारी रक्कम ही कमी असते व अर्जदारांची संख्या प्रचंड असते. प्रसंगी त्यांच्या कार्यालयावर लाभार्थीकडून दगडफेक होत असल्यामुळे त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी कार्यालयात बसत नव्हते. तसेच अपिलार्थी हे त्यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित वेगवेगळया अर्जाद्वारे कायम वेगवेगळी माहिती विचारत असत व त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यावर दबाव आणीत असत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे केलेला युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहिती मागितल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर या अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे हे संबंधित अर्जदाराचे

उत्तरदायित्व असते. तथापि या प्रकरणी अशाप्रकारचे उत्तरदायित्व अर्जदाराने योग्य प्रकारे पार पाडले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन स्पष्ट होत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ प्रमाणे देय होत आहे. तसेच अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्यामुळे त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपरोक्त कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांनी माहिती प्राप्त करुन घेण्याचे त्यांचे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नसल्यामुळे, अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कोणतीही कारवाई, आयोग आदेशित करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ज्ञानेश्वर एकनाथ खंडागळे, मु.पो. पुरी, ता गंगापूर, जि औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६९

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. सचिन जगन्नाथ त्रिभुवन, : अपिलार्थी
मु.पो. राहुलनगर, जायकवाडी (उत्तर), ता. पैठण,
जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,
नाथनगर (उत्तर), ता. पैठण, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक १७-११-२००८ रोजी प्रथम अपील केल्यानंतर दिनांक २७-११-२००८ रोजी सुनावणी झाली आणि जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-११-२००८ रोजी अपिलार्थीस दिशाभूल करणारी, खोटी व अर्धवट माहिती दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना माहिती अधिकाऱ्याकडून चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झालेली आहे. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व जन अपिलीय अधिकारी यांचा दिनांक २९-११-२००८ रोजीचा निर्णय पाहता आयोगास असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०३-११-२००८ रोजी व नंतर त्यांच्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ ते ११ शी संबंधित माहिती दिली. अशा प्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दिल्याचे अनुमान काढून, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-११-२००८ रोजीच्या त्यांच्या आदेशाद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. परंतु अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडील मूळ अभिलेखे व अपिलार्थीस त्यांनी पुरविलेली माहिती ही आज रोजी आयोगासमोर उपलब्ध नाही. अथवा अपिलार्थीच्या या 'आक्षेपाचे निराकरण' करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती याचा, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत ताळमेळ घालून अपिलार्थीस, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सत्य व संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीच्या "आक्षेपाचे निराकरण" करुन अपिलार्थीस त्यांच्याकडील सत्य व संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सचिन जगन्नाथ त्रिभुवन, मु.पो. राहुलनगर, जायकवाडी (उत्तर), ता. पैठण, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), ता. पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६७०

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपिलार्थी
द्वारा, एस. के. जोनवाळ, प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब ढवळे
यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट स्वरुपात माहिती प्राप्त झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी यांच्या संदर्भात

एकूण ५ मुद्यांद्वारे दिनांक १-०४-२००३ ते १५-०९-२००८ या कालावधीतील काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४४/- इतके त्यांना स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, मुख्य शाखा जालना यांच्याकडे भरण्याचे सूचित केले. त्यानुसार अपिलार्थीने या रकमेचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मध्ये चलनाद्वारे दिनांक १०-१०-२००८ रोजी केला. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-१०-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले निर्णय दिनांक ०४-०३-२००९ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उर्वरित मुद्यांपैकी कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ४ शी संबंधित माहिती अप्राप्त आहे. ही

माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरेने उपलब्ध व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी आयोगासमोर व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही २००३ सालाशी संबंधित असल्यामुळे, ही माहिती शोधण्याकरिता त्यांना बराच काळ लागला. आता त्यांनी ही माहिती शोधली असून, त्यांच्याकडे ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी आज रोजी तयार आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०८-२००८ रोजीच्या पत्राद्वारे श्री. आर. टी. मात्रे, सह शिक्षक आदर्श विद्यालय, सायगाव डोंगरगाव यांच्या विरुध्द तक्रार केली होती. परंतु अर्जाची अद्यापपावेतो चौकशी झाली नाही, ही चौकशी करण्यासाठी त्यांनी श्री. हरीष राऊत नावाच्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. तथापि त्यांना दुरध्वनीवरुन धमक्या दिल्या गेल्याने त्यांनी अद्यापपावेतो या प्रकरणाची चौकशी केलेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीस दिनांक १५-१०-२००८ रोजी अपूर्ण माहिती देऊन अपिलार्थीकडून ४४/- रु. इतके शुल्क स्वीकारले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस संपूर्ण माहिती देणे अभिप्रेत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांना अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ४४/- इतके अपिलार्थीस परत करावे लागेल. अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाच्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज तयार आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस

अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती (मुद्दा क्रमांक १ व ५) त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ४४/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, द्वारा, एस. के. जोनवाळ, प्लॉट नं. ४ प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६७१

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. गुळवणे धनंजय रामदास, : अपिलार्थी
द्वारा, के. ए. शिंदे, विशाल क्लॉथ स्टोअर्स, महावीर चौक,
अंबड, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग अंबड, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, जालना-२

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अंबड, जि. जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्र. २, जि. जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. रामदास भाऊराव गुळवणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, राज्य माहिती आयोगाच्या आदेशानंतरही त्यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या या प्रकरणी त्यांनी आयोगाकडे नोंदविलेल्या दिनांक १७-०१-२००८ रोजीच्या द्वितीय अपील अर्जावर राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १४-१०-२००८ रोजी सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थी यांच्या दिनांक ०८-०६-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर ३० दिवसाच्या आत सुनावणी घेण्याचे आदेशित केले होते. आयोगाच्या या निर्णयानंतर कार्यकारी अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांनी उप कार्यकारी अभियंता यांना त्यांच्याकडील दिनांक २८-०५-२००९ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीस ॲग्रीमेंट केलेल्या कालावधीचे बिल देण्यात यावे व बिल दिल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल जन अपिलीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या संदर्भात दिनांक २८-०५-२००९ रोजी निर्णय घेतला असून

अपिलार्थीस ॲग्रीमेंट केलेल्या कालावधीचे बिल देण्याचे त्यांनी सूचित केले. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०८-२००९ रोजी सुधारीत बिल दिले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जातील मूळ गाऱ्हाण्याचा निपटारा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे. तथापि त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली आहे किंवा कसे हे यावरुन स्पष्ट होत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९९९ ते दि. ३१-०३-२००६ पर्यंतच्या कालावधीतील कृषी पंपाच्या देयकाबाबत एकूण ९ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जातील मुद्दा क्रमांक १,२,६ व ७ मधील, 'तीर्थपूरी केंद्राकडून पुरवठा नसताना तो दाखवणाऱ्या अधिकाऱ्यावर केलेली कार्यवाही' हा भाग वगळता, उर्वरित कोणत्याही मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय होत नाही. कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उर्वरित मुद्यांद्वारे त्यांच्या कृतीबद्दलचे कारण व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीनुसार अशाप्रकारची माहिती ही, 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. त्यामुळे या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. परंतु त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ६ व ७ मधील वरील अंशतः भागाशी संबंधीत माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ६ व ७ अंशतः

या मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ६ व ७ अंशतः या मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** — **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गुळवणे धनंजय रामदास, द्वारा, के. ए. शिंदे, विशाल क्लॉथ स्टोअर्स, महावीर चौक, अंबड, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्र. २, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६७२

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. रामप्रसाद माधवलाल पोरवाल, : अपिलार्थी
रा. बालाजी मंदिर रोड, मोंढा, परतूर, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगरपरिषद कार्यालय, परतूर, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगरपरिषद, परतूर, जि. जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लिपिक, नगरपरिषद परतूर, जि. जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पूर्ण माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. तसेच त्यांनी या अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर दंडाची शिक्षा आदेशित करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. मनोहर हनुमंत तुंगनवार, स्वच्छता निरीक्षक, नगरपरिषद, परतूर हे नगरपरिषद, परतूर या कार्यालयात केव्हापासून कार्यरत आहेत आणि त्यांच्या नगरपरिषदेवरील नियुक्ती पत्राची सत्यप्रत, अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्रयस्थ पक्ष श्री. मनोहर हनुमंतराव तुंगनवार हे परतूर नगरपरिषदेत केव्हापासून कार्यरत आहेत याची माहिती दिली होती. परंतु त्यांच्या नियुक्ती पत्राची सत्यप्रत अपिलार्थीस ते त्यावेळी पुरवू शकले नाहीत कारण त्रयस्थ पक्षाच्या नियुक्ती आदेशाची प्रत ज्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध होती ते अभिलेख त्यांनी एका प्रकरणी आयुक्त कार्यालयास पाठविले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-१२-२००८ रोजी आपला निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे परत माहिती दिली. परंतु या माहितीमध्ये देखिल त्रयस्थ पक्षाच्या मूळ नेमणूकीच्या आदेशाची प्रत नसल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आता जी माहिती देणे बाकी आहे ती माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे काही आस्थापनाविषयक बाबीच्या संदर्भात

सादर केली आहे. सदर अभिलेखे आयुक्त कार्यालयाकडून त्यांना प्राप्त झाल्यानंतर ते ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांवर माहिती मागविली आहे. त्यापैकी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत विनामूल्य पुरविली आहे. परंतु अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे उपलब्ध नसलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी कोणतेही प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही, अशा प्रकरणी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदी लागू होतात. त्याप्रमाणे यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत, सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत, महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना पाठवून, या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होते. परंतु अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केली नाही. परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून दीर्घ कालावधीसाठी वंचित राहिले. वास्तविक पाहता, विभागीय आयुक्त कार्यालयास जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती, त्यांना विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त करुन घेणे हे फारसे अवघड अथवा जिकरीचे काम होते, असे आयोगास वाटत नाही. या प्रकरणी त्यांनी त्यांच्या कार्यालयाचे प्रतिनिधी विभागीय कार्यालयास पाठवून त्रयस्थ पक्षाच्या नेमणूकीच्या आदेशाची प्रत संबंधित अभिलेख्याच्या नस्तीवरुन प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना सहज शक्य होते. परंतु अशाप्रकारची कार्यवाही तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी का केली नाही, हे सध्याचे जन माहिती अधिकारी स्पष्ट करु शकत नाहीत. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेली -

त्यांच्या नियुक्ती आदेशाची प्रत - ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे, ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाचा कोणताही प्रत्यवाय असू नये. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्षाच्या नियुक्ती आदेशाची प्रत विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. व्ही. आढे यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीचा भंग करुन अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवून त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब मुख्याधिकारी, नगरपरिषद, परतूर यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. व्ही. आढे यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती (त्रयस्थ पक्षाच्या नेमणूकीचे आदेश) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्याधिकारी, नगरपरिषद, परतूर यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस.व्ही. आढे यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामप्रसाद माधवलाल पोरवाल, बालाजी मंदिर रोड, मोंढा, परतूर, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा लिपिक, नगरपरिषद परतूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, परतूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६७३

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. आण्णा विठ्ठलराव सावंत, : अपिलार्थी
नरीमन नगर, रेल्वे स्टेशन, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अध्यक्ष, नवप्रकाश ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ,
लक्कडकोट, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीअंतर्गत अध्यक्ष, नवप्रकाश ज्ञानोदय शिक्षण प्रसारक

मंडळ, लक्कडकोट, जालना यांच्याकडे त्यांच्या संस्थेच्या संदर्भात, दिनांक ०१-०१-१९९५ ते ३१-१०-२००८ या कालावधीतील संस्थेच्या प्रोसिडींग रजिस्टरची साक्षांकीत झेरॉक्स प्रत तसेच संस्थेच्या ऑडिट रिपोर्टची साक्षांकीत प्रत, ही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने ज्या कालावधीतील माहिती मागितली होती त्या कालावधीतील शाळेच्या प्रशासन प्रमुख श्रीमती पी. यु. आटोळे व लिपीक श्री. एस. के. जोनवाळ यांनी संस्थेचे संपूर्ण रेकॉर्ड हस्तांतरीत केले नसल्यामुळे सध्या तरी अपिलार्थीस माहिती देता येणार नाही, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, जालना यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सहायक धर्मादाय आयुक्तांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ०४-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित कार्यालयास सूचित केले. या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिले. यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, संबंधित संस्थेने त्यांच्याकडे आता संस्थेतील उपलब्ध माहिती सादर केली आहे व ही माहिती ते अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, जालना यांच्याकडे अपिलार्थीने दिनांक ०३-०१-२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार अपील केल्यानंतर ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे सहायक धर्मादाय आयुक्त, जालना यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण नवप्रकाश ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ, लक्कडकोट, जालना ही सार्वजनिक विश्वस्त कायद्याअंतर्गत नोंदणी झालेली एक संस्था आहे. सदर संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील तरतुदी-नुसार नोंदणीकृत झालेली असून त्यांचा क्रमांक एफ-५७/जालना असा आहे. अशा प्रकारच्या सार्वजनिक विश्वस्त कायद्याअंतर्गत नोंदणी झालेल्या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होणार नाही असा निर्णय मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने रिट याचिका क्रमांक ५२९४/२००८, मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा, जिल्हा बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर यांच्या प्रकरणामध्ये दिनांक २८-०४-२००९ रोजी दिलेला आहे.

मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आपले अभिप्राय नोंदविले आहेत.

".......... It is , therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. .......... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as

Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या निर्णयामध्ये व्यक्त केलेले वरील अभिप्राय पाहता आणि या प्रकरणात मूळात अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे त्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदी लागू होणार नाहीत. त्यामुळे ही संपूर्ण माहिती अपिलार्थीस देणे या संस्थेस बंधनकारक असणार नाही.

या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, जालना यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे एकाच प्राधिकरणाशी संबंधित असावयास हवेत. तथापि या प्रकरणी नवप्रकाश ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ व सहायक धर्मादाय आयुक्त यांचा कोणत्याही नियमित स्वरुपाचा संबंध नाही. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्तांकडे प्रथम अपील करण्याची त्यांची कृती देखील माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदींना छेद देणारी आहे. त्यामुळे आता जर अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधित संस्थेकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणे गरजेचे असेल तर त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील माहिती अधिका-याकडे अशा प्रकारची माहिती मागावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर व विशेषत:, अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे त्या प्राधिकरणास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी लागू होत नसल्यामुळे अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**<br>
**दिनांक २४-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**<br>
**राज्य माहिती आयुक्त**<br>
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. आण्णा विठ्ठलराव सावंत, नरीमन नगर, रेल्वे स्टेशन, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, नवप्रकाश ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ, लक्कडकोट, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६७४

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. अजित किसनलालजी कोठारी, : अपिलार्थी
घर नं २-२०-१५, पारसीगल्ली, बेंझजी रोड, काद्राबाद,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, नगरपरिषद कार्यालय, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, जालना नगरपरिषदेतर्फे पकडण्यात आलेल्या व कोंडवाड्यात घातलेल्या जनावरांच्या नोंदणी पुस्तकाची छायांकीत प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांनी

अद्यापपावेतो पुरविलेली नाही. ती त्यांना पुरविण्यात यावी, अशी त्यांनी आयोगास या अर्जाच्या अखेरीस विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०१-२००४ ते ३१-१०-२००८ या कालावधीतील जालना नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये पकडलेल्या व कोंडवाड्यामध्ये घातलेल्या गुरांच्या नोंदणीसंदभात काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दिनांक ०१-०१-२००४ ते ३१-१०-२००८ या कालावधीमध्ये जालना नगरपरिषदेतर्फे पकडण्यात आलेल्या व कोंडवाड्यात घातलेल्या गुरांच्या नोंदणी पुस्तकाची साक्षांकीत प्रत, गुरे पकडण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची नावे, कोंडवाड्यात गुरांची देखभाल करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांची नावे, कोंडवाडा प्रमुखांची नावे, गुरांची देखभाल करण्यासाठी त्यांच्या चारा व पाणी याची सोय करण्यासाठी करण्यात आलेला खर्च आणि कोंडवाडा विभागातर्फे जालना नगरपरिषदेला प्राप्त झालेले उत्पन्न आणि या कालावधीमध्ये कोंडवाड्यातील कर्मचारी यांना वाटप करण्यात आलेले वेतन व कर्मचा-यांची नावे - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन

माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही व तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी गुरांचा चारा व पाणी यांची सोय करण्यासाठी कोणताही खर्च झाला नाही अशी माहिती दिली आहे. तथापि त्यांना प्राप्त झालेल्या पावती पुस्तकातील नोंदीवरुन या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी गुरांच्या चारा पाण्याच्या सोईकरिता खर्च केला असल्याचे त्यांना जाणवत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेल्या माहितीतील प्रत्येक मुद्दयावर स्वतःचे अभिप्राय व्यक्त करुन प्रत्येक मुद्दयावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण मागितले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०१-२०१० रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली असून जालना नगरपरिषदेमध्ये गुरांची नोंदणी होण्याची व पकडलेल्या गुरांची नोंद ठेवण्याची कोणतीही पध्दत प्रचलीत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संदर्भित माहिती त्यांना देता येणार नाही. तसेच त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात त्यांनी सन २००४ ते २००८ या कालावधीमध्ये गुरांच्या देखभालीसाठी निरंक खर्च केल्याचे दर्शविले आहे, हे बरोबर आहे. कारण त्यांच्याकडील कोंडवाड्यात चा-याचा संग्रह ठेवण्यात येत असतो व यासंदर्भात संग्रह केलेला चारा पाणी ते पकडलेल्या गुरांना वेळोवेळी देत असतात. सन २००४ ते २००८ या कालावधीमध्ये असा प्रकारचा कोणताही चारा खरेदी न

केल्यामुळे व तत्पूर्वी संग्रही असलेला चारा वापरल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस तशी माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या-कडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिनांक १९-०१-२०१० रोजी म्हणजे, विहित मुदतीनंतर एक वर्षाहून जास्त विलंबाने पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती ही सर्वसाधारण-पणे त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. परंतु प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे आक्षेप असून या माहितीचे अपिलार्थीने लेखा परीक्षण करुन यावर आपले मुद्देनिहाय आक्षेप नोंदविलेले आहेत व प्रत्येक आक्षेपावर जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार मागितले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेऊन पुढे आवश्यक ती कार्यवाही करावयाची आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीचे काही आक्षेप आहेत आणि या आक्षेपांचे निराकरण अपिलार्थीस करुन घ्यावयाचे असल्यास त्यांना त्याचे निराकरण मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना अथवा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून करुन घ्यावे लागेल. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती प्राप्त झाल्यावर, त्यामधील प्राप्त माहितीवर अर्जदाराने आक्षेप घेतल्यास अशा प्रकारच्या आक्षेपांचे निराकरण जन माहिती अधिकारी यांनी करणे अपेक्षित नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असे म्हणता येणार नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्याकडील माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे

आता अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. परंतु ही माहिती अपिलार्थीस दिनांक १३-१२-२००८ रोजी अगर तत्पूर्वी देय असतांना त्यांनी ती अपिलार्थीस अंदाजे १४ महिन्याच्या विलंबाने दिली आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊनच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१२-२००८ रोजी निर्णय देऊनही अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या मुदतीत माहिती न पुरवून त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती लेखा विभागाशी संबंधित होती. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे लेखा विभागातील कर्मचारी हे देखील या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्याच्या संदर्भात जबाबदार ठरतात. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणा-या संबंधित कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. टी. एस. भालेराव व त्यावेळचे लेखा शाखेतील त्यांचे सहायक / कर्मचारी हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

सबब, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक यांच्यावर का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा श्री. टी. एस. भालेराव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या कालावधीमध्ये त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कोणत्याही समर्थनीय

कारणाशिवाय विलंब लावल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. टी. एस. भालेराव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अजित किसनलालजी कोठारी, घर नं २-२०-१५, पारसीगल्ली, बेंझजी रोड, काद्राबाद, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगरपरिषद कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. टी. एस. भालेराव तत्कालीन जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक (मार्फत - मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६७५

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. संभाजी भुजंगराव आहेर, : अपिलार्थी
मु. पो. उमापूर, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांच्याकडे त्यांनी माहिती मागितली असताना व सदरची माहिती त्यांच्या स्तरावर उपलब्ध असतानाही ती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांच्याकडून त्यांना मूळात प्राप्त झाली नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीचा अर्ज ग्रामसेवकाकडे पाठविला व तसेच त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे प्रथम अपील केले असता

व त्यांना गट विकास अधिका-यास माहिती देण्याचे सूचित करणारा जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देणे अपेक्षित असताना त्यांनी चुकीचा व दिशाभूल करणारा निर्णय दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ९ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०२-२००९ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती ग्रामसेवक, उमापूर यांच्या-कडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील अर्जासोबत सादर केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीवर या तारखेची नोंद नाही. परंतु आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने दिनांक २१-०२-२००९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या-कडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड हे स्वतः जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी गेवराई पंचायत समितीच्या गट विकास अधिका-याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत दिनांक ०३-०३-२००९ रोजी पाठविली. त्यावर त्यांनी दिनांक ३०-०३-२००९ रोजी सुनावणी घेतली व त्याच दिवशी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती विनामूल्य दिली. तथापि प्राप्त माहिती विलंबाने प्राप्त झाली असल्याने आणि ती अपूर्ण असल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे वकील, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती त्यांना अद्यापपावेतो गट विकास अधिका-याने दिलेली नाही. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून ते ही माहिती अपिलार्थीस आता विनामूल्य हस्तांतरीत करत आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जासंबंधात संपूर्ण माहिती प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त व्हावयाची मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती " ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, उमापूर यांचे पत्र दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या पत्राबाबत माहिती देण्यात यावी " अशी आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे आढळून येत आहे. ' ग्रामविकास अधिकारी यांच्या दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या पत्राबाबत माहिती ' म्हणजे निश्चित कोणती माहिती याचा बोध अपिलार्थीने मागितलेल्या माहितीवरुन कोणासही होणे शक्य नाही. तथापि आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ग्रामविकास अधिकारी यांच्या दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या पत्राची प्रत हवी आहे

असे आढळून येत आहे. त्यांना ग्रामविकास अधिका-याच्या या पत्राची प्रत गट विकास अधिकारी यांनी आता हस्तांतरीत केली आहे, हे पाहता, अपिलार्थीस आता आवश्यक ती संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २२-०२-२००९ रोजी अगर तत्पूर्वी देय असताना त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३०-०३-२००९ रोजी प्राप्त झाली आहे. सदर माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३६ दिवसाच्या विलंबाने प्राप्त झाली आहे. या प्रकरणी मूळात गट विकास अधिकारी यांनी विहित कालावधीत अपिलार्थीने मागितलेली माहिती देणे गरजेचे होते. परंतु त्यांनी अशा प्रकारची कार्यवाही न करता अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार ग्रामविकास अधिकारी, उमापूर यांच्याकडे पाठविला. त्यांना अशा प्रकारची कृती करण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. त्यांनी केलेल्या या कृतीमुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यास ३६ दिवस इतका अनावश्यक विलंब लागला आहे. सदर विलंब तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. एस. आर. घंटलवार, सध्या बालविकास प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती गेवराई या पदावर कार्यरत) यांच्याकडून झाला आहे. सबब तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. एस. आर. घंटलवार) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. एस. आर. घंटलवार, सध्या बालविकास प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती गेवराई या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संभाजी भुजंगराव आहेर, मु. पो. उमापूर, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१८१

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. शकील शेख हुसेन खलिफा, : अपिलार्थी
रा. नेहरु चौक, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल),औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. रावसाहेब तुळशीराम वीर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री. गोरक्षनाथ दिगंबर सोनवणे, नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, पैठण यांनी

अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०४-०७-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे त्यांचे आयोगाकडे त्यांनी दाखल केलेले व्दितीय अपील क्रमांक २१८१/२००८ हे ते स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे नोंदविलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २१८१/२००८, दिनांक १८-११-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शकील शेख हुसेन खलिफा, रा. नेहरु चौक, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१८२

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपिलार्थी
रा. पाथरवाला (बु.), तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),
जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०७-२००९ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०१-१२-२००० ते १७-०८-२००८ या कालावधीतील मुख्यालयी हजर न राहणा-या व कार्यालयात वेळेवर हजर न राहणा-या जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांवर त्यांच्या

कार्यालयाने केलेल्या कारवाईबाबत एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जिल्हा परिषदेतील विविध विभागाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व विभागांना दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस दिली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या या अर्जासंदर्भात जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने अपिलार्थीस दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४७ इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही, परंतु अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पाच दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सामान्य प्रशासन विभाग सोडून इतर विभागाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित माहितीसंदर्भात त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. तथापि या निर्णयामध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने कार्यवाही न करता वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ 'अ' व 'ब' शी संबंधित माहिती त्यांना विनामूल्य पुरविली असून उर्वरित माहिती ते तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवतील. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही आठ वर्षाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांना वेळ लागणार आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती ही मोठ्या प्रमाणात असून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील विविध विभागातील माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरविणे या कामासाठी जन माहिती अधिकारी यांना काही कालावधी देणे योग्य होईल असे आयोगास वाटते. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती तीस दिवसाच्या आत देण्याचे कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, रा. पाथरवाला (बु.), तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८६९

निर्णय दिनांक २४-०२-२०१०

१ श्री. अंकुश एम. पवार, : अपिलार्थी
प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको, अयोध्यानगर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर घेतलेल्या सुनावणीच्या वेळी कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण दहा कामाच्या संदर्भात दिनांक ०१-०४-२००६ ते २०-०२-२००७ या कालावधीशी संबधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नायगांव, सावंगी, ओव्हर, धोपटेश्वर, साताळा या गावामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या कामावरील सर्व मजुरांच्या रोजगारपत्रिका, जॉबकार्ड, ओळखपत्र क्रमांक, पोस्ट बँक खाते क्रमांक, राष्ट्रीयकृत बँकेचे नाव, ठिकाण, मजुरांची नावे, हजेरीपट आणि मोजमाप पुस्तिकेच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रत्यक्षात व रजिस्टर्ड टपालाव्दारे अशी अपेक्षिली होती.

अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००७ रोजी आपल्या मूळ माहितीची व्याप्ती वाढवून एकूण ५४ गावांच्या संदर्भात माहिती मागवून प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी कोणताही निर्णय न देऊन फक्त बैठकीचे इतिवृत्त जारी केले. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नाही. ही माहिती जन माहिती अधिका-याकडून आजही त्यांना आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

विस्तृत प्रमाणात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले व अपिलार्थीस प्रत्यक्षात कार्यालयात उपस्थित राहून अभिलेख्याची तपासणी करण्याचे सूचित केले व आवश्यक ती माहिती दोन रुपये प्रतिपृष्ठ याप्रमाणे उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०२-२००७ आणि ०७-०३-२००७ रोजीच्या पत्रामध्ये एकूण किती रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करावयाचा याची विचारणा केली. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेले शुल्क शासकीय कोषागारात भरणा करण्याचे सूचित केले होते. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क त्याच्या तपशीलासह, अपिलार्थीस कळविणे भाग होते. परंतु त्यांनी अशा प्रकारची कृती या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर केली नाही. त्यांनी अपिलार्थीस फक्त प्रतिपृष्ठ दोन रुपये शुल्क भरण्याचे सूचित केले. परंतु एकूण शुल्क किती भरावयाचे याचा तपशील अपिलार्थीस न दिल्यामुळे आता ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करताना आपल्या मूळ माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढविल्याचे आयोगास आढळून आले आहे. तथापि अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जातील माहितीच देय होईल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त

प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी एकूण शुल्क न कळवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सह संचालक कृषि, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सह संचालक कृषि, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंकुश एम. पवार, प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको, अयोध्यानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सह संचालक कृषि, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६८४
निर्णय दिनांक: २५-०२-२०१०

१. श्री. कोंडीराम बाळा भुसारे, : अपिलार्थी
रा. लासूर स्टेशन, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : मे. तुळजाभवानी इंण्डेन गॅस एजन्सी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे त्रयस्थ पक्ष तुळजाभवानी इंण्डेन गॅस एजन्सी, लासूर स्टेशन यांच्यासंदर्भात एकूण सात मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी त्यांच्या दि.

१५.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा अर्ज संबंधित एजन्सीकडे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याचे तुळजाभवानी इंडेन गॅस एजन्सीच्या व्यवस्थापकांना सूचित केले. यानंतर त्यांनी परत दि. १७.११.२००८ रोजी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तुळजाभवानी गॅस एजन्सीकडून हस्तगत करुन ती अपिलार्थीस देण्याचे तहसीलदार, गंगापूर यांना देखील सूचित केले. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.१२.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज योग्य त्या सार्वजनिक प्राधिकाऱ्याकडे हस्तांतरित करावा, अशा सूचना त्यांना दिल्या. यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दि. ३१.१२.२००८ रोजी तहसीलदार,गंगापूर यांना यासंदर्भात स्मरणपत्र देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती संबंधित गॅस एजन्सीकडून प्राप्त करुन घेऊन नंतर अपिलार्थीस देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी संबंधित प्राधिकाऱ्यास आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २७ नुसार राज्य शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.

आर.टी.आय.२००५/ सी.आर. ३१५/०५/५,दिनांक ११.१०.२००५ अनुसार माहिती मागण्यासाठीचा मूळ अर्ज व त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील करण्यासाठी एक निश्चित कार्यप्रणाली विहित करुन दिली आहे. ही कार्यप्रणाली पाहता, प्रत्येक अर्जदारास राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी द्वितीय अपील करताना या अर्जावर रु.२०/- इतक्या किमतीची कोर्ट तिकीटे डकविणे अनिवार्य आहे. तथापि य प्रकरणी अपिलार्थीने अशाप्रकारची रु. २०/- इतक्या किमतीचे कोर्ट-फी-स्टॅम्प आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जावर डकविले नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील अवैध ठरत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कोंडीराम बाळा भुसारे, साईकृपा फोटो स्टुडियो, पोलीस चौकीसमोर, लासूर स्टेशन, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २१८३/०८ व १९०/०९**

अपील क्रमांक/रामाआ/अपील/सिआर/२१८३/०८ व १९०/०९
निर्णय दिनांक : २५-०२-२०१०

१. श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, : अपिलार्थी
रा.तळणी, ता.हदगाव, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, हदगाव, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी,
बी.डी.ओ.कार्यालय,
पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, तळणी, ता.हदगाव,जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०६.२००८ व २३.०१.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले (अपील क्र. २१८३/०८ व १९०/०९) एकाच प्राधिकरणाशी संबंधित असल्याने आज रोजी आयोगाच्या एकत्रितपणे विचाराधीन आहेत.

**अपील क्र. २१८३/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे

त्यांनी पंचायत समिती, हदगाव येथील जन अपिलीय अधिकाऱ्याकडे दि. १९.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, सदर अपील स्वीकारण्यास संबंधितांनी नकार दिल्यामुळे व्यथित होऊन अंतिमतः त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव यांना दि. ०५.०२.२००८ रोजी केलेल्या अर्जावर गट विकास अधिकारी यांनी केलेली चौकशी व कार्यवाही याची माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,हदगाव,जि.नांदेड यांच्याकडे दि. १९.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु हा अपील अर्ज स्वीकारण्यास हदगाव पंचायत समिती कार्यालयाने नकार दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने, वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगासमोर युक्तिवाद केला व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांनी हा अर्ज माहिती अधिकाऱ्यास मिळाल्याची पोचपावतीची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांचा प्रथम अपील अर्ज पंचायत समिती, हदगाव कार्यालयाने परत केल्याचा पुरावा देखील आयोगास सादर केला आहे. यावरुन असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दि. २१.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच त्यांच्या दि. १९.०४.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार केलेल्या प्रथम अपील अर्जाचा देखील गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या कार्यालयाने स्वीकार केलेला नाही. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, अशा सर्वांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीचा भंग केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी तर अपिलार्थीचा प्रथम अपील अर्जच न स्वीकारुन त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे वर्तन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या प्रभावी अंमलबजावणीला पोषक असल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, हदगाव जि.नांदेड व त्यांना या प्रकरणासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे अधिकारी/कर्मचारी या सर्वांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी

अपिलार्थीच्या दि.२१.०२.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहिल्याबद्दल त्यांचेवर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा, या सर्वांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव यांनी अपिलार्थीचा या प्रकरणाशी संबंधित दि. १९.०४.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज न स्वीकारुन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा व नितांत सचोटीचा अभाव स्पष्ट केला आहे, त्यामुळे या प्रकरणाची प्रशासकीय चौकशी त्यांच्या स्तरावर करुन दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा या सर्वांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अपील क्र. १९०/०९:**

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"मौजे तळणी च्या दक्षिणस असलेल्या अनुक्रमे घर नं. १०८९ व १०८८ चा टोंच नकाशा मिळावा. नकाशांवर दोन्ही प्लॉट नं. १०८९ व १०८८ च्या प्रवेशद्वार व घर नं. १०८९ मध्ये जाण्यासाठीच्या रस्त्याची नोंद असावी. घर नं. १०८९ व घर नं.१०८८ व गट नं. ३८४ च्या मध्ये असलेल्या गावठाण जागेचा न.८ चा उतारा देण्यात यावा. गावठाण जागा नसल्यास तसे लेखी दयावे."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,हदगाव,जि.नांदेड यांच्याकडे दि. २९.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी दि. १५.११.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनाविलंब माहिती देण्याचे संबंधित ग्रामसेवक,ग्रामपंचायत,तळणी श्री. एस.जी.चव्हाण यांना सूचित केले. तथापि यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना या प्रकरणाशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत न पुरविल्यामुळे व ही माहिती देण्यासाठी संबंधित ग्रामसेवकाने त्यांना कोणतेही सहकार्य न केल्यामुळे त्यांना ही माहिती इतर खाजगी यंत्रणेकडून तयार करुन नंतर ती कोर्टात सादर करावी लागली. या प्रकरणी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कधीही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. परंतु आयोगाकडे त्यांनी द्वितीय अपील केल्यानंतर त्यांना माहे फेब्रुवारी, २००८ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी कधी संपर्क साधला होता, असे आयोगाने विचारले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी त्यांनी अंदाजे चार ते पाच वेळा

संपर्क साधला असल्याचे विधान केले, तथापि यासंदर्भातील आवश्यक तो वैध पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय, याची आयोगाने विचारणा केल्यानंतर अशाप्रकारचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी कधी उपस्थित राहिले, यासंदर्भातील कोणतेही पुरावे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. त्याचबरोबर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर फेब्रुवारी, २००८ मध्ये माहिती दिल्याचे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, रा.तळणी, ता.हदगाव, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,तळणी, ता.हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७०
निर्णय दिनांकः २५-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. स.निजामोद्दीन स.वाहाबोद्दीन,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,अंबड,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक,<br>भूमी अभिलेख, जालना | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) मौ. गोरी ता.अंबड येथील गट क्र.८४ चा दिनांक १४/११/२००५ ची मोजणी रद्द करणे बाबत.

२) मौजे गोरी ता.अंबड येथील सवे क्र.४४ मधील ८१ आर संपादित केलेल्या जमीनीच्या नकाशा व पंचेनामाची प्रत दि. २४/४/१९८१ ला भूसंपादन अधिकारी जालना यांच्या ताब्यात आली ती प्रत मिळणेबाबत. "

(टीप : अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील मजकूर जशाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही इ.स.१९८१ शी संबंधित असल्यामुळे व त्यांचे कार्यालय सन १९९४ पासून अस्तित्त्वात आले असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीने भूसंपादन अधिकारी, जालना यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करण्याऐवजी ही माहिती त्यांच्या दि. १७.१०.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाच्या विहित नमुन्यात अधीक्षक,भूमी अभिलेख, जालना यांच्याकडून परत मागविली. अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी अपिलार्थीचा दि. १७.१०.२००७ रोजीचा अर्ज हा माहितीसाठीचा मूळ अर्ज आहे असे गृहीत धरुन अपिलार्थीस दि. १४.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,अंबड यांच्या कार्यालयाकडून घेण्याचे सूचित केले. अशाप्रकारे माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात असा खुलासा केला आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जाशी संबंधित प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही. कारण मूळात त्यांना अपिलार्थीकडून अपील अर्जाच्या स्वरुपात कोणताही प्रथम अपील अर्ज प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज प्रथम अपील अर्ज म्हणून सादर केला होता, तथापि असा कोणताही उल्लेख या अर्जावर नसल्याने त्यांनी अपिलार्थीची हा कथित अपील अर्ज माहितीसाठीचा अर्ज आहे, असे समजून अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद पाहता व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. परंतु या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मूळात प्रथम अपीलच दाखल केलेले नाही. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने करावयाच्या प्रथम अपील अर्जाचे प्रारुप अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावे. सदर अपील अर्जाचा नमुना अपिलार्थीस प्राप्त झाल्यानंतर हा अपील अर्ज भरुन त्यांनी तो जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथमतः सादर करावा. अशाप्रकारे अपिलार्थीने सादर केलेला त्यांचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीचा या प्रकरणाशी संबंधित विहित नमुन्यातील प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. स. निजामोद्दीन स. वाहाबोद्दीन, रा. प्लॉट नं.६०, दिलरस कॉलनी, असीफ बाग, सज्जाद मस्जीद मागे, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८८६
निर्णय दिनांकः २५-०२-२०१०

१. चेअरमन, : अपिलार्थी
महालक्ष्मी मजूर सहकारी सोसायटी मर्या.,
निमडाळे, ता.जि. धुळे

**विरुध्द**

१. जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील "शासकीय प्राधिकरण" अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे रेणुका (बदलेले नाव महालक्ष्मी असे आहे) मजूर सहकारी सोसायटी मर्या., निमडाळे, ता.जि.धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २५.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

"**It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, महालक्ष्मी मजूर सहकारी सोसायटी मर्या., निमडाळे, ता.जि.धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री. बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २५-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, महालक्ष्मी मजुर सहकारी सोसायटी मर्या., निमडाळे, ता.जि. धुळे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८८७
निर्णय दिनांकः २५-०२-२०१०

१. चेअरमन, : अपिलार्थी
प्रियंका मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे

**विरुध्द**

१. जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील “शासकीय प्राधिकरण” अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे प्रियंका मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या  निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २५.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम  विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."</u>**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, प्रियंका मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार

माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री. बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २५-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, प्रियंका मजुर सहकारी सोसायटी मर्या., सुभाषनगर, गायकवाड चौक, जुने धुळे, ता.जि.धुळे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८८८
निर्णय दिनांकः २५-०२-२०१०

१. चेअरमन, : अपिलार्थी
तुळजाभवानी मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे

**विरुध्द**

१. जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील "शासकीय प्राधिकरण" अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे तुळजाभवानी मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या  निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २५.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम  विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, तुळजाभवानी मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री. बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: २५-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, तुळजाभवानी मजुर सहकारी सोसायटी मर्या., श्रीवीरनगर, नटराज टॉकीज मागे, धुळे, ता.जि.धुळे

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६७६

निर्णय दिनांक  २५-०२-२०१०

१ श्री. नितनवरे पुष्पानंद शंकर, : अपिलार्थी
रा. क्रांतीनगर, कोकणवाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, महानगरपालिका,
शिक्षण विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपायुक्त (प्र.), महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी दिनांक २३-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, त्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०१-२००९ रोजी निर्णय देऊन, त्यांना दिनांक २७-०१-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय

अपील करेपर्यंत त्यांना कुठलीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे महानगरपालिकेच्या शाळेच्या संदर्भात एकूण १३ मुद्यांवर काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस १३ मुद्यांपैकी फक्त ४ मुद्यांवर माहिती पुरविली. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक २७-०१-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०३-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तसेच त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ, त्यांनी अपिलार्थीचे शिक्षणाधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २०-०३-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील गणवेश योजनेअंतर्गत त्यांना

अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांनी आयोगास अपिलार्थीचे शिक्षणाधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २६-१२-२००८ रोजीचे पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये देखिल अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती पुरविली हे आयोगाने विचारले असता, जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांना या प्रकरणाच्या संदर्भात अपिलार्थीस त्यांनी पुरविलेली कोणतीही माहिती आयोगास दाखविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आज रोजी अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलाशी संबंधित प्रथम अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीने त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २६-१२-२००८ व २०-०३-२००९ रोजीचे पत्र सादर केले असून, या दोन्ही पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे नमूद केले आहे. परंतु याचवेळी जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी निश्चितपणे अपिलार्थीस कोणती माहिती पुरविली, याची आयोगाने विचारणा केली असता त्यांना आयोगास, अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती दाखविता आलेली नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील गणवेशाच्या माहिती व्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती दिली नसल्याचे अनुमान आयोग काढत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही सर्वसाधारणपणे अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०२-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेल्या

माहितीतील मुद्दा क्रमांक ८ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत मुद्देनिहाय, विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती लतीका धैयनक (सध्या एस.एस.सी. बोर्ड औरंगाबाद येथे सहसचिव या पदावर कार्यरत) यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस शिक्षण संचालक, पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.
३. शिक्षण संचालक, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती लतीका धैयनक (सध्या एस.एस.सी. बोर्ड औरंगाबाद येथे सहसचिव या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नितनवरे पुष्पानंद शंकर, क्रांतीनगर, कोकणवाडी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका शिक्षण विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (प्र.) महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक (माध्यमिक), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे -०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ ६७७
निर्णय दिनांक २५-०२-२०१०

१ श्री. अजित किसनलालजी कोठारी, : अपिलार्थी
रा. घन नं. २-२०-१५, पारसी गल्ली, बेंझजी रोड,
काद्राबाद, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, बांधकाम विभाग, नगरपरिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी तथा अभियंता बांधकाम विभाग,
नगरपरिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर अभियंता, बांधकाम विभाग, नगरपरिषद, जालना

जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०१-२००९ रोजीचे दिनांक २२-०१-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद केले आहे. या अर्जासंदर्भात अपिलार्थीने आपला लेखी युक्तिवाद आयोगास दिनांक २४-०२-२०१० रोजी सादर केला असून, त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना

यांनी नेहमीप्रमाणे कोणतीही माहिती दिली नाही. सन २००१ ते २००८ या दरम्यान जालना शहरातील कुंडलिका नदीवरील बांधण्यात आलेल्या पुलाच्या बांधकामात, अनियमितता व मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे त्यांच्या निर्दशनास आले असून, हा भ्रष्टाचार उघडकीस होण्याच्या दृष्टीने त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी श्री. सय्यद सऊद सय्यद मसुद, नगर परिषद अभियंता, बांधकाम विभाग, नगरपरिषद, जालना यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २४-०२-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले त्याचे दिनांक २०-०१-२००९ रोजीचे द्वितीय अपील परत घेण्याचा निर्णय घेतल्याचे आयोगास अवगत केले आहे आणि आयोगाकडे दाखल केलेले अपील परत घेण्याची त्यांची विनंती मान्य करावी, अशी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची सदर विनंती आयोग मान्य करीत असून विचाराधीन अपील खारीज करीत आहे व खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ६७७/२००९, दिनांक २०-०१-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अजित किसनलालजी कोठारी, घन नं. २-२०-१५, पारसी गल्ली, बेंझजी रोड, काद्राबाद, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग, नगरपरिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६७८

निर्णय दिनांक २५-०२-२०१०

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, : अपिलार्थी

रा. गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

मुख्याधिकारी, नगरपरिषद, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

जिल्हाधिकारी, परभणी

त्रयस्थ पक्ष : १) श्री. जी.एन. तापडीया, २) मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन कं., ३) मे. शक्ती कन्स्ट्रक्शन कं. ४) मे. विश्वशक्ती कन्स्ट्रक्शन कं.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मुख्याधिकारी, नगरपरिषद, परभणी यांच्याकडे त्यांच्या विभागात त्रयस्थ पक्ष श्री. जी. एन. तापडीया व इतर तीन यांच्या कामासाठी वापरण्यात आलेल्या डांबरी गेटपासच्या प्रतीची मागणी

केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनांक ०१-०१-२००६ ते ३०-०८-२००८ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक ११-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आणि अपिलार्थी उपस्थित आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो सुनावणी होणे बाकी आहे. अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित त्यांचा प्रथम अपील अर्ज जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे केला आहे. तथापि नगरपरिषेदेच्या संदर्भात जिल्हाधिकारी यांची कधीही प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झालेली नव्हती. आता संचालक नगरपरिषद यांच्या सुधारित आदेशाप्रमाणे प्रत्येक नगरपरिषेदेमध्ये संबंधित मुख्याधिकारी यांची अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली असल्याने, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांचा दिनांक ११-१०-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांच्याकडे प्रथम सादर करावा. सदर अर्ज मुख्याधिकारी, नगरपरिषद, परभणी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तदनंतर ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील - प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, परभणी यांना या निकाल - पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६७९

निर्णय दिनांक २५-०२-२०१०

१ श्री. भानुदास मारोती चौरे, : अपिलार्थी
मु. सोनेगांव, पो. दासखेड, ता. पाटोदा, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाटोदा, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड
जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत न दिल्याने आणि माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्रामपंचायत कार्यालय सोनेगांव यांच्या दिनांक १०-१०-२००३ रोजीच्या ठराव क्र. ३ यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दिनांक २१-१०-२००८ रोजी दिलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, वरिष्ठांच्याकडे अहवाल पाठविला असल्यास त्या अहवालाची सत्यप्रत व कार्यवाही केली नसल्यास त्याबाबतची कारणे, अशी एकूण ३ मुद्यांवर व्यक्तिशः माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १९-०१-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्याच दिवशी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या उपस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०२-२००९ रोजी माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे कुलमुखत्यारपत्रधारक, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीच्या कुलमुखत्यारपत्रधारकाने असा युक्तिवाद केला की, पंचायत समिती, पाटोदा मधील ग्रामपंचायत, सोनेगांवने दिनांक १०-१०-२००३ रोजी ठराव पारित करुन त्यांना काही जागा दिली होती. तथापि जागेच्या हस्तांतरणाबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्यामुळे, त्यांनी तसा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा यांना केला होता. तथापि यावर अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यांना सोनेगांव ग्रामपंचायतीने

दिलेल्या जागेचे जिल्हा परिषदेने त्वरित हस्तांतरण करावे अशी अपेक्षा त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १५-०१-२००९ व ०९-०२-२००९ रोजी आवश्यक ती माहिती दिली आहे. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याच्या पृष्ठ्यर्थ अपिलार्थीची पोचसही असलेल्या कागदपत्राची प्रत त्यांनी आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा यांच्याकडे त्यांच्या दिनांक २१-१०-२००८ रोजीच्या अर्जावर पंचायत समिती कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. पंचायत समिती कार्यालयाने अपिलार्थीस जागा देण्याचा ग्रामपंचायतीचा दिनांक १०-१०-२००३ रोजीचा ठराव त्यांच्या दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर केला आहे. या व्यतिरिक्त पंचायत समिती कार्यालयाने अपिलार्थीस देण्यासाठी प्रस्तावित केलेल्या भूखंडाचे हस्तांतरण करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी ज्या पत्राद्वारे अपिलार्थीचा अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे पाठविला आहे त्या पत्राची प्रत देय होत आहे. या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०१-२००९ व ०९-०२-२००९ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीची अपेक्षा अशी आहे की, त्यांच्या नावाने सोनेगांव ग्रामपंचायतीने प्रस्तावित केलेली जागा त्यांना त्वरेने हस्तांतरण करण्याचे आदेश आयोगाने पारित करावे. तथापि अपिलार्थीच्या या अपेक्षेची पुर्तता आयोग आवश्यक त्या अधिकारितेअभावी करु शकत नाही. अपिलार्थीची ही विनंती पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाची असून या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी

योग्य तो निर्णय घ्यावयाचा आहे. अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भूखंड हस्तांतरणाबाबत आदेश देणे अशा प्रकारची बाब माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समाविष्ट नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भानुदास मारोती चौरे, मु. सोनेगांव, पो. दासखेड, ता. पाटोदा, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६८०

निर्णय दिनांक २५-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा,<br>रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी,<br>मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ ची माहिती पूर्णतः न दिल्यामुळे आणि विलंबाने

दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केलेले आहे व आपल्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०१-२००५ ते ३१-०३-२००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयातील प्रवासभत्ता देयकाच्या संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दिनांक ०१-०१-२००५ ते ३१-०३-२००६ या कालावधीमध्ये विभागीय कार्यालयाने प्रदान केलेल्या प्रवासभत्त्याच्या साक्षांकीत प्रती, या प्रवासभत्ता देयकामध्ये कालबाहय प्रवासभत्ता, कालबाह्य देयके असल्यास शासनाच्या दिनांक ११-०७-२००१ रोजीच्या निर्णयाप्रमाणे कालबाह्य मंजूरी घेण्यात आली असल्यास या आदेशाच्या साक्षांकीत प्रती, मंजुरी घेतली नसल्यास त्याची कारणे व वरील देयके प्रदानापोटी सार्वजनिक बांधकाम संकीर्ण शीर्षाखाली शासनाची जी रक्कम जमा करण्यात आली त्या कर्मचा-यांच्या नावाची यादी - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०६-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस १५२ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ३ अंशतः संबंधित माहिती पंधरा दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या

मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या प्रवासभत्ता देयकाची माहितीची मागणी केली होती. तथापि या माहितीची व्यक्तिशः मागणी करुन देखील अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयामध्ये ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः कधीही उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे त्यांनी अखेरीस दिनांक ०६-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे. अपिलार्थीच्या या अर्जाच्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०६-११-२००८ रोजी व तदनंतर दिनांक २४-०३-२००९ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीन अंशतः आणि चारशी संबंधित माहिती उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीस दिनांक २४-०३-२००९ रोजी ही माहिती व्यक्तिशः प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोच सही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ आयोगास सादर केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना मुद्दा क्रमांक ३ व ४ ची माहिती पूर्णतः न प्राप्त झाल्याचे आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झाल्याचे कारण दर्शविले आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित पूर्ण माहिती, मुद्दा क्रमांक ३ मधील "................ कालबाह्य मंजूरी घेण्यात आली आहे किंवा नाही, " मुद्दा क्रमांक ४ मधील "................ मंजूरी घेतली नसल्यास

त्याची कारणे काय ? कारणे द्यावीत " ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. कारण अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्दयांवरील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कारणे, त्यांचा खुलासा व स्पष्टीकरण मागणे व अर्जदाराने अपेक्षिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलची कारणे, स्पष्टीकरण अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया अभिप्रेत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ पूर्ण आणि ३ व ४, अंशतः ही माहिती अपिलार्थीस देय नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक ०६-११-२००८ रोजी व तदनंतर दिनांक २४-०३-२००९ रोजी म्हणजे अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्यानंतर तीन दिवसाच्या अंतराने दिलेली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी खोटी माहिती दिल्याचे नमूद केले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये नेमकी कोणती माहिती दिशाभूल करणारी व खोटी आहे याचा उल्लेख त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात केलेला नाही व तसेच हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचा हा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीने आयोगाकडील व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास विलंब लावल्याचे नमूद केले आहे. तथापि या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून ' व्यक्तिशः ' मागितली होती. माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितल्यानंतर या अर्जाच्या संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे हे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे माहिती अधिका-याच्या कार्यालयात स्वतः कधीही उपस्थित राहिले नाहीत अथवा यासंदर्भात कोणताही लेखी पुरावा आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत त्यांनी जोडलेला नाही किंवा तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिल्यासंदर्भात युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर उपस्थित नाहीत, ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाकडील व्दितीय अपील अर्जामध्ये घेतलेले सर्व आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर हेतुतः नाकारले असल्याचे किंवा माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई आयोग आदेशित करत नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्यामुळे, या प्रकरणी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी, मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६८१

निर्णय दिनांक २५-०२-२०१०

१ सौ. सुरेखा चंपतराव पाटील, : अपिलार्थी
रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड - ०५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, नांदेड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. कंठाळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने प्रथम अपिलेट अधिकारी यांनी त्यांना जाणुनबुजून माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व विलंब लावला असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. कंठाळे उपविभागीय अभियंता यांच्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. कंठाळे यांच्या नियुक्तीच्या आदेशाची सत्यप्रत, नियुक्तीचा दिनांक, त्यांच्या जात पडताळणी केलेल्या प्रमाणपत्राची सत्यप्रत, श्री. कंठाळे यांनी दाखल केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती व त्यांच्या सेवापुस्तिकेची सत्यप्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्षाचा वैयक्तीक सेवा पुस्तिकेचा तपशील वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस दिली. या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस नाकारताना जन माहिती अधिकारी यांनी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५-०९-२००२ रोजीच्या अधिसूचनेच्या कलम ७ (च) चा आधार घेतला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ बाबत श्री. कंठाळे यांच्या सेवापुस्तिकेचा तपशील ही माहिती अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेची प्रत अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, त्रयस्थ पक्ष हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक २८-११-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने व दिनांक ०४-०२-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे दोन टप्प्यात पाठविली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस माहिती पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगास दाखविला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या सेवा पुस्तिकेची माहिती दिल्याचे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक पाच वगळता इतर माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती प्राप्त झालेली आहे व तदनंतर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर माहिती अधिका-याने दिनांक ०४-०२-२००९ रोजी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या सेवा तपशीलाची उर्वरित माहिती देखील पाठविली आहे व त्याचा पुरावा आयोगास दाखल केला आहे. हे पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आता प्राप्त झाल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. सुरेखा चंपतराव पाटील, रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड - ०५.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६८२

निर्णय दिनांक २५-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मिलिंद वसंतराव विटेकर,<br>" दत्त कृपा, " ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, तालुका सोनपेठ,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, ३० दिवसात माहिती न मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे दिनांक २७-०८-२००८ रोजी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे केले असता, दिनांक

१२-०९-२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी त्यांचा अपील अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी कार्यालयाकडे वर्ग केल्याचे त्यांना कळविले. तथापि त्यांच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही. यासंदर्भात ते शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांना व्यक्तिशः भेटूनही त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यामध्ये शासनमान्य खाजगी माध्यमिक शाळेतील नोकर भरतीसंदर्भात दिनांक ०१-०१-२००१ ते ०१-०७-२००८ या कालावधीशी संबंधित व्यापक व्याप्ती असलेली माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सोनपेठ तालुक्यातील ०१-०१-२००१ ते ०१-०७-२००८ या कालावधीत मान्यता देण्यात आलेल्या खाजगी शाळांची नावे, मान्यतेचा प्रकार, शाळेमधील मान्य पदे, शाळा-निहाय पदांची संख्या, सध्या कार्यरत असलेल्या शिक्षकांची नावे, शिकविणारे विषय, त्यांची पात्रता, शिक्षकांना वेतन देण्याबाबत आदेश - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत, ते या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी नसल्याने दिनांक १२-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविली. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी

यांनी निर्णय न घेतल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड प्रमाणात असल्यामुळे त्यांना ही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देता आली नाही. तसेच अपिलार्थीस माहिती देण्याची प्रक्रिया त्यांच्या स्तरावर चालू असताना अपिलार्थीने दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्या कार्यालयास असे कळविले आहे की, त्यांच्या दिनांक ०४-०७-२००८ रोजीच्या अर्जातील त्यांनी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आता आवश्यकता नाही. अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या विनंतीमुळे त्यानंतर त्यांनी माहिती देण्याची प्रक्रिया थांबविली. अपिलार्थीने असे पत्र त्यांना दिल्यामुळे त्यांनी दिनांक १२-१२-२००८ रोजी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना अपिलार्थीस माहिती देण्याची गरज नाही असे कळविले व त्याची प्रत अपिलार्थीस दिली.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना या अपिलाशी संबंधित त्यांनी मागणी केलेल्या मूळ अर्जातील माहितीची त्यांना आवश्यकता नाही, असे लिहून दिले आहे आणि यानंतर दिनांक ०९-०२-२००९ रोजी त्यांनी आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याचे स्पष्ट करुन विचाराधीन अपील सादर केले आहे. अपिलार्थीची या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिका-यास दिनांक ०१-१२-२००८ रोजी दिलेल्या पत्रातील व त्यांच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या व्दितीय अपील

अर्जातील भूमिका या पूर्णपणे परस्पराशी विसंगत आहेत. त्यांच्या भूमिकेतील या विसंगतीबाबत युक्तिवाद करण्याकरिता अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या माहितीकरिता आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार परत नव्याने अर्ज करावा. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीकडून त्यांचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्याच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांनी आवश्यक ती कार्यवाही विहित मुदतीत करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, " दत्त कृपा, " ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६८३

निर्णय दिनांक २५-०२-२०१०

१ श्री. कॉ. युनुसखॉं जुम्मा खॉं पठाण, : अपिलार्थी
मु. मोमीनपुरा, गल्ली नं. ४, सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या आदेशान्वये संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेश दिले असताना देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सिल्लोड तालुक्यातील घाऊक व अर्धघाऊक, किरकोळ रॉकेल परवाना-धारक हॉकर्सच्या संदर्भात व रॉकेल वाटपासंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी मार्च २००७ ते ३० सप्टेबर २००८ असा होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे तहसीलदार, सिल्लोड तथा जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. परंतु या आदेशानंतरही अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. टी. आर. ताठे, अव्वल कारकून हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो पुरविलेली नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही

अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असतांना देखील, ती अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करेपर्यंत प्राप्त झाली नव्हती. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-१२-२००८ रोजी आदेशित केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-१२-२००८ पर्यंत माहिती देणे भाग होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिल्याचा पुरावा आयोगासमोर उपलब्ध नाही किंबहुना जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादामध्ये कबूल केल्याप्रमाणे अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही हा युक्तिवाद मान्य करणे या प्रकरणी आयोगास योग्य वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त होणे हा त्यांचा हक्क असूनही हा हक्क संबंधित तहसीलदार, सिल्लोड तथा जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय डावलला असल्याचे आयोगास आढळून येत आहे. किंबहुना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती नाकारण्याचे कोणतेही कारण समर्थनीय असू शकणार नाही, असे या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी मागणी केलेली माहिती न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) मधील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी समजावे, अशी तरतूद आहे, या सर्वांनी आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांना

त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती न पुरविल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांना उपरोक्त प्रकरणी एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी

हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कॉ. युनुसखाँ जुम्मा खाँ पठाण, मु. मोमीनपुरा, गल्ली नं. ४, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७२९
निर्णय दिनांक: २६-०२-२०१०

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, : अपिलार्थी
रा.नांदगाव,ता.चाकूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, चाकूर,
जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, चाकूर,
जि.लातूर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, चाकूर,
जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक व दुष्ट हेतूने माहिती नाकारल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिदिनी रु. २५०/- दंड अथवा शिस्तभंगविषयक कारवाई करावी आणि त्यांना, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विनामूल्य पुरवावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०१.०१.२००५ ते ०४.०९.२००८ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीत त्यांच्या कार्यालयास किरकोळ खर्चासाठी प्राप्त झालेला एकूण निधी, निधीच्या खर्चाच्या व्हाऊचर्सच्या प्रती, झालेल्या व्यवहाराचे ऑडीट रिपोर्ट-प्रमाणपत्र, या कालावधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे रो.ह.यो.अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची संख्या, कामनिहाय केलेल्या कामांच्या मोजमापपुस्तिका, मस्टर्सच्या प्रती, या कालावधीमध्ये शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीतून मोफत वाटप केलेल्या बियाण्यांसंदर्भात गावनिहाय माहिती, लाभार्थ्यांची यादी, बियाणे स्वीकारलेल्या पावत्यांसहीत पैसे भरलेल्या पावत्यांच्या प्रती- या मुद्यांचा समावेश होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विस्तृत प्रमाणात असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी त्यांना येणाऱ्या खर्चाची मागणी त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे केली असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. ०१.०१.२००९ पर्यंत माहिती देण्यात येईल, असे त्यांना आश्वासित केले. तथापि या कालावधीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०२.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दि. ०५.०४.२००९ रोजी समक्ष माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली मूळात विस्तृत व्याप्ती असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना, त्यांनी आयोगाकडे दि. ३०.०१.२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर दि. ०५.०४.२००९ रोजी व्यक्तिशः प्राप्त झाली आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीच्या दि. ०४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या सद्‌सद्‌विवेकबुध्दीला पटेल, असा प्रतिसाद दिला आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही, हे पाहता, अपिलार्थीची, जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अशा परिस्थितीत खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा.नांदगाव,पो. गांजूर,ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७३०
निर्णय दिनांक: २६-०२-२०१०

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, : अपिलार्थी
रा.नांदगाव,ता.चाकूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
दुय्यम निबंधक कार्यालय, चाकूर,
जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक कार्यालय,लातूर
जि.लातूर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : दुय्यम निबंधक, श्रेणी-१,चाकूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी : सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.),लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांना माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने टाळल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- इतक्या दंडाची कारवाई आदेशित करावी अथवा त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०१.२००१ ते २२.१०.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास या कालावधीमध्ये किरकोळ खर्चासाठी प्राप्त झालेला एकूण निधी, सदर निधीच्या खर्चाचे विवरणपत्र व व्हाउचर आणि ऑडीट रिपोर्ट व माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार कलम ४ मधील १७ कामे कधी पूर्ण केली व याबाबत वरिष्ठांना पाठविलेला अहवाल - या मुद्यांचा समावेश होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांच्याकडे उपलब्ध असलेली मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती देऊन व मुद्दा क्र. २ च्या संदर्भात अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५०/- इतके शासन जमा केल्यास त्यांना माहितीची सी.डी. पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस सूचित केले. सदर रक्कम जमा करण्याचे शासकीय लेखाशीर्ष नमूद करुन हे शुल्क भरण्याचे मार्गदर्शन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस केल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीने अशाप्रकारची जन माहिती अधिकारी यांनी सूचित केलेली कार्यवाही न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २९.११.२००८ रोजी प्रथम अपील केले आणि मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची मागणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ३१.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जातील सर्व मुद्दे अमान्य करुन अपिलार्थीचे अपील निकाली

काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांचे कार्यालय दि. ०१.११.२००५ पासून चाकूर येथे अस्तित्त्वात आल्यामुळे अपिलार्थीस सन २००१ ते २००५ या कालावधीची व त्या पूर्वीची संदर्भित माहिती अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच त्यांच्या कार्यालयास किरकोळ खर्चासाठी कोणताही निधी प्राप्त होत नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस तसे कळविले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातील नियमित कामाकरिता लागणाऱ्या किरकोळ खर्चाच्या निधीसाठी आहरण व संवितरण अधिकारी सह जिल्हा निबंधक आहेत. त्यामुळे त्यांनी दि. ३१.१२.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये तसा उल्लेख केलेला आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात असे स्पष्ट केले आहे की, त्यांच्याकडे ही माहिती सी.डी. च्या स्वरुपात असून ही माहिती प्राप्त होण्यासाठी रु.५०/- इतके भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस सूचित केल्यानंतरही अपिलार्थी यांनी या शुल्काचा भरणा न केल्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. त्यांनी पुढे आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्याचा सबळ पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे. यासंदर्भात त्यांना आज रोजी सुनावणीच्यावेळी विचारणा केली असता, त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. १४.०९.२००९ रोजी मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत, असे नमूद केले आहे. त्याचबरोबर त्यांनी आयोगास अपिलार्थी श्री.नंदवे तातेराव जगन्नाथ हे शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव येथे तासिका तत्त्वावर कार्यरत असल्याचा पुरावा आयोगास दाखविला. सन २००७-०८

व २००८-०९ मध्ये अपिलार्थीस त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून प्रतिवर्ष रु.१४,७००/- अशी रक्कम प्राप्त झाली आहे. त्याचबरोबर अपिलार्थीच्या नावावर १ हेक्टर २७ आर इतकी जमीन असल्याचा पुरावा देखील त्यांनी आयोगासमोर अवलोकनास्तव सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. त्यापैकी एका मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ११.११.२००८ रोजी व जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१२.२००८ रोजी माहिती पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवूनही अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये न केल्यामुळे, या मुद्यावरील माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे स्वतःच जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विहित मुदतीत आणि पूर्ण स्वरुपात मिळालेली नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील काही माहिती विहित मुदतीत प्राप्त झाली मात्र उर्वरित माहिती, ज्या माहितीकरिता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक ते शुल्क न भरल्यामुळे त्यांना प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने जरी त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे, अपिलार्थीच्या या दर्जाचा शोध जन माहिती अधिकारी यांनी घेतला असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली विसंगती आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत,जर अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा प्राप्त झाला तर, त्यांना विनामूल्य अन्यथा सशुल्क पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत,जर अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा त्यांना प्राप्त झाला तर, त्यांना विनामूल्य अन्यथा सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा.नांदगाव,पो. गांजूर,ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१,चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.),लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८८९
निर्णय दिनांक: २६-०२-२०१०

१. चेअरमन, : अपिलार्थी
नागाई मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे

**विरुध्द**

१. जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील "शासकीय प्राधिकरण" अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे नागाई मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या  निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम  विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, नागाई मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार

माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री. बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २६-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, नागाई मजुर सहकारी सोसायटी मर्या., २३, प्रो.कॉलनी, देवपूर, धुळे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८९०
निर्णय दिनांक: २६-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. चेअरमन,<br>सचिन मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, धुळे | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील "शासकीय प्राधिकरण" अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे सचिन मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या  निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम  विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "सार्वजनिक प्राधिकरण" असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, सचिन मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार

माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री. बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २६-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, सचिन मजुर सहकारी सोसायटी मर्या., मुदांणकरवाडी, वाडी भोकर, नावमानवळ, देवपूर, ता.जि. धुळे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८९१
निर्णय दिनांकः २६-०२-२०१०

१. चेअरमन, : अपिलार्थी
दत्तगुरु मजूर सहकारी सोसायटी मर्या.,धुळे

**विरुध्द**

१. जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील “शासकीय प्राधिकरण” अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे दत्तगुरु मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार “सार्वजनिक प्राधिकरण” असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, दत्तगुरु मजूर सहकारी सोसायटी मर्या., धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार

माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री. बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २६-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, दत्तगुरु मजुर सहकारी सोसायटी मर्या., ब्लॉक नं.१८, गजानन नगर, मार्केट यार्ड, धुळे, ता.जि.धुळे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८९२
निर्णय दिनांकः २६-०२-२०१०

१. चेअरमन, : अपिलार्थी
तिरुपती मजूर सहकारी सोसायटी मर्या.,
बाभुळवाडी, ता.जि.धुळे

**विरुध्द**

१. जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाऱ्यांचे दि. २४.०५.२००७ रोजीचे आदेश त्यांच्या सहकारी संस्थेस लागू होत नाहीत. कारण या सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान वा कोणत्याही प्रकारचे वित्तसहाय्य नसल्याने ती या कायद्यातील "शासकीय प्राधिकरण" अथवा तत्सम व्याख्येत येत नाही. संबंधितांनी मागितलेली माहिती संस्थेची व्यावसायिक व गोपनीय माहिती आहे ती देणे संस्थेच्या हिताविरुध्द आहे, त्यामुळे सदर माहिती देण्याच्या आदेशाविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, ही माहिती देणे त्यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही व त्यांची संस्था ही थर्ड पार्टी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री.बाळासाहेब भगवानराव पाटील यांनी प्रथमतः त्यांच्या दि.१२.१०.२००६ रोजीच्या

अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांच्याकडे तिरुपती मजूर सहकारी सोसायटी मर्या., बाभुळवाडी, ता.जि. धुळे या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदरची माहिती ही संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे यांनी संबंधित संस्थेस, श्री. बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. यासंदर्भात वारंवार स्मरणपत्रे देऊनही संबंधित संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.बाळासाहेब पाटील यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. पाटील यांना उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या  निर्णयाविरुध्द संबंधित संस्थेचे चेअरमन यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २६.०२.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित अपिलार्थी अनुपस्थित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम  विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."</u>**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार “सार्वजनिक प्राधिकरण” असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सहकारी संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, चेअरमन, तिरुपती मजूर सहकारी सोसायटी मर्या., बाभुळवाडी, ता.जि. धुळे यांनी विचाराधीन अपिलामध्ये नमूद केलेली त्यांची भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परंतु ही माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ प्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे श्री. बाळासाहेब पाटील यांना ही माहिती संबंधित कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार मागवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी संस्थेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २६-०२-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. चेअरमन, तिरुपती मजुर सहकारी सोसायटी मर्या., बाभुळवाडी, ता.जि.धुळे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २१९१/२००८, २१९२/२००८, २१९३/२००८ व २१९४/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१९१, २१९२, २१९३ व २१९४

निर्णय दिनांक   २६-०२-२०१०

१ श्री. इरपनवार सुरेश किष्टन्ना, : अपिलार्थी

रा. सरस्वती विद्या मंदिर परिसर, किनवट,

ता. किनवट, जि. नांदेड

**विरुध्द**

**अपील क्रमांक २१९१/२००८**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी

वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी बु., ता. किनवट, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा

सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड

**अपील क्रमांक २१९२/२००८**

१ जन माहिती अधिकारी तथा

वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), किनवट, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा

सहायक वनसंरक्षक (जं.का.स.), किनवट, जि. नांदेड

**अपील क्रमांक २१९३/२००८**

१ जन माहिती अधिकारी तथा

वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी, ता. किनवट, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा

सहायक उपवनसंरक्षक (जं.का.स.), किनवट, जि.

नांदेड

**अपील क्रमांक २१९४/२००८**

१ जन माहिती अधिकारी तथा

वन परिक्षेत्र अधिकारी, इस्लापूर, ता. किनवट, जि.

नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा

सहायक उप वनसंरक्षक (रोहयो), नांदेड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : सहायक वन संरक्षक (रोहयो), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी दाखल केलेली तीन व दिनांक २०-१२-२००८ रोजी दाखल केलेले एक अपील क्रमांक २१९४/२००८ ही चार द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या चारही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, वन परिक्षेत्र अधिकारी, बोधडी यांच्याकडे त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही . वन परिक्षेत्र अधिकारी , किनवट (रोहयो) व मांडवी यांनी त्यांना माहितीपोटीचे शुल्क कळविले नाही आणि कोणतीही माहिती दिली नाही व वन परिक्षेत्र अधिकारी, इस्लापूर यांनी त्यांनी मागितलेली माहिती देण्याऐवजी वेगळीच माहिती देऊन दिशाभूल केल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत. या चारही अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या चारही प्रकरणामध्ये अपिलार्थीने सर्वसाधारणपणे एकाच स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वनपरिक्षेत्र कार्यालय, बोधडी, किनवट, मांडवी व इस्लापूर यांच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण योजना व रोजगार हमी योजनेअंतर्गत, सन २००५ ते २००९ या कालावधीमध्ये झालेल्या कामाचे मजुर पेमेंटशीट व मजुराची स्वाक्षरी असलेली पेमेंट पत्रके आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील अन्य योजनेद्वारे कामे झाली असल्यास त्या कामांना शासनाकडून प्रतिवर्षी प्राप्त झालेला निधी आणि प्रति कामनिहाय मजुर पमेंटशीटची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. यापैकी वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये मजुरांचे स्वाक्षरी असलेले पेमेंटपत्रके या मुद्याचा समावेश नव्हता.

अपिलार्थीच्या या अर्जास वन परिक्षेत्र, बोधडी यांनी दिनांक ०४-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ६१००/- इतके चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे भरण्याचे व या चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले व माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात अपुरा स्टाफ असल्यामुळे वेळ लागत असल्याचे अपिलार्थीस कळविले. यानंतर अपिलार्थीने दिनांक २३-०९-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा किनवट येथील स्टेट बँक ऑफ हैद्राबाद या शाखेमध्ये केला. तथापि अपिलार्थीने सदर चलनाची कार्बन कॉपी सादर न केल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत दिनांक ०१-१०-२००८ रोजी त्यांनी बँकेत भरलेल्या चलनाची कार्बन कॉपी त्यांच्याकडे मागितली. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १५-१०-२००८ रोजी चलनाची मूळ प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केली. तथापि आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार यापुर्वीच दिनांक ०३-१०-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी

तथा सहायक वनसंरक्षक यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे सूचित केले. परंतु यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

अपील क्रमांक २१९२/२००८ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे वरील परिच्छेदात नमूद केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०६-१०-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-१०-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती घेण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), किनवट यांना त्यांच्याकडील दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्यासाठी चलन तयार करुन मागितले. तथापि अशाप्रकारचे चलन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाले नाही. परिणामी अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

अपील क्रमांक २१९३/२००८ च्या संदर्भात असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील प्रमाणे माहिती मागविली असता, त्यांना जन माहिती अधिकारी तथा

वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस संबंधितांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

अपील क्रमांक २१९४/२००८ च्या बाबतीत अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०८-२००८ रोजीच्या पत्राद्वारे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, इस्लापूर यांच्याकडे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यापूर्वीच जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, इस्लापूर यांनी दिनांक ०६-११-२००८ रोजी अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविली होती. परंतु ही माहिती दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील सादर केले आहे. या प्रकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १०-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या चारही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २६-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आणि वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी व इस्लापूर आणि सहायक वन संरक्षक (रोहयो), नांदेड हे हजर आहेत.

वन परिक्षेत्र अधिकारी, बोधडी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी आवश्यक तो निधी त्यांच्याकडे उपलब्ध नाही. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे योग्य त्या शिर्षाखाली करुनही प्रधान मुख्य वन संरक्षक यांच्याकडून त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक तो निधी प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

वन परिक्षेत्र अधिकारी, इस्लापूर यांनी या प्रकरणी त्यांना काहीही सांगावयाचे नाही, असा युक्तिवाद करुन वन परिक्षेत्र अधिकारी, बोधडी यांच्या युक्तिवादाशी सहमती दर्शविली आहे.

वरील घटनाक्रम, वन परिक्षेत्र अधिकारी, बोधडी व इस्लापूर यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास वन परिक्षेत्र अधिकारी, बोधडी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य प्रकारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ६१००/- इतके त्यांच्याकडे चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही त्यांना ही माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडून ३० दिवसाच्या आत माहिती प्राप्त करुन घेण्याचा अपिलार्थीचा हक्क या प्रकरणी, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचना केल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही, वन परिक्षेत्र अधिकारी यांनी अपिलार्थीस नाकारला आहे. त्यांची ही कृती अधिनियमातील तरतुदींशी पुर्णपणे विसंगत आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकदा शुल्क भरल्यानंतर

ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये अपिलार्थीस देणे हे वन परिक्षेत्र अधिकारी, बोधडी यांचे कर्तव्य होते. तथापि त्यांनी आपले हे कर्तव्य बरोबर पार पाडले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे, वन परिक्षेत्र अधिकारी, बोधडी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ६१००/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना याच कालावधीमध्ये विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), किनवट यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्याचप्रमाणे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी त्यांनी प्रथम अपिलावर निर्णय देतेवेळी व्यपगत झाला असताना अपिलार्थीस संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले आहे. यावरुन अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी तर कोणताही प्रतिसाद दिला नाही, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा कोणताही अभ्यास न करता बेजबाबदारपणाचा निर्णय दिला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), किनवट यांनी आपल्या

कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनामुळे अपिलार्थी हे, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले आहेत. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावायाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (वने), मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), किनवट यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या अर्जास संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. या प्रकरणी देखिल संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००८ रोजी सदोष निर्णय दिला आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे माहिती मागितली असताना अपिलार्थीस त्यांनी आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेऊन जाण्याचे सूचित करण्याची जन अपिलीय अधिकारी यांची कृती सर्वथा चुकीची आहे. या प्रकरणी देखिल अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त होणे आवश्यक असल्याने, वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

वन परिक्षेत्र अधिकारी, इस्लापूर यांनी देखिल अपिलार्थीच्या दिनांक २०-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००८ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे संबंधित जन महिती अधिकारी तथा

वन परिक्षेत्र अधिकारी श्री. एस. एम. दायमी (सध्या मुख्य वन संरक्षक कार्यालय, औरंगाबाद येथे कार्यरत) यांना सूचित केले होते. त्यांनी अपिलार्थीच्या अर्जास विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती दिली नाही. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे जी माहिती दिली आहे ती अर्धवट आणि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नसलेली अशी दिली असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यांनी देखिल या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सचिव (वने) यांना संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी, इस्लापूर श्री. एस. एम. दायमी (सध्या मुख्य वन संरक्षक कार्यालय, औरंगाबाद येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात, येथे असे नमूद करण्यात येत आहे की, या खंडपीठाकडे वन विभागाची अपिले ज्या ज्या वेळी सुनावणीस येत असतात त्या त्या वेळी असे आढळून आले आहे की, वन विभागातील अधिकारी प्रथमतः अर्जदाराकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क शासकीय कोषागारात भरणा करण्याचे सूचित करतात. त्यांच्या सूचनेप्रमाणे अर्जदाराने शासकीय कोषागारात आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर वन विभागाचे क्षेत्रीय अधिकारी हे त्यांच्याकडे अर्जदारास माहिती देण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करुन अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवत असतात. गेली तीन वर्ष वन विभागाच्या क्षेत्राधिकाऱ्यांची अशाप्रकारची कार्यपध्दती ही निश्चितपणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या पोषक

अंमलबजावणीकरिता घातक आहे, असे आयोगाचे मत आहे. वन विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांची अशाप्रकारची कार्यपध्दती सचिव (वने) यांच्या कार्यालयाच्या निदर्शनास आयोगाने आणली होती. तथापि अद्यापपावेतो या परिस्थितीत सुधारणा न झाल्यामुळे मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी वन विभागातील व इतर विभागातील अशा कार्यपध्दतीस वेळीच आळा घालण्याच्या दृष्टीने त्यांच्या स्तरावर, अर्जदाराने आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर, अर्जदारास कशा प्रकारे माहिती द्यावयाची याचे मार्गदर्शन करणारे परिपत्रक जारी करावे, जेणेकरुन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जनसामान्यांना सार्वजनिक प्राधिकरणाकडून आवश्यक ती माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्राप्त करुन घेण्यास मदत होईल. मुख्य सचिव यांना या सूचना अधिनियमातील कलम १९ (८) (क) मधील तरतुदीप्रमाणे देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची चारही विचाराधीन अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक २१९१/२००८, २१९२/२००८, २१९३/२००८ व २१९४/२००८ मान्य करण्यात येत आहेत.
२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. वन परिक्षेत्र, बोधडी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ६१००/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

४. सचिव (वने) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट, मांडवी व इस्लापूर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६.०२.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. इरपनवार सुरेश किष्टन्ना, रा. सरस्वती विद्या मंदिर परिसर, किनवट, ता. किनवट, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी बु., ता. किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.स.), किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी, ता. किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक उपवनसंरक्षक (जं.का.स.), किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, ईस्लापूर, ता. किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक(रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१९५

निर्णय दिनांक २६-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. इरपनवार सुरेश किष्टन्ना,<br>रा. सरस्वती कॉलनी, हनुमान मंदिराजवळ, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता (एन. आय. डी.), व्यवस्थापन, सिंचन कार्यालय, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग (सिंचन विभाग), नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, लोणी मध्यम प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात सध्या चालू असलेल्या गाळ काढणे, कॅनॉल गाळ काढणे ही कामे कोणत्या वर्षाची आहेत, या कामांचे कार्यारंभ आदेश, तसेच दिनांक २६-१२-२००७ मशिनव्दारे केलेल्या सर्व कामांची मंजूरी कोणत्या वर्षाची आहे, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७० इतके त्यांच्या कार्यालयास चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०२-०२-२००८ रोजी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला व त्याच दिवशी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०२-२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ११-०३-२००८ रोजी पारीत केले. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०२-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे उघड झाल्याने आणि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मान्य केल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील खारीज केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०७-०२-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झालेल्या कथित माहितीवर कोणतेही भाष्य केलेले नाही. परंतु आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे पुरविली असल्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये गाळ काढण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकाची प्रत आयोगास आढळून आली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जाव्दारे गाळ काढण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकाची प्रत मागितली नव्हती. त्यांनी फक्त ती कामे कोणत्या वर्षाची आहेत एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती. त्यामुळे या कामांना संबंधित सक्षम प्राधिकरणाने ज्यावेळी प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता दिली त्या तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस देणे अथवा ही कामे ज्या वर्षी मंजूर केली आहेत ते वर्ष अपिलार्थीस कळविणे एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अपेक्षित होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस एकूण १६ पृष्ठांची अनावश्यक माहिती सशुल्क पुरविली आहे. आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी पुरविलेल्या १६ पृष्ठांच्या माहितीकरिता आकारलेले शुल्क त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आकारलेले १६ पृष्ठांचे अनावश्यक शुल्क रुपये ३२ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत त्यांना अनावश्यकरित्या आकारलेले शुल्क रुपये ३२ इतके त्यांना परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. इरपनवार सुरेश किष्टन्ना, रा. सरस्वती कॉलनी, हनुमान मंदिराजवळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१९६

निर्णय दिनांक २६-०२-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. इरपनवार सुरेश किष्टन्ना,<br>रा. सरस्वती विद्या मंदिर परिसर, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय, माहूर,<br>तालुका माहूर, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर,<br>जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-१०-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीसाठी स्वतः जन अपिलीय अधिकारी हे

गैरहजर राहिल्यामुळे अपिलार्थीचे फसवणूक झाल्याचे वाटल्यावरुन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००५ ते २००९ या कालावधीमधील म. रा. ग्रा. यो. व रो. ह. यो. योजनेअंतर्गत झालेल्या कामांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मजुरांचे पेमेंटशीट व रोहयो आणि अन्य योजनेव्दारे कामे झालेली असल्यास त्या कामाचे विवरण, प्रत्येक कामास प्रत्येक वर्षी प्राप्त झालेला निधी व प्रत्येक कामावर मजुरांना झालेल्या पेमेंटशीटच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-१०-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी झाली असल्याचे अथवा अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय झाला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. अशा प्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना देणे भाग आहे. आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त (कृषि), पुणे यांना करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०३-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर यांनी कोणतीही सुनावणी न घेऊन व यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न करुन स्पष्ट केलेल्या त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद आयुक्त (कृषि), पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त (कृषि), पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. इरपनवार सुरेश किष्टन्ना, रा. सरस्वती विद्या मंदिर परिसर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर, जिल्हा

नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २२१९/०८ व २२२०/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२१९ व २२२०

निर्णय दिनांक २६-०२-२०१०

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : अपिलार्थी
रा. एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको,
औरंगाबाद

**विरुध्द**

अपील क्रमांक २२१९/२००८ व २२२०/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा आस्थापना अधिकारी, सरकारी वकिलांचे कार्यालय,
उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आस्थापना अधिकारी, सरकारी वकिलांचे कार्यालय,
उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक, सरकारी वकिलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष अपील क्रमांक २२१९/०८ : श्री. जोहरी व्ही. जी.

त्रयस्थ पक्ष अपील क्रमांक २२२०/०८ : श्री. कोल्हे एस. एस.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-११-२००८ रोजी नोंदविलेली २२१९/२००८ व २२२०/२००८ या क्रमांकाची दोन व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित जन माहिती अधिकारी हे केंद्रीय माहितीचा अधिकार कायद्याला जुमानत नाहीत अशा त्यांच्या अभिप्रायासह जोपर्यंत राज्य माहिती आयोग निर्णय देत नाही तोपर्यंत त्रयस्थ पक्षाची सेवानिवृत्ती रोखावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५-०९-२००८ व दिनांक ०४-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. जोहरी व्ही. जी. व श्री. कोल्हे एस. एस. दोघेही अधीक्षक, सरकारी वकिलांचे कार्यालय, मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ - औरंगाबाद यांच्या संदर्भात अनुक्रमे सहा व सात एकसारख्या मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाची नियुक्ती ज्या प्रवर्गातून करण्यात आली तो प्रवर्ग व दिनांक, पदोन्नती देण्यात आली त्याची तपशीलवार माहिती, पदोन्नती देण्यापूर्वी किंवा दिल्यानंतर जात पडताळणी झाली असल्यास त्याची सत्यप्रत, जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीला पाठविले असल्यास त्याची प्रत, न पाठविली असल्यास न पाठविण्याची कारणे, त्रयस्थ पक्षाच्या मत्ता व दायित्वाची जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंद आहे का ? असल्यास त्याची संपूर्ण माहिती व श्री. कोल्हे यांच्याबाबत त्यांच्या वयाच्या ५० व्या व ५५ व्या वर्षी करण्यात आलेल्या पुर्नविलोकन समितीच्या अहवालाची सत्यप्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जांव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपील अर्ज सादर केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीची दोनही अपिले अंशतः मंजूर व खारीज केली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

या दोनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २६-०२-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधित जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार कायद्याला जुमानत नाहीत, ते जन माहिती अधिकारी यांच्या-कडे माहिती मागण्यासाठी गेले असता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून कधीही माहिती प्राप्त होऊ शकत नाही. या दोनही प्रकरणी त्यांना प्राप्त झालेली माहिती ही खोट्या व अपूर्ण स्वरुपात प्राप्त झाली असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीचे आदेश निर्गमित करण्यात यावेत व त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी तात्काळ व विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करावे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती त्यांनी दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस पूर्णपणे दिली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाबाबत जन

माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील, " पदोन्नती देण्यापूर्वी किंवा पदोन्नती दिल्यानंतर त्यांची जात पडताळणी झाली काय ? " मुद्दा क्रमांक ५ मधील, " जाती प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडे पाठविले का ? न पाठविली असल्यास का पाठविली नाही याची सविस्तर माहिती, " व मुद्दा क्रमांक ६ मधील, " त्रयस्थ पक्षाच्या मत्ता व दायित्वाच्या माहितीची आपल्याकडे नोंद आहे का ? नोंद नसल्यास का करण्यात आली नाही, " या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णपणे विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्नार्थक स्वरुपात त्यांच्या कृतीबद्दलची, निर्णयाबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरण विचारणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिका-याने अर्जदारास त्यांच्या कृतीचे अथवा निर्णयाचे समर्थन करणारे खुलासे अर्जदारास करणे, अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षांशी संबंधित असली तरी या माहितीचे सार्वजनिक स्वरुप पाहता, ही माहिती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नसावा. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या दोन स्वतंत्र पत्राव्दारे माहिती पुरविलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस श्री. जोहरी यांच्या संदर्भात दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे श्री. जोहरी यांची कोणत्या प्रवर्गातून पदोन्नती झाली यासंदर्भात माहिती दिली नाही. अपिलार्थीस ही माहिती न देण्याचे कारण म्हणजे संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसतात असे जन माहिती अधिकारी यांनी

दिले आहे.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती न देण्याचे दिलेले कारण आयोगास अमान्य आहे.  जर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती तर या माहितीचा अर्ज, या मुद्दयापुरता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या प्राधिकरणाचा एक भाग असलेल्या, सह सचिव यांच्या कार्यालयाकडे, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार पाठवावयास हवा होता.  तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती न केल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे श्री. जोहरी व श्री. कोल्हे यांची नेमणूक कोणत्या प्रवर्गातून झाली यासंदर्भातील माहिती त्यांनी सह सचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. याचबरोबर अपिलार्थीस श्री. जोहरी यांच्या संदर्भातील अर्जामधील मुद्दा क्रमांक ३ मध्ये जन माहिती अधिकारी यांनी श्री. जोहरी यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी जात पडताळणी समिती, नाशिक यांच्याकडे दिनांक १९-०६-१९९६ रोजी पाठविल्याचे नमूद केले आहे.  अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे या प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे.  तथापि या प्रमाणपत्राची सत्यप्रत जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस दिलेली नाही.  या प्रमाणपत्राची सत्यप्रत आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.  श्री. जोहरी यांच्या संदर्भातील अपिलार्थीच्या अर्जामधील मुद्दा क्रमांक ६ व्दारे अपिलार्थीने श्री. जोहरी यांच्या मत्ता व दायित्वाची माहिती मागितली आहे, जी त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीशी संबंधित आहे.  अशा प्रकारच्या माहितीच्या संदर्भात आयोगाने वेळोवेळी निर्णय दिले असून अशा प्रकारची माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता असल्याने व परिणामी अधिनियमातील कलम ८ (१) (ज) च्या तरतुदींचा भंग होण्याची शक्यता असल्यामुळे अशा प्रकारची माहिती उघड न करण्याची भूमिका आयोगाने वेळोवेळी घेतली आहे.  या प्रकरणी देखील

हीच भूमिका कायम ठेवून श्री. जोहरी व श्री. कोल्हे यांच्या मत्ता व दायित्वाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस उघड होऊ शकणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी. श्री. कोल्हे यांच्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे " वयाच्या ५० व्या व ५५ व्या वर्षी करण्यात आलेल्या पुनर्विलोकन समितीच्या अहवालाची सत्यप्रत " मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत कले की, उच्च न्यायालयातील सरकारी वकिलांच्या कार्यालयामार्फत अशा प्रकारच्या कर्मचा-यांचे पुनर्विलोकन होत असते. या प्रकरणी श्री. कोल्हे यांच्याबाबत असे पुनर्विलोकन झाले आहे किंवा कसे याबाबत त्यांना कोणतीही माहिती नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली या मुद्दयावरील माहिती सरकारी वकिलांचे कार्यालय मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. पुनर्विलोकन समितीच्या बैठकीच्या अहवालामध्ये त्रयस्थ पक्षाच्या गोपनीय अहवालातील अभिप्राय असणे अभिप्रेत आहे. सबब या अहवालातील गोपनीय अहवालाचा भाग व तसेच जी माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) व ८ (१) (ङ) चा भंग होईल अशा प्रकारची माहिती वगळता उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यांना देय असलेली माहिती यांचे वरीलप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या विचाराधीन अपील अर्जात आयोगास त्रयस्थ पक्षाची सेवानिवृत्ती त्यांच्या व्दितीय अपील अर्जाची सुनावणी होऊन निर्णय होईपर्यंत स्थगित ठेवण्याची विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की,

त्रयस्थ पक्षाची नियत वयोमानानुसार होणारी सेवानिवृत्ती व अपिलार्थीने आयोगाकडे केलेले अपील या दोनही बाबी पूर्णतः भिन्न असून आयोगास संबंधित त्रयस्थ पक्षाच्या अशा प्रकारच्या प्रशासकीय बाबीत हस्तक्षेप करण्याची कोणतीही अधिकारिता नसल्यामुळे, अपिलार्थीची ही विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. अपिलार्थीने आयोगास जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची विनंती केली आहे. यासंदर्भात अपिलार्थी हे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडे गेल्याचा सबळ पुरावा आयोगास सादर न करु शकल्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २२१९/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक २२२०/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस अद्याप-पावेतो द्यावयाची माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०२-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, रा. एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी, सरकारी वकिलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, सरकारी वकिलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.